


जगाच्या इतिहासात अनेक स्त्री-रत्नांची नावे मशहूर आहेत. पण क्लिओपॅट्राला लाभलेली प्रसिद्धी कोणाही भाग्यवान स्त्रीच्या वाट्यास अद्यापि आलेली नाही.


इजिप्तच्या ह्या राणीला, तिच्या चरित्राला, दंतकथेचे स्वरूप आले आहे. पण तिच्या कथेची ऐतिहासिक पार्श्वभूमी तशी अज्ञातच आहे. हजारो वर्षांपूर्वीचे पिरॅमिडस् आज इजिप्तमध्ये अस्तित्वात आहेत. पण अवघ्या दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या ह्या राणीचे स्मारक नाही. सीझरकालीन रोमचे काही भग्न अवशेष, तिच्या अस्तित्वाचा काही अप्रत्यक्ष पुरावा सादर करतात एवढेच!

क्लिओपॅट्रा हे एक रमणीय गूढ आहे! प्राचीन कालापासून आजतागायत अनेक कवी, कथालेखक, नाटककार, ह्यांनी तिला साकार करण्याचा प्रयत्न करून जगाच्या वाङ्मयात बहुमोल भर घातली आहे. सीझर-क्लिओपॅट्रा-अँटनी हा अद्भुत त्रिकोण आहे. दोन रोमन योद्ध्यांना, आपल्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी कामाला जुंपण्याचा घाट तिने घातला. आपल्या दिव्य लावण्याची मोहिनी ही तिची मात्रा आहे.

ह्या तिघांनाही अलौकिक दैवी गुणसंपत्ती अपरंपार आहे. पण मानवसुलभ हीन आशा-आकांक्षांच्या आहारी गेल्यामुळे तिघांचाही संपूर्ण अध:पात झाला. जगाचा इतिहास बदलू इच्छिणाऱ्या, रोमन योद्ध्यांकरवी रोमन साम्राज्याची सम्राज्ञी बनू इच्छिणाऱ्या, महान सौंदर्यशाली महत्त्वाकांक्षी राजकारणपटू पण दुर्दैवी अशा इजिप्तच्या राणीची ही करुण कथा आहे.

*क्लिओपॅट्रा हा चित्रपट एकेकाळी खूप गाजला. 'हा चित्रपट ज्यांनी पाहिला असणार त्यांनी हे पुस्तक वाचालयाच हवे आणि चित्रपट पाहिला नसेल तर मग हे पुस्तक वाचल्याशिवाय गत्यंतर नाही.' असे ज्याबद्दल ठोसपणे म्हटले गेले, अशी ही साहित्यकृती. दत्त आपटे यांनी लिहिलेली क्लिओपॅट्राची ही संक्षिप्त कथा, 'चेतक पुस्तके' मालिकेत मुंबईच्या ढवळे प्रकाशकांनी १९६९ साली प्रकाशित केली. त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ उपलब्ध झाले नाही, ते कल्पनेने येथे दिले आहे.*

| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | महत्त्वाकांक्षी राजकन्या | ३५२ |
| २ | पॉंपीचा शेवट | ३५६ |
| ३ | सीझर आणि क्लिओपॅट्रा | ३५९ |
| ४ | सीझरचे प्रयाण व पुढे.. | ३६३ |
| ५ | पुढचे पाऊल | ३६७ |
| ६ | क्लिओपॅट्राची चिंता | ३७१ |
| ७ | सीझरचा वध | ३७५ |
| ८ | आणि पुढे... | ३७९ |
| ९ | अँटनी आणि क्लिओपॅट्रा | ३८३ |
| १० | पराभव | ३८७ |
| ११ | शेवट | ३९१ |




# क्लिओपॅट्रा

## १. महत्त्वाकांक्षी राजकन्या

जगज्जेत्या अलेक्झांडरने इजिप्त देश जिंकला आणि त्या ठिकाणी आपला मॅसिडोनियन सेनापती टॉलेमी ह्याची नियुक्ती केली. इजिप्तच्या कारभाराची सूत्रे हाती येताच टॉलेमीने इजिप्तचे राजपदच आपणाकडे घेतले व आपल्या धन्याच्या स्मरणार्थ अलेक्झांड्रिया ह्या बंदरनगराची उभारणी केली.

नाईल नदीच्या मुखावर भूमध्य समुद्राच्या किनारी ह्या नगराची उभारणी झाली असल्याने ग्रीस व इजिप्त ह्या दोन देशांतील व्यापाराला ह्या बंदरामुळे चांगलीच चालना मिळाली आणि ह्या नगराचीही भरभराट झाली. तत्कालीन जगात ह्या नगराच्या सौंदर्याला तोड नव्हती. ह्या नगराची संपत्ती व त्याचा सांस्कृतिक दर्जा ही जगन्मान्य होती. राजा टॉलेमीने ह्या नगराला सौंदर्य, कला, संस्कृती ह्यांची जोड देण्यासाठी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती.

ह्या नगराचे प्रमुख असे दोन भाग होते. किनाऱ्यालगतचा भाग बुकीयान म्हणून ओळखला जाई. पांढऱ्या शुभ्र संगमरवरी प्रासादांची एक मालिकाच ह्या भागात खडी होती. भूमध्य समुद्राच्या निळ्याशार पाण्याच्या पृष्ठभागावर हेलावणारी त्यांची सुंदर प्रतिबिंबे मोठी उठून दिसत.

ह्या प्रासादांमधून राजनैतिक कारस्थानांचे अड्डे चालत. येथील प्रेक्षागृहांत एकाच वेळी वीस वीस हजार प्रेक्षक बसून करमणुकीचे कार्यक्रम, शर्यती पाहू शकत. ग्रीक देवतांची भव्य मंदिरेही ह्याच विभागात होती. ग्रीक प्रेमदेवता अफ्रोडाईड हिचे मंदिर म्हणजे रंगेल तरुणतरुणींचे आवडते भेटींचे स्थान होते.

अलेक्झांड्रिया बंदरापासून जवळच असलेल्या एका बेटावर तत्कालीन जगातील महदाश्चर्य उभे होते. हे आश्चर्य म्हणजे सुमारे साडेपाचशे फूट उंचीचे पांढरे शुभ्र संगमरवरी दीपगृह होय. ह्या दीपगृहाचा प्रकाश सागरावरील खलाशांना पस्तीस-चाळीस मैलांवरून दिसू शके.

नगराजवळच असलेल्या टेकडीवर ग्रीक देवतेचे एक मंदिर असून त्याची रचना रोम नगरीमधील ज्युपिटरच्या मंदिराप्रमाणे आकर्षक व भव्य होती. ह्या मंदिरामधून अलेक्झांड्रियाचा एकूण परिसर दृष्टिपथात येई.

अलेक्झांड्रियाच्या ह्या रमणीय परिसरात सुमारे दहा लाख लोकवस्ती नांदत होती. व्यापार, अगणित संपत्ती, अनेकविध जातीजमाती ही ह्या नगराची खास वैशिष्ट्ये होती. ह्या नगरातील जनतेला राष्ट्रीयत्वाची जाणीव नव्हती; कारण जगाच्या सर्व भागांतून ती येथे गोळा झालेली होती. हे लोक व्यापारधंद्यासाठी येथे आले होते. संपत्तीसंचय व तदनुषंगिक चैन एवढीच त्यांची जीवनमूल्ये होती. विविध प्रकारची खाद्यपेये चाखण्यात त्यांना खरा रस होता. ह्या चैनी लोकांना लुबाडण्यासाठी आलेल्या

अनेकदेशीय वेश्या ह्या नगराची शोभा होऊन बसल्या होत्या. नैतिक जीवन ह्या शहराला पारखे झाले होते. चैन व बेताल जीवन ही ह्या नगरीचा स्थायीभाव होऊन राहिली होती.

ह्या नगराच्या पलीकडे दूरवर इजिप्तचा खरा-खुरा भूमीभाग पसरला होता. ह्या प्रदेशात जन्माला येणारी, खपणारी व मरून जाणारी अफाट जनता ह्या नगराला अपरिचित होती, अज्ञात होती. मातीच्या खोपटांतून नांदताना व इजिप्तच्या प्रखर उन्हात राबून करपून जाताना ह्या प्रजेचे काय हाल होत असतात, ह्याची कल्पना ह्या नगरातील चैनी लोकांना असण्याचे काहीच कारण नव्हते. कधी पूर तर कधी कोरडे दुष्काळ; लग्न-जन्म-मृत्यू, मानवी जीवनाच्या एवढ्याच तऱ्हा त्यांना माहीत होत्या.

अशा ह्या दरिद्री जनतेला पिरगाळून तिचे धान्य व तिचे किडूक-मिडूक शोषून नेण्यासाठी राजदूत येत व ह्या नगराची भर करीत. असे हे हजारो वर्षे चालू होते.

टॉलेमीने ह्या नगराची उभारणी केली. आपल्या आधिपत्याखाली आलेल्या ह्या भूमीभागाची भरभराट करावी म्हणून अनेक योजना त्याने आखल्या. पण त्याच्या मृत्यूनंतर मात्र साराच जमाना पालटला. त्याच्या वंशातील पुढील प्रत्येक राजा दुबळा, मूर्ख व भित्रा निपजला. राजवंशाचे नाव टॉलेमी तेवढेच काय ते शिल्लक राहिले होते; पण मूळच्या टॉलेमीची सर पुढे कोणालाच आली नाही.

बाराव्या टॉलेमीने तर आपल्या साऱ्या पूर्वजांवर कडी केली. त्याने आपल्या हाताने आपली सर्व सत्ता संपुष्टात आणून घेतली. पॉंपीच्या नेतृत्त्वाखाली उदयाला आलेले रोमन साम्राज्य एक दिवस आपणांस ग्रासून टाकणार, ह्या भीतीने त्याने इजिप्तला रोमन साम्राज्याच्या संरक्षणाखाली घालण्याचा निर्णय केला. त्याचा हा निर्णय त्याला व रोमच्या राज्यकर्त्यांनाच काय तो माहीत होता.

त्याचा मुलगा तेरावा टॉलेमी हा गादीवर आला, तेव्हा कोठे त्याला कळून आले, की आपली राजसत्ता आपल्या बापाने रोमकडे केव्हाच गहाण टाकली आहे. मद्यप्राशन व वेणूवादन ह्यांतच तो रममाण होऊन गेला. राजा म्हणून कोणतीच महत्त्वाकांक्षा त्याला राहिली नाही. त्याच्या प्रासादात जाणाऱ्या कोणालाही, केव्हाही त्याच्या बासरीचे स्वर ऐकावयास मिळत.

पण इकडे रोममध्ये त्याला अनुकूल अशा काही घटना घडू लागल्या. रोमने चालविलेल्या अनेक लढायांमुळे रोमचा खजिना रिता झाला होता व त्याची दृष्टी इजिप्तच्या खजिन्याकडे वळू लागली होती. पॉंपी व नव्यानेच उदयाला रोमन योद्धा ज्युलियस सीझर ह्यांच्यामध्ये सत्तास्पर्धा चालू झाल्याने दोघेही इजिप्तचा अनुनय करण्याच्या विचारात होते. युलेटिसने (तेराव्या टॉलेमीने) सीझरला सहा लाख सुवर्णमुद्रा देऊन त्याचा स्नेह संपादन करण्यात यश मिळविले.

पण ही देणगी सीझरला पोचते न पोचते तोच, करांच्या ओझ्याला कंटाळलेल्या इजिप्शियन जनतेने बंड केले व भ्यालेला युलेटिस घाईघाईने परागंदा झाला. त्याच्या पहिल्या बायकोची मुलगी बर्नीस हिने ह्या संधीचा फायदा घेऊन, इजिप्तची राजसत्ता आपणाकडे घेतली. परागंदा राजाने रोमचा आश्रय घेतला व बरोबर नेलेला सर्व खजिना त्याच्या चरणी अर्पण करून, साहाय्याची याचना केली; आपल्याला पुन्हा इजिप्तमध्ये सत्तारूढ करावे, म्हणून गळ घातली.

ह्या वेळी सीझर गॅलीक लढायांत गुंतला होता. रोममध्ये असलेल्या पॉंपीने टॉलेमीच्या देणगीविषयी फारशी आस्था दाखविली नाही, पण त्याला आश्रय मात्र देऊ केला. आपला पिता रोमच्या आश्रयाने परत येऊन इजिप्तचे राजेपद मिळविण्याचा प्रयत्न केल्यावाचून राहाणार नाही, ह्याची कल्पना बर्नीसला होती. आपणावर ही आपत्ती येऊ नये, म्हणून तिने हालचालींना सुरुवात केली. रोमशी संबंध प्रस्थापित करून ह्यासंबंधी काही वाटाघाटी कराव्या, म्हणून तिने आपले दूतही रोमच्या दिशेने रवाना केले. पण तिच्या पित्याची तिच्या हालचालींवर दृष्टी होतीच. तिचे दूत रोमच्या मार्गावर असताना तिच्या पित्याच्या हस्तकांनी वाटेतच त्यांचा घात केला.

आणि मग एके दिवशी राजा टॉलेमी रोमन सेना दिमतीस घेऊन आपल्या कन्येविरुद्ध इजिप्तवर चाल करून आला. आपल्या मुलीचा वध करून त्याने इजिप्तची राजसत्ता संपादन केली. रोमन सैनिकांच्या साहाय्याने त्याने आपल्या राज्यात संपूर्ण शांतता प्रस्थापित केली.

रोमन सेनेचे नेतृत्त्व करण्यासाठी मार्क अँटनी हा रोमन योद्धा टॉलेमीबरोबर इजिप्तमध्ये आला होता.

रोममधून निघताना ह्या तेराव्या टॉलेमीने आपले मृत्यूपत्र रोमदरबारी दाखल करून ठेवले होते. ह्या मृत्यूपत्रान्वये त्याने आपल्या पश्चात आपल्या गादीचा वारसा आपली मुलगी व मुलगा ह्यांना संयुक्तपणे देऊ केला होता. आपल्या ह्या इच्छेला एक प्रकारे हमी मिळावी, म्हणून त्याने राजकन्या व राजपुत्र ह्यांच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी रोमवर टाकली होती व त्यासाठी रोम दरबारला अगणित संपत्तीही देऊ केली होती.

आपल्या राजाची ही संयुक्त वारसाची कल्पना इजिप्तच्या जनतेला अमान्य होण्याचे काहीच कारण नव्हते. इजिप्तच्या राजघराण्यातून ही परंपरा फार प्राचीन कालापासून चालत आलेली होती. फार काय, अशा संयुक्त वारशामध्ये पति-पत्नीचे संबंध निर्माण होऊन राजपुत्र व राजकन्या ह्यांचे राजा-राणीत परिवर्तन झाल्याचे दाखलेही होते. राजकन्या  क्लिओपॅट्रा व राजपुत्र टॉलेमी ह्यांच्या संयुक्त वारशाचे असे काही पर्यवसान झाले असते, तरीही इजिप्शियन जनतेला त्याचे आश्चर्य वाटले नसते.

पण ह्या उभयतांत असणारी भिन्नता अशी काही विलक्षण होती, की राजपुत्र व राजकन्या ह्यांचा संयुक्त वारसा यशस्वी होण्याची शक्यता फारच कमी होती. राजपुत्र टॉलेमी वंशातील असला, तरी तो क्षुद्र बुद्धीचा, आळशी व बिघडलेला मुलगा होता. त्याची वडील बहीण क्लिओपॅट्रा मात्र राजतेजाने चमकून दिसे. तिचे बुद्धिचापल्य व आकलनशक्ती लोकविलक्षण होती.

प्राचीन इजिप्शियन रूढीप्रमाणे आपला विवाह आपल्या ह्या वेडगळ लहान भावाशी होऊ नये, म्हणून खुद्द क्लिओपॅट्राच संपूर्ण दक्षता घेऊन होती. एवढेच नव्हे; तर त्या उभयतांत चांगलेच हाडवैर निर्माण झाले होते. ती वयाने तर मोठी होतीच, पण अर्थशास्त्र व राज्यशास्त्र ह्यांमधील तिची पारंगतता तिच्या वयाच्या मानाने आश्चर्यजनक होती. अलेक्झांड्रियन जनता आपल्या ह्या राजकन्येकडे मोठ्या कौतुकादराने पाही आणि ह्यामुळेच तिच्या भावाला तिचा मोठा मत्सर वाटे.

तेराव्या टॉलेमीने आपल्या पुत्राच्या शिक्षणाकरिता एक सोडून तीन शिक्षक नियुक्त केले होते; पण ह्या शिक्षकांनी राजाला शिक्षित करण्यापेक्षा हा राजपुत्र अडाणी कसा राहील, ह्याचीच ज्यास्त खबरदारी घेतली; कारण त्याच्या बापाच्या मृत्यूनंतर इजिप्तच्या राज्यकारभाराची सूत्रे ह्या मुलाच्या नावाखाली आपल्या हाती कशी राहातील ह्याचीच त्यांना काळजी होती. क्लिओपॅट्राची बुद्धिमत्ता ते जाणून असल्याने तिला मार्गातून दूर करण्यासाठी तिचा द्वेष करण्याची शिकवण ते आपल्या शिष्याला कसोशीने देत.

रोमन सेना परत जावी, तेरावा टॉलेमी मरण पावावा व मग राजपुत्राला हाताशी धरून इजिप्तवर सत्ता गाजवावी, असा साजूक बेत ह्या तिघांनी आखला होता. आश्चर्य म्हणजे, तिघेही तीन देशांचे असून, ह्या एका प्रश्नावर तिघांचेही एकमत होते. ग्रीक शिक्षकाचे नाव थिडोटस् असून दुसरा अचिलस् हा इजिप्शियन होता व त्याच्याकडे सेनापतीपदही होते. तिसरा पोथेनिस् हा खोजा असून राजपुत्राच्या शरीररक्षकाचे कामही त्याच्याकडेच होते. राजपुत्राच्या कल्याणाची व संरक्षणाची सर्व जबाबदारी जणू आपणावरच आहे, असे भासविण्यात तिघेही वाकबगार होते. पण अंत:स्थरीत्या इजिप्तची सत्ता हाताळण्याची संधी केव्हा मिळते, ह्याची ते वाट पाहात. ते वारंवार गुप्त बैठका भरवीत, खलबते करीत व रोममध्ये चालू असलेल्या घडामोडींवर बारकाईने लक्ष देऊन असत. आणि त्यांच्या सुदैवाने त्यांना हवी असलेली संधी चालून येणार, अशी चिन्हे दिसू लागली.

रोमन सेनानी मार्क अँटनी आपली कामगिरी आटोपून राजवाड्यातून बाहेर आला, तो मुळी स्वप्नांत चालल्याप्रमाणे सुंद होऊनच. त्याच्या मुद्रेवर विलक्षण समाधान झळकत होते; पण डोक्यात काहीतरी विलक्षण विचारचक्र फिरत असावे, ह्याचीही कल्पना येत होती.

''मार्क अँटनी, आज एवढी खुशी का? कसला एवढा विचार चालला आहे?'' वाटेत भेटलेल्या त्याच्या कायसस् ह्या सहकाऱ्याने विचारले.

''विशेष काही नाही, पण इजिप्तच्या राजकन्येचा परिचय होण्याचा योग आज आला.''

''ती चौदा-पंधरा वर्षांची पोरगी! ना ग्रीक ना इजिप्शियन!''

''पोरगी विलक्षण सुंदर आहे, एवढं खास. तिची वंशावळ विचारांत घेऊन मला काय करायचं आहे.''

''बराच बावचळलेला दिसतोस?''

''जगात ह्या सौंदर्याला तोड नाही. ते एक नाजूक उमलतं फूल आहे!'' अँटनी बरळला.

''पण ते ह्यापुढे तुझ्या दृष्टीस पडण्याची शक्यता नाही!''

''का?''

''आपणांस तत्काळ रोमला परत येण्याविषयी खलिता घेऊन जासूद आला आहे.''

''ऑऽ? ते का?''

''पाँपी आणि ज्युलीयस सीझर ह्यांच्यात यादवी युद्धाला तोंड लागलं असून, तू तत्काळ साहाय्याला यावंस, अशी सीझरची इच्छा आहे.''

अँटनी पुढे काहीच बोलला नाही. ते उभयता लगबगीने आपल्या तळावर येऊन दाखल झाले.

पुढे दोन-चार दिवसांत एका दुय्यम अधिकाऱ्याच्या हाताखाली थोडीफार रोमन सेना राज्याच्या दिमतीस ठेवून अँटनी आपली रोमन सेना घेऊन परत फिरला. रोमन सेना निघून जाताच अलेक्झांड्रियन जनतेला हायसे वाटले. राजपुत्राचे तीनही गुरू ह्या घटनेने कमालीचे संतुष्ट झाले.

रोमन सेना निघून गेल्यास उणेपुरे चार महिनेही लोटले नाहीत तोच राजा तेरावा टॉलेमी अनपेक्षितपणे कालवश झाला. राजपुत्राच्या शिक्षकांचा ह्या घटनेशी काही संबंध होता किंवा नाही, हे कळण्यास मार्ग नव्हता. रोममधील यादवी युद्धांत कोणाची सरशी होणार? इजिप्तचे सहकार्य कोणी मागितल्यास काय करावे? तसे ते द्यावयाचे झाल्यास कोणास द्यावे? ह्याविषयी रात्रंदिवस त्यांची खलबते झडत असत.

''ज्युलियस सीझर चांगला सेनापती आहे. पण तो शुद्ध नरराक्षस आहे. त्याने आतापर्यंत कित्येक स्त्रियांवर अत्याचार केला आहे. त्याला साहाय्य करून विजयी करणं, म्हणजे एक दिवस इजिप्तचाही बळी देण्याची तयारी करणंच होय.'' ॲचलिस् म्हणाला.

''पण मला वाटतं, आता पाँपीची बाजू घेण्यात अर्थ नाही. त्याच्यात आता दम राहिलेला नाही. आपलं साहाय्य त्याला विजयी करू शकणार नाही आणि त्यामुळे सीझरचं अकारण शत्रुत्व मात्र आपण ओढवून घेऊ! थेरड्या पाँपीची बाजू घेणं, म्हणजे आत्मघाताची तयारी करणंच होय!'' थिडोटस्‌ने आपला अभिप्राय व्यक्त केला.

''रोमच्या यादवीतील प्रत्येक पक्ष आपणांकडे साहाय्याची मागणी करणार हे स्पष्ट आहे. आपला निर्णय त्वरित ठाम करणं भाग आहे.'' पोथॅनिस् उद्गारला.

ह्या त्रिकूटाच्या खलबतानंतर थोड्याच दिवसांत पाँपीचा दूत इजिप्तच्या दरबारी येऊन दाखल झाला. इजिप्तकडून त्याने सैन्य, पैसा, आरमार ह्या साऱ्याच गोष्टींची मागणी केली होती.

आणि मग इजिप्तचा राजपुत्र व त्याचे तिघे सल्लागार विचारात पडले. क्लिओपॅट्राचे व त्यांचे ह्या प्रश्नावर एकमत होईना. वारंवार खटके उडू लागले. आपल्या सल्लागारांच्या सल्ल्याने राजपुत्राने इजिप्तचा संयुक्त वारसा धुडकावून आपण एकटेच इजिप्तचे राजे असल्याचे घोषित केले.

ही चांडाळचौकडी आपला घात केल्यावाचून राहाणार नाही, ह्याची क्लिओपॅट्राला कल्पना असल्याने, तिने इजिप्त सोडण्याचा निर्णय केला.

मोजके पण विश्वासू सैनिक आणि बरीच मौल्यवान चीजवस्तू घेऊन तिने एका रात्री इजिप्त सोडून सीरियाकडे प्रयाण केले. आज ना उद्या आपण इजिप्तमध्ये परत येऊ शकू व इजिप्तची स्वामिनी बनू शकू, असा ठाम विश्वास त्या महत्त्वाकांक्षी राजकन्येला वाटत होता.

सीरियात तिने बरोबर आणलेल्या संपत्तीच्या जोरावर सैनिक गोळा करण्यास सुरुवात केली. अल्पावधीतच सीरियातील तिचा तळ असंख्य सैनिकांनी गजबजलेला दिसू लागला.

●●●

## २. पाँपीचा शेवट

क्लिओपॅट्रा परागंदा झाली आणि इकडे रोममधील यादवी युद्ध निर्णायक स्वरूप धारण करू लागले. ज्यूलियस् सीझरने जवळ जवळ सर्व इटलीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करीत आणले होते. पाँपीने माघार घेत-घेत ऑडिआटिक समुद्र ओलांडून थिसलीचा आश्रय केला होता.

पाठोपाठ सीझरही त्याच्यावर चाल करून आला. मार्गात सीझरच्या आरमाराला वादळाने चांगलाच तडाखा दिला. त्याचा तांडेल अगदी गर्भगळित होऊन गेला होता; पण सीझर त्याला धीर देऊन म्हणाला, ''कशाची भीती? कशाची पर्वा? अरे, ह्या गलबतावर सीझर आणि त्याचं दैव आहे, हे विसरू नकोस!''

आणि मग ह्या वादळातून सीझरचे आरमार सुखरूप पार पडले. फरसालियाच्या समरभूमीवर ह्या यादवी युद्धाचा त्याने शेवट लावला. पाँपीच्या प्रचंड सेनेचा त्याने आपल्या छोटेखानी सेनेच्या साहाय्याने निर्णायक पराभव केला, एवढेच नव्हे, तिचा संपूर्ण नाश केला. कोणाचा का जय-पराजय होईना, पण ह्या यादवी युद्धामुळे रोमन जनता अपरंपार कष्टी झाली. रोमन सैनिकच आपापसांत लढून मेले होते. केवळ पाँपी मोठा, की सीझर मोठा हे ठरविण्यासाठी रोमन सैनिकांचे रक्त सांडण्यात आले होते.

पाँपी, त्याची पत्नी कार्नेलिया व एकुलता एक मुलगा ह्या पराभवाने वनवासी झाली व ती आश्रयासाठी सागरमार्गाने अलेक्झांड्रियाकडे येण्यास निघाली. सीझरच्या तावडीतून त्यांचे गलबत कसेबसे निसटले. इजिप्तच्या राजवटीला एका काळी आपण आश्रय दिला होता, एवढ्याच एका आशेवर पाँपीने हा मार्ग पत्करला होता.

इजिप्तच्या राजाच्या तिघाही सल्लागारांना ह्याचा अंदाज आला होता. पाँपीचे गलबत कोणत्याही क्षणी अलेक्झांड्रिया बंदरात दाखल होण्याची शक्यता होती व तसे घडल्यास काय करावे, हाच त्यांच्यापुढे प्रश्न पडला होता.

''पण मला वाटतं, साठी उलटलेल्या ह्या थेरड्याला आश्रय देण्यात काहीच अर्थ नाही! त्याचं गलबत आलंच, तर जसंच्या तसंच परतवून लावावं.''

''तसं करणं चूक व शिष्टाचाराशी विसंगत दिसेल. त्याला येऊ द्यावं. पण सीझरने मागणी केल्यास त्याला त्याच्या स्वाधीन करून मोकळं व्हावं! आज त्याला परतवून लावण्याने त्याला दुखवल्याप्रमाणे होईल व कदाचित सीझरच्या हातची शिकार निसटली म्हणून तोही नाराज होईल. त्यापेक्षा ही युक्ती अधिक बरी! त्याला बंदरात येऊन द्यावं. तो परागंदा असल्याने त्याचं स्वागत शाही पद्धतीने न करता थंड करावं, म्हणजे झालं.''

अशा रितीने एका ऐतिहासिक पुरुषाचे भवितव्य ठरविण्याचे काम दुर्दैवाने ह्या तीन ठगांकडे आले होते. आणि एक दिवस पाँपीचे गलबत अलेक्झांड्रिया बंदरात येऊन दाखल झाले.

कोळ्याच्या एका छोट्या होडीतून ॲचिलस् त्याच्या स्वागतासाठी त्याच्या गलबताकडे गेला. आपल्या आश्रयास राहिलेल्या टॉलेमीच्या वारसाने आपल्या स्वागताची ही उपेक्षा करावी, हे पाँपीला अपमानास्पद वाटले. पण अडचणीत असल्याने अल्पवयी राजाला दरबारी रीती-रिवाज माहीत झाले नसतील, अशी त्याने आपली समजूत करून घेतली व त्या मासेमारी होडीतून किनाऱ्यावर येण्यास तो तयार झाला. त्याला हा उपमर्द सहन करणे भाग होते. एकेकाळी आपली मनधरणी करणारी इजिप्तमधील ही सत्ताधारी माणसे काय दानतीची आहेत, हे त्याच्या ध्यानी आले असले, तरी ह्या घटकेला काही बोलणे उचित नव्हते व उपयोगीही नव्हते. त्याची पत्नी त्याचे हे उपमर्दकारक स्वागत पाहात गलबतावर खिन्न मनाने उभी होती.

ॲचिलस्ने पाँपीला किनाऱ्यावर उतरवून घेण्यासाठी साहाय्याचा हात दिला. पाँपी किनाऱ्यावर उडी घेणार, एवढ्यात सेप्टीमस् नावाच्या बदमाषाने त्याच्या पाठीत भयानक सुरामारी केली. जणू काही ही नाट्यमय घटना पूर्वनियोजितच होती. सुऱ्याचा आघात एवढा जबरदस्त होता, की पाँपीला दु:खोद्गार काढण्याचाही अवसर मिळाला नाही. तो धाडकन् किनाऱ्यावर पालथा पडला व गतप्राण झाला. गलबतावरून हा प्रकार पाहाणाऱ्या कार्नेलियाने - त्याच्या पत्नीने - मारलेली किंकाळी किनाऱ्यावरील

सर्वांची अंत:करणे भेदून गेली आणि मग पाँपीचे गलबत परत फिरले. अनुकूल वाऱ्याच्या साहाय्याने झपाट्याने पाणी कापीत इटलीच्या दिशेने ते दिसेनासे झाले.

पाँपीवर खुनी हल्ला चढविणाऱ्या बदमाषांनी त्याचे शिर कापून नेले व धड समुद्रात भिरकावून दिले. पुढे दोन-तीन दिवस पाँपीचा शिरविहीन मृतदेह सागरलाटांबरोबर किनाऱ्यावर आदळ-आपट करताना दिसत होता. त्याचा एकनिष्ठ सेवक फिलफ ह्याने काही रोमन लोकांच्या सहकार्याने त्याचा अंत्यविधी कसाबसा उरकला.

पाँपीचा निकाल लागला, पण आता सीझरचा उदय इजिप्तच्या राजवटीला भेडसावू लागला. सीझर आता रोमचा सर्वाधिकारी झाला होता. त्याचे लक्ष आज ना उद्या इजिप्तकडे वळणार, हे उघड सत्य होते आणि ते प्रत्ययास येण्यास मुळीच विलंब लागला नाही.

सीझर अलेक्झांड्रिया बंदरात येऊन दाखल झाला. तो आला तो आपल्या प्रचंड सामर्थ्याचे प्रदर्शन करीतच. पहिल्या झपाट्याला त्याने आपले दोन रोमन सेनाविभाग इजिप्तच्या किनाऱ्यावर उतरविले. ह्या विजयशाली रोमन सैन्याचा दिमाख काही और होता. सीझरच्या खास शरीरसंरक्षक दलातील आठशे कडवे जर्मन घोडेस्वारही बंदरात येऊन दाखल झाले. युद्धाची भयानकता काय असू शकते, ह्याचे प्रत्यंतर आणून देण्यास हे सैनिक पूर्ण समर्थ आहेत, ह्याची कल्पना त्यांच्या नुसत्या दर्शनानेच येत होती.

सीझर - जगप्रसिद्ध ज्यूलियस सीझर- आपल्या प्रचंड आरमारासह अलेक्झांड्रिया बंदरात येऊन दाखल झाला. राजप्रासादातून निघून बंदरात सागराला येऊन भिडलेल्या संगमरवरी पायऱ्यांवर येऊन तो उभा राहिला.

अलेक्झांड्रियाची तमाम जनता बंदरात गोळा होऊन औत्सुक्याने त्याच्याकडे पाहात होती; पण ती त्याच्या व्यक्तिमत्वाने दिपल्याप्रमाणे मात्र झाली नाही. त्याची शरीरयष्टी भव्य होती, कसलेल्या योद्ध्याला साजेशी होती; पण त्याच्या डोक्याच्या मध्यावर असलेल्या टक्कलाच्या चांदव्यामुळे जरा मार खात होती.

ॲचिलस्‌ने तळपायऱ्यांशी सीझरचे स्वागत केले. त्याला घेऊन तो राजवाड्यात गेला. पण तेथे गेल्यानंतर त्याला एकदम राजापुढे न नेता, त्याने त्याला एका लहानशा बैठ्या खोलीत नेले व तेथे बसण्याची विनंती केली. आपल्या स्वागतास राजा आला नाही, किंवा आपणास एकदम राजाच्या भेटीस नेण्यात आले नाही, ही गोष्ट सीझरला - रोमच्या ह्या सर्वाधिकाऱ्याला - चांगलीच खटकली. तो विचारात पडला. एवढ्यात उरलेले दोघे राजसल्लागार आत आले.

मोठ्या नम्रतेचा आविर्भाव करीत ॲचिलस् म्हणाला, ''हे थोर पुरुषा, आमच्या राजाने देऊ केलेला अहेर मी प्रथम अर्पण करीत आहे.'' ह्या भाषणानंतर त्याने खूण करताच एक सेवक एक सुबक टोपली घेऊन आत आला व मोठ्या अदबीने त्याने ती टोपली सीझरपुढे ठेवली. सीझरने टोपली उघडली मात्र, तो भयचकित होऊन एकदम मागे सरला. त्याने कठोरपणे एकदा त्या तिघांकडे पाहिले व विचारले, ''हे दुष्ट कृत्य कुणी केलं? माझ्या प्रश्नाचं उत्तर मला मिळालंच पाहिजे!'' तो ताठ उभा राहिला, मेघाप्रमाणे गर्जू लागला.

''महाराज, महाराज, तो आपला शत्रू होता!''

''होय! पण तो रोमन होता, रोमन सेनानी होता! आणि तो तुमच्याकडे आश्रयासाठी आला होता!''

खवळलेल्या सीझरने गडगडाट केला.

''पऽपऽपण ... पण... '' ते तिघेही चांचरू लागले. सीझरचा रुद्रावतार पाहून हबकून गेले.

''तुम्ही त्याचं असं स्वागत केलंत काय? कुठे आहे तुमचा तो राजा?''

भेदरलेल्या त्या तिघांनी सीझरला दिवाणखान्यात आणले. इजिप्तचा पोरसवदा राजा तेथे वस्त्रालंकारांनी नटून सिंहासनावर बसला होता. शिकविल्याप्रमाणे पोराने राजाचे अवसान आणण्याचे ठरविले होते. पण हा धिप्पाड योद्धा पुढे खडा होताच त्याचे अवसान गळाले. त्याची घाबरगुंडी उडाल्याचे स्पष्ट दिसू लागले.

''राजेसाहेब, मला तुमच्याशी काही बोलायचं आहे.'' सीझर त्या पोरसवदा राजाला उद्देशून म्हणाला. पोराने काही बोलण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच सीझर तुसडेपणाने म्हणाला, ''दोन सरकारांच्या प्रमुखांमध्ये चाललेलं संभाषण इतर सामान्य माणसांनी ऐकू नये अशी माझी इच्छा आहे!''

सीझरच्या आवाजातील हुकमी करारीपणा पाहून पोरगा चांगलाच हबकला, च् च् प् प् करू लागला.

पुढे त्या उभयतांचे काय बोलणे झाले ते कळण्यास काहीच मार्ग नाही; पण एवढी गोष्ट खरी, की इजिप्तचा राजा भीतीने पांढराफट् पडला होता, थरथर कापत होता आणि सीझरचे नाव ऐकताच त्याची भीतीने बोबडी वळत होती.

पॉंपीला देण्यात आलेल्या वागणुकीविषयी सीझरने इजिप्त दरबारची चांगलीच खरडपट्टी काढली. त्याच्या मस्तकाला त्याने गौरवपूर्वक अग्नी दिला. त्याची रक्षा एका खास कलशामधून रोमकडे सन्मानपूर्वक रवाना केली. हे सर्व करीत असताना त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले होते.

ह्यानंतर सीझरने आपले खरे अस्तित्व प्रकट करण्यास सुरुवात केली. रोमन सैनिकांना रास्त वागणूक दिली नाही, म्हणून काही इजिप्शियन अधिकाऱ्यांचा त्याने बेधडक शिरच्छेद केला. आपल्या सैनिकांकरवी अलेक्झांड्रिया नगरात त्याने असे काही तुफानी संचलन घडवून आणले, की काही आगळीक झाल्यास हे नगर धुळीला मिळाल्यावाचून राहाणार नाही ह्याची अप्रत्यक्ष समजच नागरिकांना व इजिप्त दरबाराला मिळाल्याप्रमाणे झाले. मामला एकदम बदलला. हां हां म्हणता सीझरची मर्जी संपादण्यासाठी नागरिकांची चढाओढ चालू झाली. नेहमीच सत्तेच्या बाजूने असणारे व्यापारी, राजकारणी, विद्वान(?) सीझरच्या भोवती गोळा झाले. त्याचा उदोउदो करू लागले. त्याला बातम्या पुरवू लागले.

''सीझरने पाहिले! सीझरने जिंकले!!'' ह्या वाक्यप्रचाराचे प्रत्यंतर इजिप्तमध्ये येऊ लागले, त्याची सत्यता पटू लागली.

आशिया व आफ्रिका ह्या खंडांना सांधणाऱ्या, भूमध्य समुद्राच्या किनारी असलेल्या एका भूमीभागावर क्लिओपॅट्राच्या सैनिकांचा तळ पडला होता. पैशाच्या जोरावर तिने ह्या भाडोत्री सैनिकांची भरती केली होती. इजिप्त सर करावा, अलेक्झांड्रियात दाखल व्हावे, सिंहासन हस्तगत करून इजिप्तची सम्राज्ञी बनावे, अशी तिची महत्त्वाकांक्षा होती.

एके दिवशी ती आपल्या तंबूत विचार करीत बसली असतानाच तिच्या घोडदळाचा प्रमुख अधिकारी स्कोनीस् आत आला व अदबीने लवून मुजरा करून म्हणाला, ''राणीसाहेब, आपणासाठी खलिता आला आहे.''

''कोणाकडून?''

''ज्यूलियस् सीझरकडून!''

''सीझरकडून!'' राणी आश्चर्याने उद्गारली. तिने घाईघाईने तो मोहोरबंद लखोटा हाती घेऊन फोडला व भरकन् वाचून टाकला.

क्लिओपॅट्राने अलेक्झांड्रियात येऊन सीझरला भेटावे, अशी अपेक्षा खलित्यात व्यक्त करण्यात आली होती.

''ह्या आमंत्रणाचा अर्थ काय? माझ्या दुष्ट भावाच्या नगरात प्रवेश करताना मला लढावं लागेल, कदाचित् प्राणास मुकावं लागेल, हे सीझरला माहीत नाही काय?'' जागची उठून क्लिओपॅट्रा एकदम म्हणाली.

''सरकार, आपली भेट घेण्यात सीझरचा काही निराळाच उद्देश असेल. आपल्या पिताजींचा व त्याचा ऋणानुबंध विचारात घेता त्याला काही विचारणाही करायची असेल.'' स्कोनीस् उद्गारला.

''ते काही असलं तरी मी ह्या नगरात प्रवेश करणार कशी व सीझरपर्यंत जाऊन पोचणार कशी, हाच तर प्रश्न आहे.'' ह्यानंतर राणीने आपला विश्वासू सीरियन नोकर अपोलोडोरस् ह्याला हाक मारली व त्याला मोठ्या विश्वासाने काही कामगिरी सांगितली.

ह्यानंतर आठच दिवसांनी क्लिओपॅट्रा अलेक्झांड्रिया बंदरात येऊन दाखल झाली. ज्या संगमरवरी पायऱ्यांवर सीझर येऊन उतरला होता, त्याच ठिकाणी तिची होडीही येऊन थडकली.

गालीचाची एक भली मोठी सुरळी खांद्यावर घेऊन अपोलोडोरस् होडीतून पायऱ्यांवर उतरला. तेथे उभ्या असलेल्या रोमन पहारेवाल्याने त्याला हटकले व दरडावून विचारले, ''तू कोण? कुठे चाललास? कुणाला भेटणार आहेस?''

''माझं नाव अपोलोडोरस्! टॉलेमी राजकन्या क्लिओपॅट्रा हिच्याकडून महान योद्धे सीझरमहाराज ह्यांना देण्यासाठी देणगी घेऊन मी आलो आहे. हा एक उंची

गालिचा आहे. हा गालिचा पाहाताच तुझे सीझरमहाराज अगदी खूश होऊन जातील!''

''बंद कर तुझी बडबड!'' पण एव्हाना अपोलोडोरस् पायऱ्या चढून पुढे चालूही लागला होता.

''अरे एऽ रानदांडग्या, थांब जरा! जरा ह्या सुरळीला भाला टोचून पाहा रे, म्हणजे कळेल काय आहे ते. गालिचाच आहे, का आणखी काही बलामत आहे!'' दुसरा पहारेकरी ओरडला.

''वा रे शहाण्यांनो, एवढा सुंदर गालिचा भाल्याने टोचून त्याला भोकं पाडणार काय? गालिचा खराब झाला तर लेको तुमचं नाव सांगणार! खवळलेल्या तुमच्या धन्याने मग तुमच्या अंगाची चाळण केली, तर तुमचं तुम्ही पाहा.'' अपोलोडोरस् पायऱ्या चढता चढता बडबडत होता.

''जा बाबा, जा!''

अल्पावधीतच हा भला दांडगा माणूस सीझरच्या पुढे येऊन उभा राहिला.

''सीझरमहाराज, आपल्या एका चाहत्याकडून आपणासाठी ही भेट आली आहे.'' तो म्हणाला. सीझरने गालिचाच्या त्या सुरळीकडे मोठ्या कुतुहलाने पाहिले. एक बोट हनुवटीवर ठेवीत किंचित् औत्सुक्याने तो म्हणाला, ''ही भेट राजपुत्र टॉलेमीकडून आली आहे काय?''

''ते आता आपणच पाहा!'' असे म्हणून अपोलोडोरस्ने ती गुंडाळी सर्रकन् सीझरच्या पायांपाशी उलगडली आणि तीमधून एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणे टुणकन् उडी मारून राजकन्या क्लिओपॅट्रा बाहेर आली. तिने आळोखे-पिळोखे दिले. मग ती खळखळून हसली. तिची टवटवी, तिचे सौंदर्य, एखाद्या ताज्या फुलाप्रमाणे दिसत होते. त्या पोरीचे हे चमत्कारिक साहस पाहून सीझर चकित झाला. त्याला किंचित् हसूही आले. पण तत्काल चेहेऱ्यावर गांभीर्य आणून तो म्हणाला, ''राजकुमारी, इथे येण्यासाठी ह्याहून अधिक चांगले वाहन आपणास उपलब्ध नव्हतं काय?''

''दुसरी वाहनं आहेत महाराज, पण हवेतून अथवा भूमीखालून येऊ शकत नाहीत ती; त्यामुळे ती माझ्या भावाच्या सैनिकी गराड्यांतून आपणापाशी सुखरूप कशी येणार?''

''पण हा मार्गही धोक्याचा नाही का?''

''पण आपल्या निरोपाप्रमाणे येणं तर भाग होतं!''

''हां ऽऽ!'' सीझर आपली तर्जनी हनुवटीवर ठेवीत उद्गारला. त्याने घंटी वाजविताच एक नोकर आत आला. सीझर त्याला उद्देशून म्हणाला, ''हे पाहा, ह्या नव्या पाहुणीची नीट व्यवस्था ठेव! तिच्यासाठी प्रथम उंची मद्य व फळफळावळ घेऊन ये! उदईक तिच्या इतमामाप्रमाणे तिला नजराणा देण्याची व्यवस्था करू.''

''नजराणा? आणि तो काय म्हणून?''

''आपण इथे येण्यात दाखवलेल्या तत्परतेसाठी व चातुर्यासाठी!'' सीझर भरघोस स्मित करीत म्हणाला.

●●●

### ३. सीझर आणि क्लिओपॅट्रा

वस्तुत: त्यांना एकत्रित येऊन काही क्षणच लोटले होते, पण त्या उभयतांनाही असे आश्चर्य वाटत होते, की आपला पूर्वपरिचय असल्याप्रमाणे आपण एकमेकांशी इतक्या घरोब्याने, मोकळेपणाने कशी वागत आहोत.

सीझरने तारुण्याची वयोमर्यादा केव्हाच ओलांडली होती; पण त्याचे चापल्य, त्याच्या मुद्रेवरील तरतरी, स्नायूंचा पीळ, ह्या गोष्टी तरुणालाही मागे सारणाऱ्या होत्या. हुकुमत गाजविण्याचे त्याचे सामर्थ्य, त्याच्या मुद्रेवर ठळकपणे दिसत होते.

आज आपण पूर्वी कधीच न आढळलेल्या अशा एका माणसाच्या सहवासात आलो आहोत, असे क्लिओपॅट्राला वाटत होते. ह्या नमुन्याचा माणूस ह्यापूर्वी आपल्या पाहाण्यात कधीच कसा आला नाही, ह्याचेच तिला आश्चर्य वाटत होते. सीझरच्या प्रत्येक हास्यागणिक त्याचे मोत्यांप्रमाणे चमकणारे पांढरे शुभ्र दात तिला मोठे आकर्षक वाटत होते.

एखाद्या सुंदर, सुगंधी पुष्पाकडे कौतुकाने पाहावे, त्याप्रमाणे सीझर क्लिओपॅट्राकडे पाहात होता आणि मनाशी म्हणत होता, ''हे सौंदर्य काही वेगळंच आहे.'' एवढ्यात एक नोकर मद्य व फळे घेऊन आत आला. त्याने दोन काचपात्रे मद्याने भरून ठेवली आणि एखादी सावली नाहीशी व्हावी, त्याप्रमाणे अबोलपणाने, निस्तब्धपणाने तो तेथून चालता झाला.

''मी आपल्या आज्ञेप्रमाणे इथे येऊन दाखल तर झाले; आपण मात्र आता माझ्या काही प्रश्नांची उत्तरं दिली पाहिजेत!'' क्लिओपॅट्रा म्हणाली.

''शक्य असेल तर मी ती जरूर देईन!''

सीझरची कल्पना अशी होती, की ही पोरगी दीर्घकाल आपल्या राजधानीच्या नगरापासून दूर असल्याने अलेक्झांड्रिया नगरातील घडामोडीविषयी काही विचारणार असेल. पण तसे काहीच घडले नाही. ती म्हणाली, ''मला तुम्हालाच प्रथम समजून घ्यायचं आहे. मी तुमच्याविषयी फारफार ऐकलं आहे!''

''ही माझी निष्कारण स्तुती होत आहे!''

''आपलं वय खरोखरच चौपन्न आहे का?''

''होय राजकुमारी, अवघ्या तीन दिवसांपूर्वीच मी माझा चौपन्नावा वाढदिवस साजरा केला आहे! आणि मला वाटतं, मी आता एखाद्या पिकल्या फळाप्रमाणे केव्हाही गळून पडेन!''

''मग मला वाटतं, हे पिकलं फळ मी सहज माझ्या हाती झेलू शकेन!'' क्लिओपॅट्रा बेदरकारपणे म्हणाली.

सीझर चमकला. तिच्या बेडर निर्भीडपणामुळे थक्क झाला. पण त्याच्या मन:स्थितीकडे संपूर्ण दुर्लक्ष करून क्लिओपॅट्रा म्हणाली, ''आपली जगभर ह्यासंबंधी प्रसिद्धी आहे, हे खरं ना?''

सीझर मोठ्या विचारात पडला व म्हणाला, ''एखाद्या माणसाला स्वत:विषयी लोकांना काय वाटतं, हे सांगणं मोठं कठीण आहे. एखाद्याचा लौकिक हा एक पाण्यावरचा बुडबुडा आहे. तो लोकमताच्या वाऱ्याने निर्माण होतो, आयुष्यप्रवाहाबरोबर वाहात जातो आणि कधीतरी लोकमताच्याच धक्क्याने फुटून जातो. त्याचप्रमाणे ह्या लौकिकाचंही आहे. म्हटलं तर तो खराही असतो आणि म्हटलं तर नसतोही. त्याविषयी ठामपणाने कोण, कसं व काय सांगणार?''

''मग आपला स्त्रियांविषयी असलेला लौकिक हाही एक असाच बुडबुडा आहे का?''

ह्यावर काही काळ सीझर स्तब्ध राहिला व मग म्हणाला, ''ह्या विषयावर चर्चा करण्याइतपत राजकुमारी प्रौढ नाहीत. मी तर शिपाई गडी, त्यामुळे ह्या विषयाची चर्चा योग्य शब्दांत करणंही मला जमणार नाही!''

''हा विषय राहूद्या. पण पॉंपीचं शिर पाहून आपल्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले, हे तरी खरं का?''

''खरं आहे. तो जरी माझा शत्रू होता, तरी त्याला असलं विश्वासघातकी मरण यायला नको होतं, हे कुणालाही मान्य करावं लागेल.''

''माझे वडील तुमचं काही देणं लागत होते का?'' क्लिओपॅट्राने विचारले, ''किती? दहा हजार होन?''

''मला आत्ता सांगता येणार नाही. हिशेबांत मी तसा कच्चा आहे. आणि मृताकडे असलेलं येणं वसूल करण्याचा विचारही मला करता येत नसल्याने, मी तो हिशेब केलेलाही नाही.''

''गॉलच्या युद्धात आपण लाखो लोकांची कत्तल केली, अशी वदंता आहे, ती खरी आहे का?''

''लढाई म्हटली, की कत्तल आलीच; पण कत्तलीचा आकडा जितका फुगवून सांगितला जाईल, तितका तो आम्हा सेनानींना हवाच असतो. युद्ध जिंकण्यासाठी ह्या वदंता फार उपयोगी पडतात म्हणून आम्ही त्यांचा कधीच इन्कार करीत नाही.''

सीझरने नि:शंकपणाने दिलेली ही उत्तरे ऐकून क्लिओपॅट्रा चकित झाली; पण सीझरच्या अंत:करणाचा ठाव घेणेही फारसे कठीण नाही, हेही तिच्या सहज ध्यानी आले. त्याच्याशी तुलना होऊ शकेल, असा माणूस आपल्या पाहाण्यात नाही, असा तिचा समज दृढ झाला.

दुसऱ्या दिवशी राजकुमार व राजकुमारी ह्या उभयतांनाही सीझरकडून पाचारण करण्यात आले. त्यांच्या पित्याचे मृत्यूपत्र त्याचा कायदेशीर वहिवाटदार म्हणून त्यांच्या दृष्टीस आणण्याचा त्याचा मानस होता.

मृत्यूपत्र वाचून दाखविण्यात आल्यावर तो म्हणाला,

''हे पाहा, तुम्ही उभयतानीही शहाणपणाने व एकोप्याने वागून संयुक्तपणे इजिप्तचं राज्य चालवलं पाहिजे.'' सीझरचे शब्द ऐकून खवळलेला राजपुत्र ओरडून म्हणाला, ''इजिप्तच्या राजाला हुकूम करण्याचा अधिकार कुणालाही नाही. रोमकडून रक्षणाचीही त्याला गरज नाही.'' राजपुत्र रागाने कापत उठला व विमनस्कपणे पाय आपटीत निघून गेला.

सीझरने आपला संयम सोडला नाही. त्याने खिडकीतून बाहेर पाहिले. हजारो नागरिक रस्त्यात गोळा झाले होते. त्यांना उद्देशून तो ओरडला, ''नागरिक बंधूंनो, उदईक सकाळी क्रीडांगणावर जमा. तुमच्या मृत राजाचं मृत्यूपत्र मला तुमच्या दृष्टीस आणायचं आहे.'' नंतर क्लिओपॅट्राला उद्देशून तो म्हणाला, ''अलेक्झांड्रियाचे नागरिक इजिप्तच्या अन्य नागरिकांप्रमाणे नाहीत. इतरांना कोणतीही सत्ता चालते, पण ह्या नागरिकांना स्वत:चा असा काही विचार आहे. भावना आहेत. त्यांच्या मृत राजाची इच्छा अधिकृतपणे त्यांना कळणं आवश्यक आहे.''

सीझरच्या मनात आपल्या नागरिकांविषयी असलेला आदरभाव पाहून क्लिओपॅट्राला समाधान वाटले. त्यांची राणी ह्या नात्याने अप्रत्यक्षपणे ही आपलीही शिफारस झाली, असेच तिला वाटले.

दुसऱ्या दिवशी सकाळी क्रीडांगण नागरिकांनी नुसते फुलून गेले. सीझर अगदी खुल्या मनाने बोलत असल्याप्रमाणे त्यांना म्हणाला, ''नागरिक बंधूंनो, आम्ही रोमन लोक इथे आल्याचं पाहून तुम्ही अस्वस्थ झाला असाल; पण तुमच्या स्वर्गस्थ राजाची-युटेलिस टॉलेमीची अंतिम इच्छा तुमच्या कानी घालावी, म्हणूनच मी ह्या ठिकाणी आलो आहे.'' हातातील पॅपिरसची सुरळी उलगडीत सीझर पुढे बोलू लागला. ''आपला पुत्र टॉलेमी व राजकन्या क्लिओपॅट्रा ह्यांनी संयुक्तपणे इजिप्तचे राज्य चालवावे, अशी इच्छा तुमच्या राजाने व्यक्त केली आहे. ह्या मृत्यूपत्रान्वये सायप्रसचा समावेशही इजिप्तमध्ये करण्यात आला आहे. दुसरी राजकन्या आर्सीन हिची विभक्त राजवट ह्यापुढे सायप्रसवर चालणार नाही.'' जमलेल्या असंख्य नागरिकांनी संमतीदर्शक मोठा जयघोष केला. त्या जयघोषाने उत्तेजित झालेला सीझर पुढे बोलू लागला,

''मृत्यूसमयी तुमच्या राजेसाहेबांनी एक कोटि पंचाहत्तर लक्ष सुवर्ण दिनार रोमकडून कर्जाऊ घेतले होते, पण ह्या सर्व कर्जाची वसुली करण्याची माझी इच्छा नाही. केवळ एक कोटि दिनारच कर्जफेडीपोटी रोम सरकार आपल्या राजवटीकडून वसूल करू इच्छिते. बाकीच्या रक्कमेची सूट देण्यात येत आहे.''

त्याच्या ह्या घोषणेने नागरिक भलतेच खूश झाले. ते म्हणू लागले, ''हा टकल्या वाटला होता तितका निर्दय दिसत नाही!'' नागरिकांची एकूण प्रतिक्रिया पाहून सीझरला समाधान वाटले.

राजपुत्राचे तिघेही बदसल्लागार आपल्या वर्चस्वाला धक्का लागू देण्यास तयार नसल्याने त्यांना उपऱ्या सीझरचा वरचष्मा जाचक होऊ लागला. त्यांनी सीझरविरोधी कारस्थाने सातत्याने चालू ठेवली. त्यांच्या चिथावणीमुळे नागरिक व रोमन सैनिक ह्यांच्यात वारंवार अटीतटीचे प्रसंग निर्माण होऊ लागले. हे प्रकार जास्त वाढू नयेत, चिघळू नयेत, म्हणून सीझरने ते निर्दयपणाने हाताळण्याचा निर्णय केला. त्याने अत्यंत कार्यक्षम अशा हेरांचे जाळे सर्वत्र पसरून ठेविले असल्याने, प्रत्येक हालचालीची खडान्खडा माहिती मिळत असे.

राजपुत्राचे तीन सल्लागार आपल्या विरोधी कारस्थानाच्या आघाडीवर आहेत, हे समजून येताच, त्याने त्या तिघांचीही क्रूर कत्तल करण्यास कमी केले नाही.

आपल्या सल्लागारांची अशी वासलात लागल्याचे पाहून राजपुत्राचे अवसान पुरतेच गळाले. एवढ्यात सीझरच्या दिमतीला रोमन सैनिकांची जादा कुमक येऊन दाखल झाली. ह्या घटनेने सीझरला चांगलेच बळ आल्याप्रमाणे झाले. इजिप्तच्या राजकारणात राजरोस हस्तक्षेप करून जबरदस्तीने काही गोष्टी घडवून आणण्याचे त्याने ठरविले.

राजपुत्र टॉलेमीने आपले इजिप्शियन सैन्य अलेक्झांड्रियाच्या जवळपास सज्ज ठेविले होते. उपऱ्या रोमन लोकांचे वर्चस्व झुगारून देऊन अलेक्झांड्रिया रोमन वर्चस्वातून मुक्त करण्याचा बेत राजपुत्राने मनोमनी केला होता. सीझरने एके दिवशी राजपुत्राला बोलावून विचारले, ''राजकुमार, आपण युद्धकलेत प्रवीण आहात असं ऐकलं, ते खरं का?''

''ज्याने आपणास हे सांगितलं, तो खोटं बोलला नाही एवढं खरं!'' राजपुत्र जरा तोऱ्यातच म्हणाला.

''ठीक आहे, मलाही तुमचं युद्धकौशल्य पाहायचं आहे. उदईक सकाळी तुम्हाला योग्य संरक्षणाखाली तुमच्या सैनिकांत नेऊन सोडण्यात येईल. रोमन सैन्यावर हल्ला चढवण्याची खास संधी मी तुम्हास देत आहे!''

''जरूर जरूर!'' तो मूर्ख राजपुत्र त्वेषाने ओरडला.

खरोखरच टॉलेमीने सीझरच्या रोमन सैन्यावर चाल करण्याचा मूर्खपणा केला. परिणाम व्हायचा तोच झाला. दोनच दिवसांच्या लढाईनंतर इजिप्शियन सैन्य संपूर्ण गारद झाले. राजपुत्राने होडीतून समुद्रमार्गे निसटून जाण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाही. त्याची होडी उलटल्यामुळे दागदागिने, चिलखत, जिरेटोप, वगैरे अंगावर चढवून सजून बसलेला राजपुत्र त्या ओझ्यानेच समुद्रातळाला जाऊन ठार झाला. त्या बिचाऱ्यासाठी ना कोणी रडले, ना हळहळले. ह्या घटनेनंतर सीझरने नागरिकांवर भयानक दहशत बसविली. एकजात सर्वांनी शरणागती पत्करून त्याचे वर्चस्व मान्य केले.

क्लिओपॅट्राने इजिप्तचे राज्ञीपद आपणाकडे घेऊन इजिप्तने रोम दरबारचे संरक्षण पत्करल्याचे जाहीर करून टाकले. सीझरला आपल्या ह्या विजयाबद्दल विलक्षण समाधान वाटले.

रोमन साम्राज्यात इजिप्तचे सामिलीकरण झाल्याप्रमाणे झाल्याने त्याच्या वर्चस्वाचे क्षेत्र खूपच वाढले. क्लिओपॅट्राने इजिप्तची राणी म्हणून राज्यकारभार हाताळताना आपले चातुर्य चांगलेच प्रगट केले. आपणाला हे वैभव व अधिकार प्राप्त होण्यात सीझरच्या कर्तृत्वाचा भाग मोठा आहे ह्याविषयी तिच्या मनात कृतज्ञता व आदरभाव होता; पण आता त्याच्याविषयी तिला प्रेमही वाटू लागले. सीझरची नात शोभेल अशी क्लिओपॅट्रा त्याच्यावर प्रेम करू लागली होती!

सीझरही ह्या मनोव्यथेपासून मुक्त नव्हता. वयाच्या सतराव्या वर्षापासून तो प्रेमाचे चाळे करीत आला होता. आतापर्यंतच्या आयुष्यात त्याने दहापाच स्त्रियांवर प्रेम केले होते. जुने प्रेम झिडकारणे व नवे जोडणे हा त्याचा छंद होता. शेवटी शेवटी सर्वेलिया हिच्याशी काडीमोड घेताना त्याने जाहीर केले होते, ''सीझरची पत्नी संशयातीत असली पाहिजे!'' आता कलपूर्निया त्याच्या पत्नीपदावर होती, पण ती निपुत्रिक असल्याने तो अलीकडे तिच्यावरही नाराज होता.

आज क्लिओपॅट्रा त्याच्या नजरेसमोर होती आणि ती त्याच्या सहवासाला उत्सुक होती.

अलेक्झांड्रियाच्या नागरिकांनी ह्यामधून काढायचा तो निष्कर्ष काढला होता आणि एके दिवशी त्यांचा अंदाज खरा ठरला. त्यांची राणी सीझरची पत्नी झाली. सीझर इजिप्तचा राजा झाला नाही, पण इजिप्तच्या राणीचा पती म्हणून वावरू लागला.

सीझरला आता इजिप्तमध्ये राहून दीर्घ काल लोटला होता. त्याच्या अनुपस्थितीत रोमन सिनेटने त्याला पुन्हा एका वर्षासाठी सर्वाधिकारी नेमल्याचे एकमताने जाहीर केले होते. त्याने लवकरात लवकर परत यावे, अशी रोमन जनतेची इच्छा होती. सिनेटनेही तसा आग्रह धरला होता. येणाऱ्या प्रत्येक खलित्यांत ही मागणी निकडीने नमूद केली जात असे.

पाँपीच्या अध:पतनानंतर सिनेट-सभासदांच्या काही जागा अद्यापि रिकाम्याच राहिल्या होत्या. पाँपीच्या बाजूचे कित्येक सभासद सूडाला भिऊन दडून बसले होते अथवा परागंदा झाले होते. रोममधील कित्येक बडी घराणी ह्या सिनेटच्या (लोकसभा) सदस्यांशी संबंधित असल्याने परिस्थिती बिकट होऊ पाहात होती. सीझरचा मार्ग अगदीच निष्कंटक राहिला नव्हता. सीझर लवकर परत आला नाही, तर ही बिघडलेली परिस्थिती सावरणे पुढे त्यालाही जड जाण्याची शक्यता फारच होती. रोममध्ये त्याने जातीने हजर होऊन परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला नाही, तर त्याचेच आसन डळमळीत होण्याची शक्यता होती.

सीझरच्या गैरहजेरीत त्याचा प्रतिनिधी म्हणून मार्क अँटनी काम पाहात होता. जनता सीझरचा मान अँटनीला देण्याची शक्यता नव्हती. रोमन जनतेला सीझर हवा होता, अँटनी नव्हे!

बापाच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी पाँपीच्या मुलानेही काही उलाढाली चालू केल्या होत्या. त्यांचा बंदोबस्तही

सीझर परत आल्यावाचून होण्याची शक्यता नव्हती. अँटनीच्या एकूण वर्तनाचा बोभाटा फार झाल्याने लोकमताचा कल हळूहळू पाँपीच्या मुलाच्या बाजूने झुकू लागला असल्यास आश्चर्य नव्हते.

रोममधील ह्या सर्व परिस्थितीसंबंधीचे खलिते सीझरला वारंवार मिळत होते. काही खलित्यांत तर अशी विधाने केली जात, की वैयक्तिक सुखस्वास्थ्यासाठी सीझरने ऐन आणीबाणीच्या काळात रोमचा व आपल्या सहकाऱ्यांचा त्याग करून त्यांना संकटात टाकले आहे.

हे खलिते वाचून सीझर अस्वस्थ होऊ लागला. रोमला परत जाण्याचा विचार करू लागला. परत जाणे त्याला निकडीचे वाटू लागले. जनतेच्या इच्छेविरुद्ध अँटनीचे नेतृत्त्व तिच्यावर लादणे त्याला धोकादायक वाटू लागले.

सीझरच्या मनातील ही खळबळ क्लिओपॅट्राला जाणवत होती. त्याने परत जाऊ नये, अशी तिची इच्छा असणे स्वाभाविक होते. पण त्या झुंजार योद्ध्याला रोखून धरण्यास आपले प्रेमबंधन कितपत उपयुक्त ठरेल, ह्याविषयी ती स्वत:च साशंक होती.

सीझरला एकटा जाऊ दिल्यास त्याचे पाय परत अलेक्झांड्रियाकडे वळतीलच, अशी खात्री तिला वाटत नव्हती. आपण बरोबर जाण्याचे ठरविले, तर रोमन जनता काय म्हणेल? तिला आपला विवाह मान्य होईल का? सीझरच्या रोमन पत्नीपुढे आपला कितपत निभाव लागेल? अशा एक ना दोन, अनेक शंका तिच्या मनात थैमान घालून राहिल्या होत्या.

●●●

## ४. सीझरचे प्रयाण व पुढे....

क्लओपॅट्राला एक नवेच आशास्थान निर्माण झाले. तिला जाणीव होत होती, की सीझरचा वारसा आपल्या कुशीत वाढत आहे. आपल्याला मुलगा झाल्यास इजिप्त व रोम अशा दोनही राजवटींचा वारसा त्याला मिळेल. सीझर ह्या नव्या बंधनाने कायम बांधला जाईल, आपल्या अंकित राहील.

पण सीझरच्या ह्या इजिप्शियन पुत्राला रोमन जनता कितपत मानील? सीझर रोमचा सर्वाधिकारी होता, राजा नव्हता. रोमचा राजमुकुट त्याने धारण केल्यास आपल्या मुलाकडे युवराजपद आपोआपच येईल, ह्या विचाराने क्लिओपॅट्रा हर्षभरित होई. पण ह्या साऱ्या गोष्टी भविष्यकालावर अवलंबून होत्या. आपल्याला मुलगा होतो, की मुलगी, कोणी नेम सांगावा? आपल्या अपत्याच्या जन्मकालावधीपर्यंत का होईना, पण सीझरला इजिप्तमध्ये अडकवून ठेवण्याची  तिची धडपड चालू होती.

राजेशाही इतमामाच्या नौकेमधून सीझर आणि क्लिओपॅट्रा नाईल नदीमधून सफरीवर निघाली होती. ही सफर उभयतांनाही मोठी आल्हाददायक वाटत होती. त्यांच्या आनंदात व्यत्यय येईल अशी कोणतीच घटना घडू नये, म्हणून क्लिओपॅट्राने संपूर्ण दक्षता घेतली होती. ह्या प्रवासात सीझरला, इजिप्तच्या अंतर्गत भागाचे समग्र दर्शन झाले. काही काल रोममधील घडामोडींचा त्याला संपूर्ण विसर पडला.

सफरीहून परत आल्यानंतर आठएक दिवसांतच क्लिओपॅट्राने एका पुत्राला जन्म दिला. सीझरचा आनंद गगनात मावेना. आपल्याकडे असलेला रोमन देवतांचा वारसा ह्यापुढे चालू राहिला, ह्याबद्दल त्याने परमेश्वराला धन्यवाद दिले.

मुलाचे नाव सीझेरान असे ठेवण्यात आले.

क्लिओपॅट्राच्या आनंदात भीतीची एक सावली अधूनमधून डोकावत होती. सीझरचे मन रोमच्या दिशेने ओढ घेऊ लागले होते. इजिप्तमध्ये ह्यापुढे आपण दीर्घकाल राहाणे चुकीचे आहे, घातक आहे, ह्याची जाणीव त्याला तीव्रतेने होऊ लागली होती. त्याने आपल्या प्रयाणाचा बेत नक्की करून, एके दिवशी कोणत्याच मोहाला बळी न पडता क्लिओपॅट्राचा निरोप घेतला. अलेक्झांड्रिया बंदरातून सीझरची गलबते इटलीच्या दिशेने हाकारली गेली.

''आम्ही दीर्घकाल विभक्त राहू शकत नाही. मलाही

एक दिवस रोमला जावंच लागेल!'' एके दिवशी क्लिओपॅट्रा आपल्या विश्वासू सहचरीला म्हणत होती. पण आपला हा समज चुकीचा असल्याचे हळूहळू तिच्या प्रत्ययास येऊ लागले.

क्लिओपॅट्रा तशा अर्थाची पत्रे सीझरला पाठवी. सीझरही तातडीने त्यांची उत्तरे रवाना करी. पण त्या उत्तरांत तिच्या रोममधील आगमनाबद्दल मात्र संपूर्ण मौन बाळगलेले असे. सीझर लिही, ''मी तुला व मुलाला पाहाण्यास उत्सुक आहे. येथील काही कंड्या तुझ्या कानावर आल्या, तरी त्याकडे मुळीच लक्ष देण्याचे तुला कारण नाही. राजकारणाच्या डावांची ही रंगत नेहमीच अशी चालते. त्यातील खऱ्याखोट्याची छाननी करण्यात मुळीच अर्थ असत नाही.'' सीझरची ही टोलवाटोलवी क्लिओपॅट्राच्या लक्षात येऊ लागली होती. रोमच्या राजकारणात गुंग झालेला सीझर आपल्या अगर पुत्राच्या ओढीने इजिप्तकडे येईल, ही तिची आशा दुरावली होती.

क्लिओपॅट्रा तशी मोठी व्यवहारचतुर स्त्री होती. आपल्या मुलाने रोम व इजिप्त ह्या संयुक्त साम्राज्याचे सम्राट बनले पाहिजे, अशी तिची महत्त्वाकांक्षा होती. आपल्या मुलाला सीझरचा मुलगा म्हणून रोमच्या जनतेने मान्यता दिल्याखेरीज आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरणार नाही, ह्याची संपूर्ण कल्पना तिला होती. ती सीझरला पाठविलेल्या पत्रात लिही, ''मी रोमला भेट देणार आहेच! मी येणार इजिप्तची राणी म्हणून रोमचे संरक्षण मागण्यासाठी! सीझेरन रोमचा वारस झाला, म्हणजे ते मला आपोआपच मिळणार आहे म्हणा!''

सीझरला पूर्णपणे माहीत होते, की आपल्या मनात काहीही, कितीही असले, तरी आपली व क्लिओपॅट्राची भेट व्हायची झाल्यास ती राजकीय पातळीवरच होणे भाग आहे, आवश्यक आहे. ह्या भेटीचा योग घडवून आणायचा झाल्यास, परराष्ट्र-वकिलामार्फतच ही योजना आखली गेली पाहिजे. त्याने लोकसभा प्रतिनिधींमार्फत इजिप्तमधील रोमन वकिलाला इजिप्तच्या राणीला रोम भेटीचे आमंत्रण देण्याबद्दल सुचविले. स्वाभाविक त्याने सीझरकडे तसे करण्याबद्दल परवानगी मागितली. तशी ती येताच त्याने राणीला समक्षात भेटून तिला रोम भेटीचे सरकारी पातळीवर आमंत्रण दिले.

''पाहिलंस? मी म्हणत होते, ते खरं झालं की नाही? रोमला येण्याबद्दल सीझरचं आमंत्रण आलंच की नाही?'' क्लिओपॅट्रा आनंदाने आपल्या सखीला म्हणाली.

जूनमधील एका रम्य सकाळी इजिप्तची राणी रोममध्ये येऊन दाखल झाली.

रोमचे झाडून सारे नागरिक राणीच्या स्वागतासाठी राजपथावर दुतर्फा गोळा झाले होते. आज ते एका उत्सवी, उत्साही मन:स्थितीत होते. त्यांचा सर्वाधिकारी आवडता नेता ठामपणाने सत्ताधारी बनून रोमन साम्राज्यावर हुकुमत चालवीत होता. जुने मतभेद हळूहळू विरत जाऊन, जुन्या जखमा बुजल्याप्रमाणे झाल्या होत्या. रोमन योद्ध्यांची एकजूट फिरून प्रस्थापित झाली होती. व्यापार-धंदा बरकतीत होता. पीकपाण्याची सुबत्ता होती. उत्सव-समारंभ साजरे करण्यास वातावरण संपूर्ण अनुकूल होते. आणि 'विजयोत्सव' ही रोमन लोकांची आवडती करमणूक होती. सीझरच्या सर्व विजयांचा गौरव करण्यासाठी असा उत्सव साजरा होणे आवश्यक होते. वेळ अनुकूल होती.

रोमन लोकांची सर्वसाधारण कल्पना अशी होती, की पूर्वेकडील देशांतील जनता गदळ आहे. गुलामगिरीत भरडण्याच्या लायकीची आहे. जिंकून आणलेल्या कैद्यांना रोमन योद्धे आपल्या रथचक्रांना बांधीत व त्यांना फरपटत नेत. विजयोत्सवाच्या कार्यक्रमांतील हा कार्यक्रम मोठा महत्त्वाचा व आवडीचा मानला जाई. आज ना उद्या इजिप्तची राणी सीझरच्या रथाला जखडली जाऊन तिची फरपट काढली जाईल, ह्याच भावनेने तिला पाहाण्यासाठी अथांग रोमन जनसागर उसळला होता.

इजिप्तची राणी आली. रोमन लोकांनी तिला डोळे भरून पाहिले. आणि मग रोमन जनताच जिंकली गेली. राणी आली, तीच मुळी लवाजम्यासह मिरवीत.

मिरवणुकीच्या अग्रभागी सोन्याच्या अलंकारांनी सजलेले काळेकभिन्न दांडगेश्वर निग्रो गुलाम चालत होते. त्यांच्या पाठोपाठ चालला होता खोजांचा ताफा! हा जथा पाहाताच रोमन लोकांना मोठे हसू आले. खोजांच्या मागून इजिप्शियन सैनिकांच्या तुकड्या संचलन करीत आल्या. आणि मग रोमन लोकसभेने दिलेल्या खास रथात बसून

इजिप्तची राणी क्लिओपॅट्रा आली. तिचा दिमाख पाहून रोमन नागरिकांचे डोळे विस्फारित झाले. ''सुंदर! सुंदर!! असं सौंदर्य ह्यापूर्वी ह्या नगरीत आढळलं नव्हतं!'' त्यांनी एकमताने आपला अभिप्राय व्यक्त केला.

क्लिओपॅट्राची अंगकांती तप्त सुवर्णाप्रमाणे झळकत होती. तिचे आधीच तजेलदार असलेले डोळे सुरमा घातल्यामुळे अधिकच तजेलदार दिसत होते. तिचे लांब सडक काळे केस, कृश पण गोंडस बाहू, तिने अंकावर घेतलेला तिचा मुलगा सीझेरन, हे सर्वच दृश्य इतके लोभसवाणे होते, की रोमन जनता मंत्रमुग्ध होऊन गेली.

मिरवणूक योग्य ठिकाणी येताच, सीझर लोकसभा-सदस्यांसह सामोरा आला. रोमन साम्राज्याचा सारा दिमाख व वैभव त्या ठिकाणी एकवटले होते. सीझर, रोमन सत्तेचा प्रतिनिधी-त्या ठिकाणी इजिप्तच्या राणीच्या स्वागतास आला होता. आपले अन्य संबंध अगर भावना रोमन जनतेच्या ध्यानात येणार नाहीत, ह्याची संपूर्ण दक्षता त्याने घेतली होती.

स्वागत- समारंभ आटोपल्यानंतर टायबर नदीच्या उजव्या तीरावर असलेल्या एका भव्य प्रासादात क्लिओपॅट्राची रवानगी करण्यात आली. तिला निवासस्थान म्हणून देण्यात आलेला हा प्रासाद सीझरच्या खाजगी मालमत्तेतला होता. त्याचे अधिकृत सरकारी निवासस्थान खुद्द रोम शहरात असून त्या ठिकाणी तो व त्याची रोमन पत्नी कलपूर्निया राहात असत. हा प्रासाद क्लिओपॅट्रा व तिच्या तैनातीतील माणसे ह्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आला होता.

त्या रात्री सीझरने क्लिओपॅट्राच्या ह्या निवासस्थानाला भेट दिली. त्याला पाहून क्लिओपॅट्राला चांगलाच धक्का बसला. त्याच्या वयाचा परिणाम त्याच्या शरीरावर चांगलाच दिसू लागला होता. कित्येक दिवसांपासून त्याला असलेल्या फेपऱ्याच्या व्यथेने त्याला अगदी जर्जर करून टाकलेले दिसत होते. त्याच्या पिंगट डोळ्यांतील तारुण्याची चमक मात्र अद्यापि शाबूत राहिलेली दिसत होती. त्याचा उत्साह, त्याची तडफ, त्याची महत्त्वाकांक्षा ह्यांत मात्र कोणतीच कमतरता दिसत नव्हती.

दीर्घकालानंतर आपल्या तरुण पत्नीची नि आपली भेट होत आहे, ह्याचा आनंद नि:संशय त्याच्या चेहऱ्यावर ओसंडत होता.

''राणीसरकार, गेले काही दिवस विजयोत्सवाचा मोठा गाजावाजा आपण ऐकत आहोत, पण हा विजयोत्सव म्हणजे काय भानगड आहे?'' चार्मियन, क्लिओपॅट्राची विश्वासू सहचरी एके दिवशी तिला विचारीत होती. आपल्या मुलाशी खेळता खेळता क्लिओपॅट्राने उत्तर दिले,

''रोमन वीरांनी संपादन केलेल्या विजयाबद्दल गौरव करण्यासाठी असे उत्सव साजरे करण्यात येत असतात. गेल्या काही वर्षांत सीझरने कित्येक विजय संपादन केले आहेत आणि तो आता रोमचा सर्वाधिकारीच झाला आहे. त्याच्या विजयांचा उत्सव साजरा होणं स्वाभाविक आहे, क्रमप्राप्त आहे. हा उत्सव मोठा चित्तवेधक असणार, ह्यात मुळीच शंका नाही.'' आणि खरोखरच हा समारंभ मोठा चित्तवेधक व चित्तथरारक ठरला. खास तयार करण्यात आलेल्या एका प्रेक्षाविभागात क्लिओपॅट्रा सीझरच्या पत्नीच्या शेजारी बसून ही उत्सवाची मौज पाहात होती.

काही वेळाने रोमच्या सर्वाधिकाऱ्याचा, - सीझरचा रथ त्या ठिकाणी धडधडत आला. सीझरचे डोळे क्लिओपॅट्रावर खिळले होते. त्याचा आजचा रुबाब काही विलक्षण होता.

सीझरचा रथ क्लिओपॅट्रासमोर आला आणि कडाड् असा काही तरी मोडल्याचा आवाज वातावरणात घुमला.

जनसागरातून एकच दु:खोद्गार उठला. सीझर तोल जाऊन रथावरून पुढे पडल्यासारखा झाला. पण लगोलग चपळाईने त्याने स्वत:ला सावरले. त्याने अलगद, रथातून जमिनीवर उडी टाकली. अनेक सेवक पुढे धावले. त्यांनी रथाचे उधळलेले घोडे मोठ्या मिनतवारीने आवरले. प्रचंड जनसागर पुढे सरकू लागला. लोकांना आवरणे सीझरच्या सैनिकांनाही अशक्य होऊ लागले.

अनपेक्षितपणे सीझरच्या उत्सवी रथाचा कणाच मोडून पडला होता. एव्हाना दुसरा रथ आणला गेला. मुद्रेवर कोणताही भाव न दाखविता सीझर ह्या नव्या रथावर आरूढ झाला. मिरवणूक पुन्हा चालू झाली. लोकांनी सीझरच्या नावाचा जयघोष केला. पण धर्मभोळ्या रोमन जनतेला ह्या घटनेचा परिणाम जाणवल्याशिवाय राहिला नाही.

क्लिओपॅट्राही ह्या घटनेमुळे चांगलीच बिचकल्याप्रमाणे झाली, विचलित झाली. तिला वाटले, आपल्या व सीझरच्या भावी जीवनकालात काहीतरी विपरीत घडणार. भावी कालात येणाऱ्या अंधकाराची, संकटपरंपरांची निदर्शक अशीच तर ही घटना ठरणार नाही ना?

विजयोत्सवाचा हा पहिला दिवस. आज सीझरच्या गॉल देशातील विजयाचा गौरव होणार होता. रथ बदलताना पूर्वीच्या रथास बांधला गेलेला गॉल पुढारी नव्या रथास बांधण्याचे राहून गेले होते. सीझरच्या ध्यानात ही गोष्ट येताच तो खवळला, संतप्त झाला. त्याला वाटले, ह्या उत्सवाला दुसरे गालबोट लागले! त्याने करकरा दात-ओठ खाल्ले. त्याने आपला रथ गर्रकन् वळविला व मोडक्या रथापाशी आणून उभा केला. त्याने स्वत: गॉल नेत्यास आपल्या रथचक्रास खचाटून बांधले आणि मग भयंकर गतीने त्याची मैदानभर फरपट काढली.

दिवस कसाबसा साजरा झाला; पण घडलेल्या घटनांनी झालेला विरस मात्र कोणाच्याच मनातून गेला नाही.

दुसऱ्या दिवशी सीझरच्या इजिप्त विजयाचा समारंभ साजरा झाला. आता हा विजयोत्सव कसा साजरा केला जाणार, ह्याचे क्लिओपॅट्राला कोडे पडले होते; पण अल्पावधीतच ते दूर झाले. तिच्या भावाच्या तिघा बदसल्लागारांच्या प्रतिमांची सीझरच्या रथाबरोबर फरपट काढण्यात आली.

सीझरने स्वत:च त्यांचा वध केल्यानंतर, त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांची अशी विटंबना करण्याचे कारण नव्हते, असे तिच्या स्त्रीमनाला वाटले. हा प्रकार तिला फारसा रुचला नाही आणि नंतर घडलेल्या प्रकाराने तर ती चांगलीच हतबुद्ध झाली.

इजिप्तची गादी मिळविण्यासाठी सतत खटपट करणारी, सीझरच्या विरुद्ध कारस्थाने रचणारी, क्लिओपॅट्राची धाकटी बहीण अर्सीनो सीझरच्या विजयोत्सवी रथामागे जुंपली गेली होती. तिची फरपट चालू होताच तिने फोडलेल्या करुण किंकाळ्यांनी क्लिओपॅट्रा कासावीस होऊन गेली. पण मुकाट्याने आपल्या स्थानावर बसून तिला त्या ऐकाव्या लागल्या.

क्लिओपॅट्रावर खास अनुग्रह दाखविण्यासाठी म्हणून नंतर सीझरने तिला जीवदान दिले. क्लिओपॅट्राला वाटले, असा उपमर्द सहन करून जगण्यापेक्षा आपली बहीण मेली असती, तर अधिक बरे झाले असते.

ह्या उत्सवाचा काल क्लिओपॅट्राला अत्यंत खेदजनक रीतीने जाणवला; पण त्याचबरोबर सीझरची प्रचंड लोकप्रियता पाहून तिला समाधानही वाटले. रोमची व इजिप्तची राणी म्हणून आपला गौरव व्हावा, आपला मुलगा ह्या संयुक्त साम्राज्याचा वारस बनावा, ही तिची महत्त्वाकांक्षा ह्या प्रसंगी तीव्रतेने जागृत झाली.

सीझरही रोमन जनतेने क्लिओपॅट्राचा रोमन देवता म्हणून स्वीकार करावा, अशा भावनेने प्रेरित झाला होता. स्वत:कडे रोमचे सम्राटपद घेऊन क्लिओपॅट्राला सम्राज्ञी बनविण्याची त्याला उत्सुकता होती. पण ह्या घटनेला रोमन जनता राजी असल्याशिवाय आपण काही करू शकणार नाही, ह्याची कल्पना त्याला होती.

क्लिओपॅट्राची देवता म्हणून ख्याती व्हावी, ह्यासाठी त्याने एक कल्पना काढली. एका रोमन शिल्पकाराला तिचा पुतळा बनविण्याचे काम त्याने सांगितले होते. तिचे दैवी लावण्य रोमन जनतेच्या डोळ्यांपुढे सतत राहावे, अशी त्याची मनीषा होती. पुतळ्याचे काम द्रुतगतीने पुरे व्हावे असा त्याचा सतत तगादा होता. अधीर झालेल्या सीझरने एके दिवशी मूर्तीकाराला बोलावून घेऊन विचारले, ''हा पुतळा पूर्ण होण्यास दिवस तरी किती लागणार?''

''कमीत कमी दहा वर्षं तरी लागतील, सरकार!'' अर्चिलस, तो मूर्तीकार, म्हणाला.

''हे काम दहा दिवसांत पूर्ण झालंच पाहिजे!'' सीझर खसकून त्याच्या अंगावर ओरडून म्हणाला.

आणि खरोखरच अर्चिलसने रात्रंदिवस खपून दहा दिवसांत पुतळा तयार केला. एखाद्या रोमन देवतेप्रमाणे सीझरने ह्या पुतळ्याची एका मंदिरात प्रस्थापना केली. आपणास आपल्या ह्या अल्पवयी पत्नीबद्दल किती प्रेम वाटते, ह्याचे प्रत्यंतर त्याने रोमन जनतेला आणून दिले. रोमन साम्राज्याचा राजमुकुट आपण धारण करावा व क्लिओपॅट्राला सम्राज्ञीपण प्राप्त करून द्यावे, ही त्याची मनापासून इच्छा होती. पण हे साध्य कसे करावे, हा मोठा प्रश्न त्याच्यापुढे होता. रोमन जनता, रोमन लोकसभा

आपल्या ह्या निर्णयाला विरोध केल्याशिवाय राहाणार नाही, ह्याची त्याला संपूर्ण कल्पना होती.

अलेक्झांडरप्रमाणे जगज्जेता बनल्याखेरीज आपल्या ह्या सुखस्वप्नाला मूर्त स्वरूप येणार नाही हे जाणून, त्याने रोमन साम्राज्याच्या विस्तारासाठी आणखी काही मोहिमा हाती घेण्याचा विचार चालविला होता. पण मोहीम म्हटली, की अफाट खर्च आलाच! इजिप्तचे संपूर्ण सामिलीकरण रोममध्ये झाल्यास खर्चाचा प्रश्न सहज सुटणे शक्य होते. इजिप्तची राणी क्लिओपॅट्रा अशा सामिलीकरणास प्रतिकूल असणार नाही, ह्याची त्याला कल्पना होती. पण सामिलीकरण झाल्यानंतर इजिप्तच्या राणीला, आपल्या पत्नीला, रोमन जनता कोणते स्थान देणार? कोणता मान देणार? हे प्रश्न महत्त्वाचे होते. सीझरसुद्धा ह्या प्रश्नांची ठाम उत्तरे देण्यास असमर्थ होता.

●●●

## ५. पुढचे पाऊल

एक प्रकारे सीझर आणि क्लिओपॅट्रा ह्यांच्या मनोव्यापारात एकवाक्यता होती. सीझरेन रोम व इजिप्त ह्या संयुक्त साम्राज्याचा एकमेव वारस ठरावा, ही क्लिओपॅट्राची आत्यंतिक मनीषा होती. सीझर स्वत:ला सम्राटपद घेण्यास व क्लिओपॅट्राला सम्राज्ञी करण्यास उत्सुक होता. लोकमनाला न दुखविता हे साध्य कसे करावे, एवढाच प्रश्न त्याच्यापुढे होता.

आपला प्रशस्त प्रासाद क्लिओपॅट्राच्या दिमतीला देताना सीझरची अशी कल्पना होती, की रोममधील बडी धेंडे व त्यांच्या स्त्रिया ह्या ठिकाणी वर्दळ करू लागतील. पण त्याची ही कल्पना चुकीची ठरली. रोमन स्त्रिया ह्या प्रासादाकडे ढुंकूनही फिरकेनात. क्लिओपॅट्राच्या सौंदर्याबाबत कोणाचेच दुमत नव्हते. सीझरने तिच्याशी जोडलेले नातेही त्यांना अज्ञात नव्हते. पण क्लिओपॅट्रात रोमन रक्त नसल्याने, आपला कुलीन व सांस्कृतिक दर्जा तिला देण्यास त्यांची तयारी नव्हती.

पुरुषवर्गाचे ह्याबाबतचे धोरण एवढे सनातनी नव्हते. अनेक प्रतिष्ठित नागरिक ह्या प्रासादाला भेट देत. क्लिओपॅट्राशी गप्पा-गोष्टी करीत. तिच्या बुद्धिचातुर्याने ते स्तिमित होत. तत्कालीन प्रश्नांवर क्लिओपॅट्रा जे मतप्रदर्शन करी, त्यामुळे त्यांना कौतुकही वाटे, काही काही वेळा ही सर्व मंडळी तिचा पाहुणचारही घेत. बेताबेताने अनेक रोमन विद्वान ह्या बैठकांत भाग घेऊ लागले. ग्रीक कवी व्हर्जीन, विख्यात वक्ता सिसरो हेही ह्या बैठकीत सामील असत.

एके दिवशी क्लिओपॅट्रा सीझरला म्हणाली, ''मला सिसरोची दया येते. बिचाऱ्याला अगदी कंटाळवाणं जिणं जगावं लागत आहे!''

''खोटं आहे, साफ खोटं आहे!'' सीझर गुरगुरला. ''तो जरी पॉंपीच्या पक्षाचा असला, तरीसुद्धा मी त्याच्या मालमत्तेला धक्का लावलेला नाही. इतरांपेक्षा निराळी अशी कोणतीच कमतरता त्याला नाही!''

''काही असो, इथे जमणाऱ्या माणसांत तो निश्चितच चांगला व उमदा वाटतो मला!''

''ब्रुटस् व ऑक्टिव्हियस् ह्यांच्याशी तुलना करून तू हे बोलत आहेस की काय? ते उभयता तर माझे नातलगच आहेत...''

''असतील, पण ऑक्टिव्हियस्चा तो डागाळलेला चेहरा आणि त्याचं ते जटाधारी मस्तक पाहिल्यानंतर सीझरने त्याच्याशी नातं न सांगणं हेच बरं, असं मला तरी वाटतं.''

''तो मुलगा तसा मोठा हुशार आहे. आज रोम विद्यापीठात त्याच्या तोडीचा विद्यार्थी नाही!''

''आणि ब्रुटस्?'' आपल्या भुवयांच्या कमानी चढवीत क्लिओपॅट्राने विचारले, ''त्याचं आणि आपलं कोणतं नातं आहे?'' तिचा हा प्रश्न नि:संशय खोडसाळ होता. तिला माहीत होते, की तो सीझरचा अनौरस मुलगा होता. सीझरने आपल्या तारुण्यात सव्हेलियाशी जोडलेल्या

संबंधांतून त्याचा जन्म झाला होता.

सीझरने ह्या प्रश्नावर काहीच उत्तर दिले नाही. क्लिओपॅट्रा पुढे म्हणाली, ''त्याची वागणूक ठाकठीक आहे. तो दिसायलाही मोठा गोंडस आहे. पण मला शंका येते, की तो महादुष्ट माणूस असावा!''

क्लिओपॅट्राने ह्या उभयतांबद्दल जो विशिष्ट प्रतिकूल ग्रह करून घेतला होता, त्याला तसेच कारणही होते. ज्या वेळी ते दोघे मिळून प्रथम तिच्या प्रासादात आले, त्या वेळी एकाएकी काहीतरी अशुभ घडत आहे, आपल्या मनावर औदासीन्याचे एक पटल येत आहे, त्यांबरोबरच आपल्या घरात काहीतरी अशुभ प्रवेश करीत आहे, असा अकारण भास तिला झाला होता. ब्रूट्सने आल्या आल्या क्लिओपॅट्राच्या विलासी जीवनावर अकारण प्रहार केला. साध्या राहाणीच्या पावित्र्यावर प्रवचन झोडले आणि ह्या साऱ्या प्रकारामुळे त्या माणसाबद्दल तिच्या मनात चांगलीच अढी निर्माण झाली. वस्तुत: फर्सेलियाच्या संग्रामानंतरही त्याचे वागणे सीझरविरोधीच होते. पण सीझरला काय वाटले कोण जाणे, त्याने ब्रूट्सला जीवदान दिले. ह्या माणसाला जीवदान देऊन त्याने आपल्या मार्गात एक उपद्रवच निर्माण करून घेतला होता आणि क्लिओपॅट्राची ही भावना दृढ होती. क्लिओपॅट्राच्या ह्या साऱ्या शंका-कुशंकाचे उगमस्थान तिच्या पौरस्त्य मनावर असलेल्या भ्रामक कल्पनांच्या पगड्यात आहे, अशी सीझरची कल्पना होती. पण त्याने ती बोलून मात्र कधीच दाखविली नाही.

''ब्रूट्स तसा ठीक माणूस आहे! रोममध्ये रोखठोक व्यवहार करणारे जे काही थोडेफार लोक आहेत, त्यामध्ये ब्रूट्स हा अग्रगण्य आहे.'' सीझर म्हणाला. पण सीझरचे हे गुणगान क्लिओपॅट्राचे समाधान करू शकले नाही. ब्रूट्सबद्दल तिला वाटणारा तिरस्कार मुळीच कमी झाला नाही. उलट सीझरच्या पुढील बोलण्याने तो द्विगुणित मात्र झाला. सीझर म्हणाला, ''पाँपीच्या चाहत्यांनी मरता मरता हातपाय झाडण्यास सुरुवात केली आहे. इबेरियात त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बंडाचा झेंडा उभारला आहे. त्यांना संपूर्ण निकालात काढणं मला भाग आहे.''

''हे बंड मोडून काढायला किती दिवस लागतील? त्यासाठी मार्क अँटनीसारख्या एखाद्या खंबीर सहकाऱ्याची योजना केली तर चालणार नाही का?''

''नाही, पाँपी व मी हा झगडा केवळ आमच्या उभयतातला होता नि आहे. त्याचा संपूर्ण निकाल माझ्या हस्तेच लागणं श्रेयस्कर आहे. माझ्या अनुपस्थितीत रोमन जनता तुझ्याशी कशी काय वागते, तुझ्याबद्दल तिची काय भावना आहे, ह्याचीही काही कल्पना येण्याच्या दृष्टीने ही अनुपस्थिती उपयुक्त ठरणार आहे.''

''रोमन जनतेची भावना काहीही असली, तरी मला पर्वा नाही. शेवटपर्यंत तुमचा विश्वास मला लाभल्यानंतर मला कशाचीच आवश्यकता वाटण्याचं कारण नाही!''

''मलाही तेच वाटतं. तुझी एकनिष्ठा शेवटपर्यंत लाभल्यास सीझरला कशाचीच क्षिती नाही!''

आणि मग एके दिवशी तुताऱ्या निनादू लागल्या. पडघम वाजू लागले, तरवारी खडखडू लागल्या आणि स्पेनच्या दिशेने सीझरची चढाई चालू झाली. निघण्यापूर्वी त्याने रोमन लोकसभेकडून स्वत:ची रोमन सर्वाधिकारी म्हणून नियुक्ती करून घेतली. स्पेनवर जाण्यापूर्वी त्याने रोमचा कारभार पाहाण्यासाठी मंत्रिमंडळ नियुक्त केल्याचे जाहीर केले.

प्रत्येक दिवशी क्लिओपॅट्राकडे सीझरकडून खलिता येई; पण तिची चिंता काडीमात्र कमी होत नव्हती. सीझर शूर आहे, सामर्थ्यसंपन्न आहे, पण बेदरकार आहे; त्याचप्रमाणे अलीकडे त्याची अपस्माराची व्यथा बळावत आहे, हाही एक तिच्या काळजीचा महत्त्वाचा भाग होता. सीझरचे दैव मोठे सिकंदर होते, ह्या एकाच गोष्टीवर ती भरवसा ठेवून होती.

सीझरच्या अनुपस्थितीत तिच्या प्रासादाला भेट देणाऱ्यांची संख्या वाढू लागली. सीझरच्या गैरहजेरीत चाललेल्या रोमन राजकारणाचा चाणाक्षपणाने कानोसा घेण्यास ह्या गाठी-भेटी तिला चांगल्याच उपयुक्त वाटत. सीझरला ह्या वार्ता ती मोठ्या कसोशीने पुरवी. रोमन राजकारणाची माहिती तिला जसजशी होत गेली, तसतसा तिला त्या राजकारणाचा वीट येऊ लागला. रोमन लोकशाही म्हणजे आडदांडाहाती सत्ता, हे तिला आता पुरेपूर कळून चुकले. मतांसाठी सर्रास लाच दिली जात असल्याने,

मोठेपण विकत मिळू शकते, ह्याची जाणीव तिला झाली. ह्यापेक्षा इजिप्तची राजवट अनंत पटींनी तिला चांगली वाटू लागली. इजिप्तची जनता राज्यकर्त्यांवर, त्यांच्या शहाणपणावर विसंबते, ते सांगतील ते ऐकते, ह्यात वावगे असे काय आहे हेच तिला कळेना. सीझर केव्हा एकदा ह्या लोकशाही राजवटीचा शेवट करतो व रोमचा राजा म्हणून राज्यकारभार पाहू लागतो, ह्याबद्दल तिला आतुरता लागून राहिली होती. सीझरच्या व आपल्या भवितव्याबद्दल तिला फार मोठी आशा होती; पण एका गोष्टीबद्दल तिला भीतीही वाटत होती. रोमची लोकशाही कोणत्याही परिस्थितीत टिकवून धरलीच पाहिजे, असे म्हणणारा व त्यासाठी धडपडणारा एक गट अस्तित्वात होता व ह्या गटाचे नेतृत्त्व ब्रुट्सकडे होते.

एक दिवस ती ब्रुट्सला म्हणाली, ''ब्रुट्स, ज्यूलियस सीझरसारखा उमदा व थोर माणूस तुला पुत्रवत् मानतो, ह्याबद्दल तुला अभिमान नाही वाटत?''

ब्रुटस् उसळला व ताडकन् उठून ओरडला, ''आपलं हे भाषण म्हणजे माझ्या मातेचा उपमर्दच आहे!''

त्याचा हा अकारण संताप पाहून क्लिओपॅट्राला आपण विचारलेल्या प्रश्नाबद्दल चांगलाच पश्चाताप झाला; पण त्याचबरोबर ब्रुट्सच्या मनात सीझरबद्दल असलेली द्वेषबुद्धीही ह्या घटनेमुळे प्रकट झाली, हेही तिला एका प्रकारे बरेच वाटले. ब्रुट्स हाच सीझरचा खरा वैरी आहे, ह्या तिच्या कल्पनेला आज दुजोरा मिळाल्याप्रमाणे झाले.

लवकरच सीझरने पाँपीच्या दोघा मुलांना व त्याच्या चाहत्यांना पराभूत केले. ह्या संग्रामातही शत्रूपक्षाचे बारा हजार सैनिक त्याने गारद केले. ह्याही खेपेस सीझरने आपला विजयोत्सव साजरा केला, पण रोमन जनता ह्या प्रसंगी जरा साशंक होती. सीझरने आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी, स्वार्थासाठी, रोमन सैनिकांचा बळी घेण्याचे काम चालविले आहे, असे त्यांना वाटू लागले होते. पण उघडपणे तसा आरोप करण्यास मात्र कोणीच धजावले नाही. परत आलेल्या सीझरचे वेशीपाशी स्वागत करण्याचे काम मार्क अँटनीने केले. पाँपीच्या मोठ्या मुलाचा वध करण्यात आला होता. धाकटा मुलगा परागंदा झाला होता. सीझरच्या सर्वाधिकारित्त्वाला आव्हान देण्यास आता कोणी शिल्लक राहिले नव्हते.

सीझरच्या ह्या विजयाने क्लिओपॅट्राला आनंद झाला. इजिप्त व रोम ह्यांचे संयुक्त साम्राज्य निर्माण होण्याचा मार्ग दिवसेंदिवस सुलभ होत आहे, निष्कंटक होत आहे असे तिला वाटू लागले होते. तिने आपल्या हस्तकांकरवी अशा वार्ता प्रसृत करण्यास सुरुवात केली, की सीझर लवकरच एक कायदा मंजूर करणार असून, ह्या कायद्याने सीझरच्या उभय पाल्यांना समान अधिकार प्राप्त होणार आहेत.

इकडे सीझरनेही आपल्या राजमुकुट धारण करण्याच्या कल्पनेची प्रत्यक्षाप्रत्यक्ष रितीने वाच्यता चालू केली होती. त्याने राजमुकुटाप्रमाणे दिसणारे शिरस्त्राण धारण करण्यास सुरुवात केली. त्याने हाती घेतलेला दंड हस्तिदंती असून तो राजदंडाप्रमाणे भासावा, अशी त्याची घडण बुद्धिपुरस्पर करण्यात आली होती. रोमन लोकसभेत बसण्यासाठी त्याने जे खास आसन तयार करून घेतले होते, त्याची एकूण सजावट राजसिंहासनाप्रमाणे दिसत होती. सम्राट बनण्याची आपली योजना तो क्रमाक्रमाने पुढे ढकलीत होता.

''आता आपण असा एखादा नेत्रदीपक विजय संपादन करावा, की रोमन जनता तुम्हास कोणताच विरोध दर्शवू शकणार नाही. ह्या आपल्या विजयात पर्शिया, वगैरे आशिया खंडातील देशांचा समावेश झाल्यास तुम्ही जगज्जेत्या अलेक्झांडरलाही मागे साराल!'' एके दिवशी क्लिओपॅट्रा सीझरला सुचवीत होती.

''छे, छे ऽ अलेक्झांडरची बरोबरी कोणीच करू शकणार नाही!'' तिला झिडकारल्यागत करून सीझर म्हणाला.

''बरोबर आहे. सीझरखेरीज अन्य कोणीच ही बरोबरी करू शकणार नाही!'' ती स्मित करीत म्हणाली.

तिच्या ह्या उत्तराने सीझरच्या डोळ्यात निराळेच तेज चमकू लागले. तो आपले वय विसरला. फिरून आपल्या अंगात तारुण्याचा संचार होत आहे, असा भास त्याला झाला. त्याच्या महत्त्वाकांक्षी मनाला त्याच्या तरुण सौंदर्यशाली पत्नीने चांगलीच चेतावणी दिली.

सीझरला वाटले, आपण हे सहज करू शकू! पर्शियामार्गे आपण भारतातसुद्धा जाऊ शकू. पण ह्या साहसात कराव्या

लागणाऱ्या कत्तली, होणारा अवाढव्य खर्च, पैशाची होणारी उधळ-माधळ, तयारीसाठी करावे लागणारे अविश्रान्त परिश्रम, ह्या गोष्टीही त्याच्या मनात थैमान घालू लागल्या. क्लिओपॅट्राने दिलेली चेतावणी त्याला काही काल चैतन्य देऊ शकली, तरी वयामुळे व आतापर्यंत पडलेल्या ताणामुळे त्याचे मन कच खाऊ लागले. अलेक्झांडरची बरोबरी करण्याचा विचार काही केल्या त्याच्या मनात मूळ धरीना. जास्तीत जास्त पर्शियापर्यंत फार तर धडक द्यावी, एवढाच बेत त्याने नक्की करीत आणला.

''पर्शियात जाईपर्यंत मार्गात आपल्याला कोठे प्रतिकार होईल असे वाटत नाही. एकदा पर्शियन लोकांना धूळ चारली, म्हणजे मग आपणांस आपले पुढचे बेत आखता येतील.'' एके दिवशी सीझर मार्क अँटनीला म्हणत होता.

''अरे देवा! पुढे तर अवाढव्य पर्वतराजी आहे, असं म्हणतात. ह्या पर्वतराजीतून सैनिक पार करणं अशक्यच आहे, असं ऐकतो!''

''ह्यापूर्वी जर हा दुर्गम प्रदेश ओलांडला गेला असेल, तर मग आताही ओलांडता आलाच पाहिजे.''

मार्क अँटनीला कळून चुकले, की सीझर ही नवी मोहीम हाती घेतल्याशिवाय राहात नाही. तो म्हणाला, ''मोहीम म्हटली, की खर्च आलाच. आणि मला वाटतं, ह्या मोहिमेला तर अवाढव्य खर्च येईल!''

''कोणती युद्धं पैशाशिवाय होतात, अँटनी? युद्ध म्हटलं, की खर्च ठेवलेलाच! मार्गात मिळणारं यशच आपणांस लागणारा पैसा देणार आहे. पराजित राष्ट्रांचे खजिने आपलेच असतात, अँटनी!''

''पण त्यांनी ते आपल्या हाती लागू दिले पाहिजेत ना?''

''सध्या क्लिओपॅट्राने इजिप्तचा खजिना तर आपल्या हाती देऊ केला आहे; पण त्याचबरोबर रोमन लोकांनीही आपला भाग उचलला पाहिजे. उद्या लोकसभेत मी हा प्रश्न मांडणार आहेच! रोमन लोकांनी ह्या मोहिमेसाठी काही पैसा उभा केला पाहिजे!''

''लोकसभा ह्या योजनेला जरूर पाठिंबा देईल. नव्या मोहिमेची कुणकुणही रोमन जनतेला लागली आहे. ती उत्साहभरित आहे. प्रथम पार्थियन लोकांवर विजय संपादन झाला पाहिजे. पूर्वापार असा समज आहे, की पार्थियन लोकांना सम्राटाशिवाय अन्य कोणी पराभूत करूच शकत नाही.''

''मी ही आख्यायिका ऐकली आहे; पण हा शुद्ध लोकभ्रम आहे.'' अँटनीकडे बारकाईने पाहात सीझर म्हणाला.

''मला वाटतं, पार्थिया अगर पर्शियावर स्वारी करण्यापूर्वी आपण आपल्याकडे सम्राटपद घ्यावं! ह्या घटनेचा परिणाम चांगला होईल. खरं असो, खोटं असो, पार्थियन लोक सामान्य योद्ध्याकडून पराभूत होणार नाहीत, असा दृढ समज सर्वत्र रूढ आहे. मग विषाची परीक्षा पाहाच का? सम्राटपद घेऊन मग मोहीम चालू केली, म्हणून बिघडलं कुठे?''

सीझरला हवे होते, तेच अँटनी बोलत होता. पण वरकरणी औदासीन्य दाखवून तो म्हणाला, ''अँटनी, ह्या गोष्टीचा विचार करण्याचा मला आता कंटाळा आला आहे. आतापर्यंतचं माझं सर्व आयुष्य युद्ध आणि राजकीय कारस्थानं करण्यात खर्च झालं आहे. माझ्या दैवाने मला सर्वकाल हात दिल्याने ह्याबाबतही दैवयोगाने तसं काही घडल्यास कुणी सांगावं?''

दुसऱ्या दिवशी लोकसभेत त्याच्या ह्या नव्या मोहिमेची कल्पना मोठ्या उत्साहाने उचलून धरण्यात आली. रोमन जनतेनेही त्याला अपेक्षेबाहेर साथ दिली. नव्या मोहिमेची तयारी चालू झाली. सीझरवर विलक्षण ताण पडू लागला. ह्यामुळे अधून मधून त्याला अपस्माराचे झटके येऊ लागले. त्याची ही अवस्था पाहून क्लिओपॅट्रा खिन्न झाली. त्याने ह्या मोहिमेचा नाद सोडावा, असे तिला वाटू लागले. आपण त्याला उगीच भरीला घातले, असेही तिला वाटू लागले. पण सीझर आता तिचे ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. त्याने पाऊल उचलले होते. तो म्हणाला, ''मी आता दीर्घकाल जगलो आहे. मरणाची वाट पाहात इथे बसण्यापेक्षा, समरांगणातच त्याची भेट घेणं श्रेयस्कर आहे क्लिओपॅट्रा!''

●●●

## ६. क्लिओपॅट्राची चिंता

मार्क अँटनी हा एक भीमकाय, पण सुंदर पुरुष होता. सीझरचा दुय्यम म्हणूनच लोक त्याला ओळखीत. त्याच्या रुबाबामुळे रोमच्या स्त्रीजगात मात्र तो विलक्षण लोकप्रिय होता.

एके दिवशी सीझर मार्क अँटनीला घेऊन क्लिओपॅट्राच्या प्रासादात आला होता. तिची ओळख करून घेतल्यानंतर मार्क अँटनी म्हणाला, ''राणीसरकार, मी मागे एकदा आपणास भेटलो होतो.''

मुद्रेवर आश्चर्याचा भाव दाखवीत क्लिओपॅट्राने विचारले, ''केव्हा?''

''सुमारे दहा वर्षांपूर्वी! त्या वेळी मी रोमन घोडदळाचा प्रमुख म्हणून अलेक्झांड्रियात वावरत होतो!'' क्लिओपॅट्राने आपल्याबाबत दाखविलेली विस्मृती अँटनीला चांगलीच जाणवली. त्याच्या गर्विष्ठ मनाला हा एक प्रकारे उपमर्दच वाटला. ह्या वेळी मार्क अँटनीचे वय चाळिशीच्या घरात होते; तरी पण त्याचा एकूण स्वभाव जरा पोरसवदाच होता. त्याच्याबद्दल बोलताना सिसरो नेहमीच म्हणे, ''हा माणूस म्हणजे शुद्ध खाटीक आहे. त्यानं खरं म्हणजे मुष्टियोद्धाच व्हायला हवं होतं. समंजस समाजात वावरणं त्याला जमणार नाही!'' सिसरोची ही टीका थोडीफार कठोर असली, तरी तिच्यात वास्तवता नव्हती असे मात्र मुळीच नाही.

अँटनीचे वागणे बेफाट व बेजबाबदार असले, तरी तो आपल्या सैनिकांचा मात्र विलक्षण लाडका होता. रणधुमाळी आटोपताच तो जातीनिशी हिंडून प्रत्येक शिपायाची वास्तपुस्त करी. जखमी सैनिकांना मदत करी. त्यांच्याबद्दल अपरंपार सहानुभूती दाखवी. अँटनी वक्ता होता. नट होता. देखणाही होता. विलक्षण सामर्थ्यसंपन्न होता. तसाच तो चैनी व मद्यपीही होता. सीझरचा उजवा हात म्हणूनच तो आता सर्वांना परिचित होता. अलीकडे अलीकडे मोहिमेवर जाताना सीझर रोमच्या कारभाराची सूत्रे अँटनीकडेच सुपूर्द करीत असे.

सीझरच्या राजमुकुट धारण करण्याच्या कल्पनेस अँटनीचा भरघोस पाठिंबा असे. सीझरने रोमच्या सिंहासनावर बसावे, क्लिओपॅट्राने रोमची राणी म्हणून त्याच्या शेजारी विराजमान व्हावे, ही कल्पना त्याला एकदम पसंत होती. सीझरचे क्लिओपॅट्राशी झालेले लग्न कायदेशीर ठरावे म्हणून होणाऱ्या प्रयत्नांना त्याचा मजबूत टेकू असे. रोमन लोकसभेने तसा कायदा करावा, म्हणून अँटनीनेच आटा-पिटा केला होता. आपल्या विवाहाची समारंभाने सांगता करून क्लिओपॅट्राची महत्ता रोमन जनतेस एकदा पटवून द्यावी, अशी सीझरची तीव्र मनीषा होती. पण खुद्द क्लिओपॅट्रालाच ही गोष्ट तितकीशी संमत नव्हती. ती म्हणे, ''आपण आपली नवी मोहीम पूर्ण करून आल्यानंतर हा समारंभ करणं अधिक औचित्यपूर्ण व श्रेयस्कर ठरणार आहे.'' पण सीझरला वस्तुस्थितीची पूर्ण कल्पना होती. तो म्हणाला, ''ही मोहीम आटोपण्यास कमीत कमी तीन वर्ष लागतील, आणि तोपर्यंत आपणास थांबावं लागेल.''

आपले मनोराज्य प्रत्यक्षात येण्यास कमीत कमी तीन वर्षांचा कालावधी लागणार, हे ऐकून क्लिओपॅट्रा अस्वस्थ झाली. सीझरने अलेक्झांडरप्रमाणे विजय संपादन करावा असे सुचविताना तिच्या डोक्यात कालमर्यादेचा विचार मुळीच आला नव्हता. सीझरच्या दीर्घकालीन संभाव्य गैरहजेरीत रोममध्ये काय काय घडू शकेल अगर काय काय घडू शकणार नाही, हे सांगणे मोठे कठीण होते. रणांगणावर सीझरचे काही कमीजास्त झाल्यास आपल्या मुलाचे, सीझेरानचे कसे काय होणार ही चिंताही तिला रात्रंदिवस गांजू लागली. ''चार्मियन, मला ह्या साऱ्या गोष्टींचा गंभीरपणे विचार केला पाहिजे!'' ती आपल्या विश्वासू सहचरीला म्हणत होती. ''सीझर इथे आहे तोपर्यंत सारं ठीक आहे. पण एकदा तो मोहिमेवर बाहेर पडल्यानंतर लोक इकडे काय बोलतील, काय करतील, ह्याचा नेम सांगता येत नाही!''

एके दिवशी मार्क अँटनी तिला म्हणाला, ''मला सीझरबद्दल चिंता वाटू लागली आहे. त्याचं वागणं थोडंफार चमत्कारिक होऊ लागलं आहे. लोकसभा सदस्य त्याच्या भेटीला गेल्यास त्यांना उत्थापन देण्याचा शिष्टाचारही त्याने सोडून दिला आहे. काल एका चर्चेच्या प्रसंगी त्याने

आपल्या हुकुमाचा अंमल न झाल्याबद्दल तक्रार केली. सदर हुकूम लोकसभेत कायदा म्हणून संमत न झाल्याचं त्याच्या निदर्शनास आणताच तो खवळून ओरडला, 'माझा शब्द म्हणजेच कायदा आहे!' खुद्द सीझरलासुद्धा न शोभणारं असं काहीतरी घडत आहे खरं!''

''पण अँटनी, सीझरच्या ह्या वागण्याला एक प्रकारे तुझ्याकडूनच उत्तेजन मिळत गेलं आहे हे खरं ना?'' क्लिओपॅट्रा म्हणाली, ''सीझर धारण करीत असलेलं राजमुकुटवजा शिरस्त्राण तुझ्याच कल्पनेतून जन्माला आलं हे खरं ना?''

ह्यानंतर दोनच दिवसांनी घडलेला प्रसंग अत्यंत गंभीर स्वरूपाचा होता. सीझर फेरफटका करण्यासाठी मजेने बाहेर पडला असता काही अती उत्साही लोकांनी त्याचा राजा म्हणून जयजयकार केला. न्यायमंडळाला हा रोमन लोकशाहीचा उपमर्दच वाटला. न्यायमंडळाने तत्काळ ह्या लोकांना पकडून तुरुंगात डांबले. पण दुसऱ्याच दिवशी सीझरने लोकसभेत आदळआपट करून ह्या पकडलेल्या लोकांची तर मुक्तता केलीच, पण न्यायमंडळातील सदस्यांची हकालपट्टी केल्याचे जाहीर केले.

पुढे पुढे तर सीझरचा दरबार क्लिओपॅट्राच्या प्रासादातच भरू लागला. सीझरच्या सर्व वागण्यात इजिप्शियन ढब दिसू लागली. त्याच्या रोमन रथावर इजिप्शियन साज चढला. रोमची नाणी पाडण्यासाठी इजिप्शियन कारागीर आले. सीझरचे हे वागणे लोकनिंदेस पात्र होऊ लागले. वस्तुत: आता निवृत्त जीवन जगण्याचे त्याचे वय होते; पण त्याचा रंगेलपणाच वाढू लागला होता. सिसरो खरे म्हणजे आता राजकारणात रस घेत नव्हता, पण तोसुद्धा ह्या प्रकाराने खवळला; वेळी अवेळी सीझरवर तोंड सोडू लागला. मित्रमंडळीत बसून तो म्हणे, ''सीझरने इजिप्तहून आणलेलं हे पात्र रोमन संस्कृतीवर आक्रमण करू लागलं आहे. इजिप्तचं पंचांग व अंकगणितही आमच्या माथी बसणार की काय, अशी भीती वाटू लागली आहे.''

''एवढ्यानेच काय भागलं!'' एक म्हातारा लोकसभा-सदस्य खवळून ओरडला, ''सीझरने काढलेली प्रचंड बांधकामं पाहा; ती काय दर्शवतात? ह्या इजिप्शियन बाईचा हात प्रत्येक गोष्टीत आहे!''

''लोकसभासदस्यांना आता ह्या बाईचं घरकाम सीझरने सांगितलं नाही, म्हणजे मिळवलं!'' तिसरा एक म्हातारा चडफडला.

''माझी भविष्यवाणी लक्षात ठेवा!'' सिसरो खवळून ओरडला, ''सीझरच्या साऱ्या योजना अल्पावधीतच धुळीला मिळाल्याशिवाय राहाणार नाहीत! रोमन लोकशाही एका बाईसाठी, तिच्या महत्त्वाकांक्षेसाठी, कधीच मरण पत्करणार नाही!''

क्लिओपॅट्रा अगर अँटनी ह्यांच्याशी बोलताना सीझर आपली मनोव्यथा अगदी उघड उघड प्रकट करू लागला होता. तो म्हणे, ''रोमन जनतेसाठी मी अपरंपार कष्ट केले आहेत. वस्तुत: तिने आपण होऊनच मला राजमुकुट अर्पण केला पाहिजे! मी राजपद भीक मागून घ्यावं, ही कल्पनाच सहन होण्याजोगी नाही. ह्या लोकांना हे समजण्याची अक्कल पाहिजे, की माझी रोमन पत्नी ह्यापुढे मला वारस देऊ शकणार नाही. अशा स्थितीत मला पुत्ररत्नाचा लाभ करून देणारी क्लिओपॅट्रा त्यांनी राणी म्हणून मान्य केली पाहिजे. सीझेरानला युवराजपद दिलं पाहिजे!''

क्लिओपॅट्रा समजून होती, की तिच्या आकर्षणापलीकडे आता सीझरची वयोमर्यादा गेली आहे. आपल्याबद्दल त्याच्या मनात असलेली आस्था, अगत्य ह्यांचा धागा सीझेरानमुळे - आपल्या मुलामुळे तग धरून आहे. आपले तारुण्य वा सौंदर्य आता सीझरच्या वासनेचे विषय राहिलेले नाहीत.

फेब्रुवारी महिन्याच्या मध्यास ल्युपरकलचा महोत्सव आला. त्याच नावाच्या देवतेचा हा उत्सव आज कित्येक वर्षे रोमन लोक परंपरेने पाळीत आले होते. ह्या उत्सवाची सुरुवात एक बोकड व एक कुत्रा ह्यांच्या बलिदानाने होत असे. उत्सवाचे स्वरूप तसे आर्षच असे; पण ह्या आर्षपणात - बीभत्स प्रकारात भाग घेताना रोमन जनतेच्या उत्साहाला उधाण येत असे.

ह्या उत्सवाचा धुडगुस पाहात सीझर आपल्या उच्चासनावर बसला होता. लाखो रोमन स्त्रीपुरुष क्रीडांगणावर गोळा झाले होते. प्रामुख्याने मार्क अँटनी ह्या धुडगुसात हैदोस घालीत होता. एकाएकी उडी मारून तो सीझर बसलेल्या उच्चासनापाशी आला आणि ओरडून म्हणाला,

''सीझर! सीझर!! हा रोमचा राजमुकुट धारण कर!'' त्याने राजमुकुटसदृश एक शिरस्त्राण सीझरच्या हाती दिले. ही सर्व योजना बुद्धिपुरस्सर आखण्यात आली होती. जमलेल्या अथांग जनसमुदायात ठिकठिकाणी सीझरने आपले अनुयायी पेरून ठेविले होते. अँटनीचे शब्द ऐकताच ह्या हस्तकांनी एकदम सीझरचा जयजयकार करण्यास सुरुवात केली. पण एकंदर जमावाने मात्र निराळीच प्रतिक्रिया व्यक्त केली. धिक्काराच्या आरोळ्या उठल्या. कित्येकांनी अँटनी व सीझर ह्या दोघांचीही हुर्यो करण्यास सुरुवात केली आणि ह्या योजनेच्या योजकांचा चांगलाच बोऱ्या वाजला. त्यांच्या फजितीला पारावार उरला नाही. सीझर मनोमनी उमजला. खजील झाला. त्याने अँटनीचा हात झिडकारून आपली नापसंती व्यक्त केली.

एकंदरीत वातावरण प्रतिकूलच दिसू लागल्याने क्लिओपॅट्रा इजिप्तला परतण्याचा विचार करू लागली. सीझरविरोधी कट होऊ लागल्याच्या अफवा सर्वत्र उठू लागल्या. सीझरने मोहीम हाती घेतल्यास तो लवकर परतण्याची शक्यता नव्हती. कोणत्याही परिस्थितीत रोममध्ये दीर्घकाल राहाणे तिला धोकादायक वाटू लागले. काही दुश्चिन्हेही घडत असल्याच्या वार्ता येऊन धडकू लागल्या. त्यामुळे तिच्या भोळसट व इजिप्शियन लोकभ्रमात वाढलेल्या मनावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होऊ लागला.

एका अंधाऱ्या रात्री आकाश एकाएकी देदीप्यमान प्रकाशाने उजळून निघाले आणि एक प्रचंड धूमकेतू आकाशमार्गे आक्रमण करताना दिसू लागला. ह्या अशुभ घटनेने तिच्या मनाचा थरकाप होऊन गेला. कधीही ऐकावयास न मिळणारे रात्रीचर पशुपक्ष्यांचे आवाज वेळी अवेळी कानी येऊ लागले. ही सर्व अशुभ लक्षणे तिच्या स्त्रीमनाला भयचकित करू लागली. ब्रुट्सबद्दलच्या तिच्या शंका बळावू लागल्या. ब्रुट्स व कॅशीयस् काही गुप्त कारस्थान करण्यात गुंग आहेत, अशा वार्ता वारंवार तिच्या कानी येऊ लागल्या. तिचे हेर आले रे आले, की काहीतरी चिंताजनक वार्ता वा अफवा घेऊनच येत. रोमची लोकशाही शाबूत व स्थिरपद ठेवण्यासाठी आपण प्राणार्पण करण्यास तयार आहोत, अशा ब्रुट्सच्या जाहीर वल्गना तिच्या कानी येऊ लागल्या.

काहीतरी कारस्थान शिजत आहे, अशी वार्ता सर्वत्र पसरत होती. पण हे कारस्थान काय आहे? कोणत्या अवस्थेत आहे? कोण घडवीत आहे? हे कळण्यास काही मार्ग नव्हता. सीझरला राजमुकुट धारण करू दिला जाणार नाही, एवढे मात्र तिला कळून चुकले. रोममध्ये असलेल्या लोकशाहीचा बडेजाव तिच्या मनाला पटत नव्हता. पण तिला पटण्या न पटण्याचा प्रश्नच नव्हता. त्याचा काही उपयोगही नव्हता. रोमचे राजकारण सीझरच्या व पर्यायाने आपल्या विरुद्ध जात आहे, ह्याची तिला खात्री होऊन चुकली होती. ती एकटीच ह्या प्रकरणी चिंतातुर होती असे नाही. ह्या दुश्चिन्हामुळे सीझरची खुद्द पत्नीही चिंतातुर झाली होती. ही दुश्चिन्हे सीझरला मृत्यू तरी आणतील अगर तो इजिप्शियन स्त्रीच्या नादाने सर्वस्वाला मुकून सर्वनाश तरी ओढवून घेईल, अशी तिची कल्पना होती. ह्या एकमेव धास्तीने तिचे मन सारखे पोखरले जात होते.

सीझर काही लोकभ्रमांच्या आहारी जाणारा माणूस नव्हता, तो निर्भयपणे वावरत होता. रात्री-अपरात्री, काळोख्या रात्रीसुद्धा रोमच्या रस्त्यावरून त्याचा अनिर्बंध संचार चालू होता. क्वचित प्रसंगी आपल्या मागून कोणी येत तर नाही ना? आपणांस पाहून कोणी काही कुजबुजत तर नाही ना? अशी शंका त्याच्या मनास चाटून जाई. एके दिवशी लॅपीडसने त्याला अनपेक्षितपणाने विचारले, ''सीझर, तुला इच्छामरण हवं असल्यास तू कोणतं मरण पत्करशील?'' सीझर गंभीरपणाने उद्गारला, ''एकदम, अनपेक्षित मरण!''

एके दिवशी क्लिओपॅट्रा अस्वस्थपणाने निद्रादेवीची आराधना करीत आपल्या बिछान्यावर पडली होती. सीझरही त्याच मन:स्थितीत पडून होता. वारा, वावटळ, वादळ काहीही नसताना एकाएकी खडाखड् आवाज होऊन सर्व खिडक्यादारे उघडली गेली आणि मग आकाश धूमकेतूच्या प्रखर प्रकाशाने तेजाळलेले दिसू लागले. ह्या घटनेने सीझरसारखा सीझरसुद्धा हादरला, भयचकित झाला. अर्धवट झोपेत क्लिओपॅट्रालाही काहीतरी भयानक स्वप्न पडले होते. सीझरचा मृतदेह आपल्या हाती आल्याचा भास तिला झाला होता. ती खडबडून उठली व

घाबऱ्याघाबऱ्या म्हणाली, ''आपण उद्या कुठेही बाहेर जाऊ नका!''

सीझर तिला शांत करण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, ''वेडे, उद्या तर लोकसभेची महत्त्वाची बैठक आहे. बाहेर न जाऊन कसं चालेल?''

''मग बैठक तहकूब करा!''

''नाही! तुला अशुभ स्वप्न पडलं, म्हणून लोकसभेची महत्त्वाची बैठक लांबणीवर टाकणं कसं शक्य आहे? नव्या मोहिमेवर जायला मान्यता द्यावी म्हणून बोलावण्यात आलेली ही बैठक, सीझरच्या पत्नीला अशुभ स्वप्न पडलं म्हणून तहकूब करणं कसं शक्य आहे?''

''बैठक तहकूब करा अगर न करा, पण निदान कुणाला तरी विचारून संकट निवारण्यासाठी काही धर्मकृत्य तरी करा!''

क्लिओपॅट्राने व्यक्त केलेल्या भीतीमुळे सीझरच्या मनाची थोडीफार चलबिचल झाल्याशिवाय राहिली नाही; तरी पण, सीझरने भिऊन लोकसभा स्थगित केली, हा विचारही त्याला मान्य होण्याजोगा नव्हता.

सीझरचा एक चाहता अल्बीनस् आज भल्या सकाळीच त्याला भेटण्यास आला होता. त्याने आल्याआल्याच सीझरला म्हटले, ''आज लोकसभेने काय निर्णय करायचं ठरवलं आहे, ह्याची काही गुणगुण तुला लागली आहे का?'' सीझरने नकार दर्शविताच तो पुढे म्हणाला, ''इटलीच्या सरहद्दीबाहेर, इटलीच्या वर्चस्वाखाली असलेल्या मुलखाचं राजेपण तुला द्यायचा लोकसभेचा विचार आहे. रोमची लोकशाही शाबूत ठेवून तुझी महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा लोकसभेचा विचार आहे.''

अल्बीनसचे हे भाषण ऐकून सीझर थोडाफार उल्हसित झाला. त्याच्या मनावरील औदासीन्याचे पटल काही अंशी दूर झाले! इटलीच्या सरहद्दीबाहेरील रोमन साम्राज्याचा राजा म्हणून आपणास मान्यता मिळणार, ह्या बातमीने त्याच्या मनाची अस्वस्थता नष्ट झाली. सीझर प्रासादातून बाहेर पडला व लोकसभेस जाण्यासाठी मेण्यात जाऊन बसला. अल्बीनस मेण्याजवळ उभा असताच त्याने मेणा लोकसभेकडे नेण्याचा हुकूम वाहकांना दिला. सीझरला कल्पनाही नव्हती, की आपल्या विरुद्ध कट करणारे कटवाले आजूबाजूला टेहेळणीवर आहेत म्हणून. सीझरचा मेणा चालू लागताच त्यांनी परस्पर संकेताने आपला आनंद व्यक्त केला. सर्व गोष्टी कशा सुरळीत चालू झाल्या होत्या. कारस्थानात ठरल्याप्रमाणे कोणत्याही गोष्टीला व्यत्यय म्हणून येत नव्हता. योजना तंतोतंत पार पडण्याचा योग दिसत होता.

सीझरचा मेणा लोकसभेच्या दिशेने झपझप चालला होता आणि मार्गात एक अनपेक्षित घटना घडली. मार्गावर असलेले कटवाले ह्या घटनेमुळे जरा चमकल्यागत झाले. सीझरचा ग्रीक मित्र आर्कीमिडास सामोरा आला, त्याने भोयांना इशारा करून मेणा थांबविला व तो सीझरपाशी आला. कटवाले थोड्या अंतरावरून हा सर्व प्रकार पाहात होते. मेणा चालू झाला. आर्कीमिडास बोलत बोलत मेण्याबरोबर चालू लागला. सीझर व आर्कीमिडास ह्यांचे काय बोलणे चालले होते, हे कटवाल्यांना कळण्यास काही मार्ग नव्हता, पण त्याने सीझरच्या हाती कागदांची एक गुंडाळी दिलेली त्यांनी पाहिली.

आर्कीमिडासने ठामपणाने तलासी करून कटवाल्यांची एक यादीच करून आणली होती व तीच त्याने आता सीझरच्या हाती दिली होती. यादीत पहिलेच नाव अल्बीनसचे असल्याने सीझरने ती यादी एकदा नजरेखाली घालावी असा आर्कीमिडासचा आग्रह होता; पण त्याला तो व्यक्त करणे अवघड झाले होते; कारण अल्बीनस तेथेच उभा होता. सीझरला काहीच कल्पना नसल्याने त्याने ती कागदाची गुंडाळी तशीच हातात धरून ठेवली व मेणा झपाट्याने पुढे निघाला. सीझरने कागद न उलगडता मेणा चालू केल्याने कटवाल्यांचा जीव भांड्यात पडल्याप्रमाणे झाले.

इकडे सभागृहाच्या पायऱ्यांवर उभा राहून सीझरची वाट पाहाणारा कॅशीयस् ब्रुट्सला म्हणाला, ''पाहिलेल्या दुश्चिन्हांना भिऊन सीझर लोकसभेत आला नाही तर मात्र सारंच ओंफस् होणार आहे!''

पण त्याचे उद्गार पूर्ण होण्यापूर्वीच सीझरचा मेणा लोकसभेच्या दिशेने येत असल्याचे त्यांना दिसून आले.

●●●

## ७. सीझरचा वध

लोकसभेच्या सभागृहापाशी येताच सीझर मेण्यातून खाली उतरला. एका सभासदाने सामोरे येऊन त्याचे स्वागत केले व सीझर त्याच्याशी बोलू लागला. कटवाल्यांना लगेच शंका आली. पण वस्तुस्थिती निराळी होती. तो माणूस आपले काही वैयक्तिक गाऱ्हाणे सीझरच्या कानावर घालीत होता.

असा एक प्रघातच होता, की अधिवेशन चालू होण्यापूर्वी एखादा पशू-पक्षी बळी द्यायचा! ह्या बळीवरून शुभाशुभ फळ ठरविले जाई. ह्या खेपेस एक पक्षी बळी देण्यासाठी आणला होता, पण तो अव्यंग निघाला नाही. बळी दिल्यानंतर त्याची रोगट अवस्था दृष्टोत्पत्तीस आली. सर्वांना वाटले, ही घटना मोठी अशुभ घडली. सीझर म्हणाला, ''छट्, ह्या साऱ्या भ्रामक कल्पना आहेत! मी स्पेनच्या युद्धावर गेलो, त्या वेळीही असंच घडलं होतं; पण मी मात्र संपूर्ण विजयी झालो.'' पण तेथे असलेला भविष्यवादी आपला हेका सोडेना. ही घटना अत्यंत अशुभ असल्याची त्याची वटवट चालूच राहिली. पण सीझरने त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले व तो सभागृहात येऊन दाखल झाला. बाकीचे सभासद आधीच येऊन आपापल्या स्थानावर विराजमान झाले होते.

सीझरला विलंब झाला होता. सीझर कदाचित् येणारच नाही ह्या कल्पनेने त्याचे आसन मांडणारा नोकरही गाफील राहिला होता. त्याने अद्यापि आसन मांडले नसल्याने सीझरची जागा सुनी राहिली होती. हा दुसरा अपशकुन होता.

सीझर सभागृहात येताच सर्वांनी त्याला उत्थापन दिले, नेहमीप्रमाणे त्याचे स्वागत केले. सीझरने आपल्या नेहमीच्या प्रघाताप्रमाणे मोठ्या दिमाखाने अभिमानपूर्वक सभागृहाचे एकवार निरीक्षण केले. त्याचे गरुडासारखे बाकदार नाक व तीक्ष्ण नजर, त्याच्या नजरेतून काहीही सुटणार नाही ह्याची ग्वाही देण्यास समर्थ होती. सभा त्याच्या अर्ध्या वचनात होती आणि सभासद रोमन जनतेचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे रोमन जनता आपल्या मुठीत आहे, असा त्याचा सार्थ अभिमान होता. आजची लोकसभा इटलीच्या सरहद्दीपलीकडे असलेल्या रोमन साम्राज्याचे आधिपत्य त्याला देणार होती. एका विशाल साम्राज्याचा सम्राट म्हणून आज त्याचा गौरव होणार होता. पण कटवाल्यांनी काही निराळीच योजना आखलेली दिसत होती.

गेले कित्येक महिने मार्क अँटनी सीझरला सारखा आग्रह करीत होता, की त्याने स्वत:साठी एक खास शरीरसंरक्षक दल नियुक्त करावे. तो जेथे जेथे जाईल, तेथे तेथे ह्या रक्षकांनी त्याच्याबरोबर राहावे. ह्यावर सीझर म्हणे, ''मी परमुलुखात स्वारीवर असतानासुद्धा रक्षकाशिवाय हिंडलो- फिरलो आहे. मग खुद्द रोममध्ये, माझ्या घरात, ह्या शहरात वावरताना मला ह्या गोष्टीची काय आवश्यकता आहे?''

सीझरचा हा आत्मविश्वास अनाठायी आहे, ह्याची जाणीव हळू हळू त्याच्या चाहत्यांना होऊ लागली होती; पण शरीररक्षक नेमण्याची दक्षता वा तत्परता कोणीच दाखविली नाही. सीझर सार्वजनिक ठिकाणी असताना त्याच्या आजूबाजूला लोक वावरत नसत असे नाही, पण अधिकृत शरीररक्षक अशी कोणाचीच नेमणूक झालेली नव्हती.

आजची ही सकाळ मोठी दुर्दैवी सकाळ होती. सीझरला लोकसभेत येण्यास उशीर झाला होता. मार्क अँटनी त्याची वाट पाहात उभा असतानाच सीझर आला व त्याच्या पाठोपाठ सभागृहात जाण्यास निघाला. पण वाटेतच अल्बीनसने त्याला अडविले. तो मोठ्या काकुळतीने म्हणत होता, ''अँटनी, तू तरी माझं एवढं म्हणणं ऐकून घे!'' अँटनी त्याला दूर सारण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, ''सभा आटोपल्यानंतर मी तुझं म्हणणं जरूर ऐकून घेईन.'' तरीही लोचटपणा करीत अल्बीनस त्याची अडवणूक करीत होता. केविलवाणेपणाने म्हणत होता, ''सभा सुरू होण्यास अजून अवधी आहे. अँटनी, माझं म्हणणं ऐकण्यास दहा-पाच क्षणसुद्धा मोडणार नाहीत.'' अँटनीचा अगदी नाइलाज झाला. अल्बीनसचे रडगाणे ऐकण्यासाठी त्याला थांबावे लागले.

इकडे सीझर लोकसभेत स्थानापन्न झाला. इतक्यात

अनेक सभासद त्याच्या भोवती गोळा झाले; प्रत्येकाला जणू काही सीझरशीच बोलायचे आहे, अशा रीतीने त्याच्या आजूबाजूला गर्दी करू लागले. एवढ्यात त्या गर्दीतून वाट काढीत कॅशीयस् नावाचा माणूस घुसून पुढे आला. ''सीझर! सीझर!! माझ्या भावाची हद्दपारी रद्द व्हावी, अशी माझी प्रार्थना आहे.'' तो गयावया करून म्हणाला.

सीझरने आपला एक हात उंच करून सभागृहाला शांत करण्याचा प्रयत्न केला व नंतर तो म्हणाला, ''तुझ्या भावाबद्दल मी एकदाच काय तो निर्णय केला आहे. त्या निर्णयाचा आत्ताच फेरविचार करण्याची आवश्यकता मला दिसत नाही! ह्या क्षुल्लक कामासाठी लोकसभेचा बहुमोल वेळ खर्च करण्याची मुळीच आवश्यकता नाही!''

कॅशीयसच्या भावाचा कैवार घेण्यासाठी सज्ज होऊन आलेले सभासद सीझरच्या ह्या उद्गारांनी चिडले. आरडाओरड करू लागले. हा प्रकार अनपेक्षित होता. आजपर्यंत असे कधीच घडले नव्हते. सीझरच्या शब्दाला विरोध करण्याचे साहस लोकसभेने कधीच दाखविले नव्हते. सीझरच्या उभ्या आयुष्यात अशा रीतीने तोंडाला तोंड देण्याचा प्रसंग ह्यापूर्वी कधीच आला नव्हता.

ह्या प्रकाराने तो खवळून गेला. हा उपमर्द सहन करणे त्याला शक्य नव्हते. तो गरजला, ''मी जे बोललो ते बोललो! सभागृहाच्या रीतसर कामाला आता सुरुवात झालीच पाहिजे!''

कटवाले निमित्ताचीच वाट पाहात होते. एकजण ओरडून म्हणाला, ''सीझर, तू स्वत:ला राजा समजतोस काय?'' तुझ्या अंगावरचा हा झगा राजाचा झगा आहे, अशी तुझी कल्पना आहे काय? रोमन जनता लोकशाही मानते, राजेशाही नाही!'' तो माणूस रागारागाने पुढे आला व तो काय करणार आहे हे लक्षात येण्यापूर्वीच त्याने सीझरच्या अंगावरील गडद जांभळ्या रंगाचा झुब्बा टर्रकन् टरकावला. जणू काही हा संकेतच होता; कटवाल्यांच्या एकूण योजनेचा हा एक भागच होता. त्या माणसाच्या अमर्याद वागण्याने स्तिमित झालेला सीझर भानावर येण्यापूर्वीच तो माणूस ओरडला, ''दोस्तहो, तुम्ही आता का थांबला आहात?''

ह्या प्रकाराची काहीच कल्पना नसणारे काही सभासद भयचकित होऊन हा सारा प्रकार पाहात स्तब्ध उभे होते. एवढ्यात मागून आलेल्या कास्काने आपल्या तरवारीने सीझरच्या मानेवर वार केला. सीझरने झटकन् वळून कास्काचा हात आपल्या पोलादी पंजात पकडला. कास्काचा वार त्याला तसा वर्मी लागला नव्हता. तो ओरडला, ''दुष्ट कास्का, तू काय करीत आहेस? तुला खूळ लागलं आहे की काय?'' एवढ्यात कास्काच्या भावाने आपली तलवार सीझरच्या कुशीत जोराने खुपसली. ज्याचे प्राण सीझरने वाचवले होते, त्या कॅशीयसने सीझरच्या तोंडावरच वार केला.

सीझरचे वय झाले होते. अपस्माराच्या व्यथेने त्याचा देह जीर्णशीर्ण झाला होता. शरीरसंपदा पोखरली गेली होती. तरी पण नि:शस्त्र सीझरने आपले सीझरपण प्रकट केल्याशिवाय सोडले नाही. पण उपयोग होण्याची शक्यता नव्हती. शिकाऱ्यांच्या तावडीत सापडलेल्या काळविटाप्रमाणे त्याची अवस्था झाली होती. तो झगडत होता व त्याचे रक्त पाहून कटवाल्यांचा त्वेष वाढत होता. त्यांचा राग भडकून उठत होता. ब्रुट्सने त्याच्या मांडीवर जबरदस्त वार केला, तर कोणी त्याच्या पाठीवर वार केला. एखाद्या प्रचंड वृक्षावर लाकूडतोड्यांनी घाव घालावेत त्याप्रमाणे मारेकरी आपली शस्त्रे सीझरच्या देहावर चालवीत होते. आणि शेवटी ब्रुट्सने आपला खंजीर सीझरच्या वक्ष:स्थळांत जोराने खुपसला.... खोलवर खुपसला.

सीझरच्या तोंडावर दु:खाची, विषण्णतेची, गोंधळाची एकच दाट छाया पसरली. तो कळवळून मोठ्या कष्टाने ओरडला, ''ब्रुट्स, माझ्या मुला, तूसुद्धा ह्या चांडाळ चौकडीत आहेस ना!'' त्याने आपल्या झब्ब्याने आपले तोंड झाकून घेतले व आपल्या शत्रूच्या, - पॉंपीच्या पुतळ्याच्या पायांपाशी तो धाडकन् कोसळला. त्याचे सर्व शरीर छिन्नभिन्न झाले होते, रक्ताने माखले होते. त्याची प्राणज्योत मालवली गेली होती. आर्कीमिडासने सीझरच्या हाती दिलेल्या यादीतील प्रत्येक माणसाने सीझरवर वार केला होता. सीझरला यादी पाहाण्याची बुद्धी झाली नाही. त्याची घटकाच भरली होती. सूडाने वेडावलेले व खून चढलेले कटवाले सीझरच्या मृतदेहावरही सपासप वार

करीत होते. फार काय, ह्या उन्मादात त्यांनी एकमेकांवर वार करण्यासही कमी केले नाही.

एक भयानक घटना घडून गेली. जगातील एक कर्तबगार माणूस मारेकऱ्यांच्या घातकी वारांना बळी पडला. ही घटना इतकी जलद आणि अनपेक्षितपणाने घडली, की सीझरच्या मदतीस जाण्याचेही कोणाला सुचले नाही. आश्चर्य, भीती ह्यांनी दिङ्मूढ झालेले काही सभासद ही घटना पसंत नसूनही जागच्या जागी खिळून गेल्याप्रमाणे झाले होते.

सर्व प्रकार घडून गेला. भीतीचा पहिला धक्का ओसरला. ब्रुट्स लोकसभेला उद्देशून भाषण करण्यासाठी म्हणून आपल्या रक्ताळलेल्या हातांनी व्यासपीठावर चढला. पण हां हां म्हणता सभागृह रिकामे झाले. ह्या भयानक जागेतून बाहेर पडण्यासाठी प्रत्येकाची धडपड, धावपळ चालू झाली. ठेचकळत, अडखळत, पडत, झडत सर्व लोकसभासदस्य धावत सुटले होते.

हां हां म्हणता ही वार्ता सर्व शहरात पसरली. तमाम रोमन जनता रोमच्या रस्त्या-रस्त्यांतून गोळा होऊ लागली. हवालदिल झालेले लोक एकमेकांना प्रश्न विचारीत राहिले होते, पण कोणासच काही माहीत नसल्याने जो तो बुचकळ्यात पडला होता, भयचकित झाला होता, चिंतातुर होता. लोकसभासदस्यही भयाने अर्धमेले होऊन घर गाठण्यासाठी आडमार्गाने धावपळ करीत होते. न जाणो, लोकसमुदायात सापडल्यास आपली दुर्दशा होण्यास वेळ लागणार नाही, अशी दहशत त्यांनी खाल्ली होती.

दंगल चालू झाली होती. जनतेचे सीझरवरील प्रेम प्रत्ययाला येऊ लागले. सीझरचे तोंडी शत्रुत्व करणारे, पण प्रत्यक्षात त्याच्या मृत्यूला काडीमात्र जबाबदार नसणारे लोकही जनताक्षोभाला बळी पडू लागले, मारले जाऊ लागले. त्यांची घरे-दारे उध्वस्त होऊ लागली. ह्या संधीचा पुरेपूर फायदा उठविण्यास गुंड पुढे सरसावले. त्यांनी अमर्याद लूटमार चालू केली. रोमचे नागरी जीवन उध्वस्त होऊ लागले. ही भयानक अवस्था कोणत्या थराला जाणार हे सांगणे कठीण होते. हा प्रकार कोणी व कसा थांबवावा हा प्रश्नच होता. रोमला शास्ताच राहिला नव्हता. सामान्य नागरिक दारे बंद करून व जीव मुठीत धरून घरी दडी मारून बसले होते.

प्रथम जोरात असलेले कटवाले आपणावरही काही आपत्ती येते की काय, ह्या भीतीने आता दडी मारून बसले होते. आपल्या दुष्कृत्याचा निश्चित परिणाम काय होणार, ह्याची काहीच कल्पना त्यांना करता न आल्याने, ते चांगलेच संत्रस्त झाले होते. आपण केलेले हे एक महान कृत्य असून, आपणच रोमन लोकशाहीचे खरे रक्षक आहोत, अशा भ्रमात ते आरंभी होते. लोकांना हे पटावे म्हणून आपल्या रक्ताळलेल्या तरवारी परजीत व रोमवर अत्याचार करणाऱ्या सीझरचा आपण निकाल लावला हे जाहीर करीत, ते प्रथम सडकांवरून मिरवले, खोटे अवसान दाखवू लागले पण जेव्हा लोकांचा क्रोध उग्र स्वरूप धारण करू लागला, तेव्हा मात्र त्यांची पाचावर धारण बसली.

रोममधील लोकशाहीचा मार्ग आपण निर्वेध केल्याच्या त्यांच्या वल्गना जनतेच्या हलकल्लोळात विरून गेल्या. लोकमताची साथ न मिळाल्याने त्यांचे अवसान खचले. धीर पार सुटला. ''आपण निश्चित कोणत्या अवस्थेत आहोत हे कळेपर्यंत आपल्याला काहीतरी संरक्षण पत्करलेच पाहिजे!'' कास्का कुजबुजला.

''लोकांच्या मनात काय आहे कळण्यास मार्ग नाही. मार्क अँटनी त्यांना कोणतं वळण लावतो, कोण जाणे?'' कॅशीयस म्हणाला.

''आपण एखाद्या बंदिस्त जागेचा आश्रय केला पाहिजे. त्या ठिकाणातून आपणास आपलं संरक्षण करता आलं पाहिजे!'' ब्रुट्स म्हणाला. बेताबेताने त्यांची भडकलेली माथी ताळ्यावर येऊ लागली. वस्तुस्थिती जाणवू लागली. त्यांचे तापलेले रक्त आता थंड होऊ लागले होते. त्यांनी रोमन बाजारबुणग्यांचा एक जथा आपल्या हाताशी धरला. ब्रुट्स धाडस करूनच त्यांच्या म्होरक्याला म्हणाला, ''योद्ध्यांनो, आज रोमला तुमची गरज आहे! सीझर खतम झाला आहे. आम्हाला आणि रोमला तुमच्या संरक्षणाची आवश्यकता आहे!''

त्या बाजरबुणग्यांचा म्होरक्या प्रश्नार्थक मुद्रेने ब्रुट्सकडे व आपल्या अनुयायांकडे आळीपाळीने पाहू लागला. ब्रुट्स काय म्हणत आहे, त्याला नक्की काय हवे आहे, हेच त्याच्या लक्षात येत नसावे. शेवटी रानरेड्याप्रमाणे भासणारा तो म्होरक्या पुढे येऊन म्हणाला, ''ठीक आहे! ठीक आहे!''

आम्ही तुमचे शरीररक्षक म्हणून नोकरी करू. आम्हाला काय, जो कोणी पगार मोजील, त्याची नोकरी!'' एवढे बोलून तो धटिंगण ब्रुटसच्या तोंडाकडे पाहू लागला.

लोकसभेत झालेली गडबड ऐकून अँटनी अल्बीनसला झिडकारून एकदम तिकडे धावला. पण एवढ्यात रक्ताने माखलेल्या तरवारी घेऊन बाहेर पडलेले सीझरचे खुनी त्याच्या दृष्टीस पडले. वस्तुस्थिती ध्यानी येण्यास अँटनीला मुळीच वेळ लागला नाही. पण आता विशेष हालचाल करण्यात अर्थ नाही, हेही त्याला कळून चुकले. तो मुकाट्याने सीझरचा शोध घेण्यासाठी इकडेतिकडे पाहू लागला आणि पाँपीच्या पायांपाशी रक्ताच्या थारोळ्यात पडलेले सीझरचे प्रेत त्याच्या दृष्टीस पडले. तो तेथून निघाला, तो तडक सीझरच्या घरी येऊन दाखल झाला.

सीझरच्या पत्नीला ही भयानक वार्ता केव्हाच कळली होती. सीझरचा मृतदेह घरी आणण्यासाठी आपल्या विश्वासू सेवकांचे एक पथक तिने केव्हाच रवाना केले होते. त्या पथकाने आपली कामगिरी चोख बजावली. सीझरचा मृतदेह त्यांनी घरी आणला. कलपूर्निया - सीझरची पत्नी, निश्चलपणे त्या देहाकडे पाहात उभी होती. सीझरने केलेल्या नव्या विवाहामुळे सीझरबद्दल जरी तिला फारशी आस्था राहिली नव्हती, तरी त्याचा छिन्नभिन्न देह पाहिल्यानंतर मात्र तिला अत्यंत दु:ख झाले, असह्य यातना झाल्या.

अँटनीने मात्र तत्काळ पुढील कामाला हात घातला. यदाकदाचित् सीझरच्या घरावर हल्ला झालाच, तर काळजी घेतलेली असावी, म्हणून त्याने त्याच्या पत्नीच्या अनुमतीने महत्त्वाची सर्व कागदपत्रे व चीजवस्तू हलवून आपल्या घरी नेऊन ठेवल्या. क्लिओपॅट्राच्या एका विश्वासू गुलामाने, सीझरच्या वधाची वार्ता तातडीने तिच्या कानी घातली होती. तिच्यावर वज्राघात झाल्याप्रमाणे झाले. दु:खावेगाने तिने स्वत:ला एका खोलीत कोंडूनच घेतले.

तिची सर्व सुखस्वप्ने ह्या एकाच घटनेमुळे एका क्षणात धुळीला मिळाली होती. आपल्या मुलाचे काय होणार, ही चिंता तिला व्यथित करू लागली. सीझरच्या वधानंतर दुसऱ्या मध्यरात्रीच मार्क अँटनी तिला भेटण्यास आला. सीझरने मरणापूर्वी आठच दिवस आधी आपले मृत्यूपत्र करून ठेवले असल्याची वार्ता सर्वत्र पसरली होतीच. अँटनीने तिला ती खरी असल्याचे सांगितले. ही गोष्ट आतापर्यंत आपणास अज्ञात राहावी, सीझरनेही आपणास तिचा थांगपत्ता लागू देऊ नये, ह्या घटनेचे तिला मनस्वी दु:ख झाले.

मार्क अँटनीने सीझरचे मृत्यूपत्र अनेक साक्षीदारांसमक्ष वाचले होते. सीझरच्या अनेक कागदपत्रांसमवेत ते त्याच्या हाती लागले होते. क्लिओपॅट्राला त्याबाबत जाणीव करून द्यावी, म्हणूनच तो इतक्या अपरात्री तिच्या प्रासादात आला होता.

''इजिप्तच्या राणीसाहेब, हे मृत्यूपत्र एकूण जरा धक्कादायकच आहे!'' तो म्हणाला.

आपण राजपद स्वीकारण्यापूर्वीच जर मृत्यूमुखी पडलो तर व्यवस्था केलेली असावी, म्हणून सीझरने हे मृत्यूपत्र करून ठेवले असावे हे स्पष्ट दिसत होते. ह्या मृत्यूपत्राने त्याने आपली सर्व स्थावर व जंगम मालमत्ता आपल्या भाईबंदांना देऊन टाकली होती. टायबर नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या आपल्या सर्व शेतजमिनी त्याने रोमन नागरिकांना बहाल केल्या होत्या. सबंध मृत्यूपत्रात क्लिओपॅट्राच्या नावाचा साधा उल्लेखही कोठे दिसत नव्हता.

अँटनीने सोबत आणलेले ते मृत्यूपत्र क्लिओपॅट्राला अथपासून इतिपर्यंत वाचून दाखविले.

●●●

## ८. आणि पुढे....

''मजबद्दल आणि सिझेरानबद्दल ह्यात काहीच उल्लेख नाही काय?'' अँटनीचे वाचन पुरे होताच क्लिओपॅट्राने अत्यंत निराशेने विचारले.

''काहीच नाही!'' तिची केविलवाणी नजर चुकवीत अँटनी उद्गारला.

''ह्यानंतर लिहिलेले आणखी एखादं मृत्यूपत्र तर नाही ना? मी राहात असलेला हा प्रासादही दुसऱ्यांना देऊन टाकण्यात आला आहे. सबंध इटलीत मला व माझ्या मुलाला डोके टेकण्यापुरतीही हक्काची जागा शिल्लक ठेवण्यात आलेली नाही ना? माझं एक राहूद्या, पण सीझरला आपल्या मुलाचीही आठवण होऊ नये ना?''

''त्याला कदाचित ती झालीही असेल, पण रोमन कायदा अगदी निराळा असल्याने, त्याचा नाइलाज झाला असेल. ह्या कायद्याने अनौरस संततीला काहीही मिळू शकत नाही. रोमन स्त्रीपासून झालेली संततीच फक्त ह्या कायद्याने औरस ठरते!''

''ऑक्टिव्हियनसारखा घाणेरडा, विद्रूप माणूस त्याने पुत्रवत् मानला, त्याला वारसा दिला, ह्याची काय आवश्यकता होती? सीझेरान त्याचा पुत्र नव्हता काय?''

''मग ब्रुट्सही त्याचाच पुत्र होता की!''

''अनौरस!'' क्लिओपॅट्रा एकदम भडकून ओरडली. अँटनी बोलला नाही. पण त्याने तिच्याकडे अशा मुद्रेने पाहिले, की रोमन स्त्रीपासून झालेल्या कोणत्याच पुत्राशी सीझेरानची तुलना करता येणार नाही हे तिच्या ध्यानी यावे. आपण परदेशी आहोत, ह्या एकाच गोष्टीमुळे आपला व आपल्या मुलाचा सीझरने काडीमात्र विचार केला नाही, ह्याचे दु:ख तिला चांगलेच जाणवले. ती मोठ्या कष्टाने म्हणाली, ''सीझरने सीझेरानला मनोमनी आपला औरस पुत्र मानलं होतं. अँटनी, तुलाही ही गोष्ट माहीत आहे. मी रोमची राणी झाल्ये असत्ये, तर माझ्या सीझेरानला युवराजपद आलं असतंच की नाही? अँटनी, तुझ्या मित्राचं हृद्गत तुला माहीत होतं. मित्राची मन:कामना पूर्ण करण्याची नैतिक जबाबदारी आता तुझ्यावर आहे. तू आम्हाला मदत केली पाहिजेस! आम्हाला आता तुझाच काय तो एक आधार आहे!''

''मी जरूर खटपट करून पाहीन,'' अँटनी म्हणाला. पण त्याच्या आवाजात आत्मविश्वासाचा संपूर्ण अभाव दिसत होता.

''त्याने आमच्यावर असा अन्याय का करावा? आमच्यामध्ये वितुष्टाचं वादळ कधीच निर्माण झालं नाही; असं असताना त्याने ही गोष्ट का करावी? अँटनी, आयुष्यात मी पहिलं प्रेम केलं ते सीझरवर!'' अँटनीने ह्या सौंदर्यसम्राज्ञीकडे एकदा निरखून पाहिले. त्यालाही मनोमनी पटले, की सीझरने ह्या स्त्रीवर केलेला अन्याय निष्कारण आहे.

ह्यानंतर अँटनी तेथून बाहेर पडला.

कटवाले अद्यापि एका तटबंदीच्या जागेच्या आश्रयाने दडी मारून बसले होते. रोमचे सर्व व्यवहार सुरळीत चालू झाले होते. सरकारी यंत्रणा ठराविक चाकोरीतून काम करीत राहिली होती, पण तीमधील प्रेरक शक्तीच नष्ट झाल्याप्रमाणे झाले होते.

अँटनीने पुढाकार घेऊन लोकसभेची एक बैठक आपल्या घराशेजारच्या मंदिरात बोलावली. भाषण करण्याची ही संधी त्याने बुद्धिपुरस्पर आणली होती व तिचा पुरेपूर फायदा घेण्याचा त्याचा निश्चय होता. तो लोकसभेला उद्देशून म्हणाला, ''झालं हे कृत्य मानवी खास नाही! हे केवळ सैतानी कृत्य आहे!''

ह्या बैठकीचा फारसा गाजावाजा होऊ नये, अशी त्याची इच्छा होती. तशी दक्षताही त्याने घेतली होती. पण बैठक गाजलीच. तीत कडाक्याची चर्चाही झाली. काही सभासदांनी कटवाल्यांची बाजू घेण्यास कमी केले नाही, तर काहींनी त्यांचा कठोर धिक्कार केला. अँटनी उभा राहिला. गंभीर शब्दांत त्याने शांतता राखण्याचा इशारा दिला व सभेत शांतता प्रस्थापित होताच तो बोलू लागला, ''सद्गृहस्थहो, तुम्हाला प्रथम एका गोष्टीचा निर्णय केला पाहिजे. लोकसभेने आपण होऊन सीझरला सर्वाधिकार दिले होते, की त्याने ते जबरदस्तीने घेतले होते? सर्वाधिकारपद त्याला जर आपण राजीखुषीने दिले असेल,

तर त्याचा प्रत्येक शब्द, तो लोकसभेचा शब्द म्हणूनच मानला गेला पाहिजे! लोकसभेने सीझरला सर्वाधिकार दिले होते, ही गोष्ट कुणालाही नाकारता येणार नाही. अशा स्थितीत त्याच्याशी हुज्जत घालणारे लोक, त्याचा खून करणारे लोक आपण निर्दोष समजता काय? ही माणसं माझ्या मताने लोकसभेचा उपमर्द करणारी बदमाश आहेत! त्रिवार अपराधी आहेत!'' अँटनीचा आवेश पाहून सभा चरकली.

एव्हाना त्या मंदिराभोवती असंख्य नागरिकांनी गर्दी केली होती. लवकरात लवकर लोकशाही राजवट चालू करण्यासाठी, सीझरच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी, लोक घोषणा करीत राहिले होते. हळूहळू कोलाहल एवढा प्रचंड होऊ लागला, की अँटनीला लोकसभेचे काम स्थगित करणे भाग पडले.

त्या रात्री सीझरच्या मृत देहाला अग्निसंस्कार करण्याचा निर्णय करण्यात आला होता. दहनासाठी नियुक्त केलेल्या जागेवर असंख्य रोमन नागरिक गोळा झाले होते. अथांग जनसागरातून वाट काढण्यासाठी अनेकांची धडपड चालू होती. सीझरच्या मृत देहाला संपूर्ण सरकारी इतमामाने अग्नी देण्यात येणार होता. चिता तयार झाली होती. सीझरला अखेरची श्रद्धांजली अर्पण करण्याच्या निमित्ताने भाषण करण्याची ही संधी मार्क अँटनी गमावणे शक्यच नव्हते. सीझरच्या मृत देहावरील असंख्य वार तमाम जनतेच्या निदर्शनाला आणीत तो म्हणाला, ''हा प्राणघातक वार ब्रूटसने केला आहे! सीझरच्या पुत्राने हा वार केला आहे! कृतघ्नपणाचा हा कळस पाहूनच सीझरने प्राण सोडला आहे!''

जमाव हळहळला, दु:खाश्रू गाळू लागला, सुस्कारे सोडू लागला आणि मग कटवाल्यांचा नि:पात करण्याची घोषणा करू लागला.

जनतेला आपल्या ह्या मृत वीराचा सन्मान करायचा होता; पण तो कोणी करावा? कसा करावा? हे कळेनासे झाले होते. पण एवढ्यात मशालधारी दोन सैनिक पुढे आले व त्यांनी चिता पेटविली. लाल, जांभळ्या रंगाच्या ज्वाळा भडकून उठल्या. त्यांनी सीझरचा पार्थिव देह ग्रासण्यास झपाट्याने आरंभ केला. आपल्या वीराग्रणीचा देह भस्मीभूत होताना पाहून लोकांच्या भावना हेलावल्या. अनेकांनी आपला आदरभाव व्यक्त करण्यासाठी अंगावरील उंची वस्त्रालंकार चितेत फेकण्यास आरंभ केला. सीझरबद्दलची ही उफाळलेली आदरभावना पाहून कटवाले हबकून गेले. क्रमश: सर्व काही स्थिरस्थावर होऊन जाईल व मग आपणास डोके वर काढण्यास संधी मिळेल, अशीही एक आशा त्यांना वाटत होती.

हळूहळू, यापुढे काय ह्याची चर्चा होऊ लागली. सीझरनंतर आता सर्वाधिकारी कोण, असा प्रश्न पडला. हे पद पेलण्यास समर्थ अशी व्यक्ती लोकांच्या डोळ्यांपुढे येत नव्हती. फिरून लोकशाही राजवट येणार की नाही- एक ना दोन, अनेक प्रश्नांची चर्चा चालू होती. एकूण राजकीय गोंधळाची अवस्था होती. सीझरच्या तोडीचा माणूस उभ्या राष्ट्रात आढळत नव्हता. मार्क अँटनी सीझरचा निकटवर्ती असला, तरी सीझरची जागा भरून काढणारा माणूस ह्या दृष्टीने त्याच्याकडे पाहाण्यास कोणाचीच तयारी नव्हती. आणि मग एके रात्री लोकांनी अत्यंत तेज:पुंज असा धूमकेतू आकाशातून संचार करताना पाहिला. त्याचे तेज सूर्यप्रकाशालाही मागे सारणारे होते. रोमन जनतेला वाटले, ह्या धूमकेतूने सीझरचे स्वर्गारोहणच सूचित केले.

रोमन जनतेची कुचंबणा लवकर संपण्याचे चिन्ह दिसेना. यादवी युद्ध झाल्याशिवाय ह्या राजकीय कोंडीतून मार्ग निघणार नाही, असेच प्रत्येकाला वाटू लागले. तसे काही झाल्यास क्लिओपॅट्रावर अनवस्था प्रसंग येणार, हे जाणून अँटनीने तिला इजिप्तला परतण्याचा सल्ला दिला.

प्रथमत: ती रोम सोडण्यास तितकीशी खूश नव्हती. सीझरच्या मुलाला न्याय मिळाल्याशिवाय रोममधून हलू नये, असे तिला वाटत होते. आपण एकदा येथून गेलो, की आपली सर्व सुखस्वप्ने भंग पावली, हे ती जाणून होती. पण अँटनीने तिच्या मुलाला न्याय मिळवून देण्याचे अभिवचन दिल्यानंतर मात्र तिने इजिप्तला परत फिरण्याचा निर्णय केला.

सीझरने एकदा लोकसभेत सीझेरान आपला मुलगा असल्याची प्रकट कबुली दिली होती. त्याच आधारावर अँटनीने लोकसभेत सीझेरानचा वारसा मान्य करण्याबद्दल

आग्रह धरला. पण एक सभासद उठून थंडपणाने म्हणाला, ''आईच्या सांगण्यावरून मुलाची एवढी वकिली करण्यापेक्षा सीझरची इच्छा दर्शविणारा त्याचा एखादा लेखच पुढे काढलात, तर मला वाटतं, हा प्रश्न सहज सुटेल! तुमचे अकारण परिश्रमही बरेच वाचतील!'' अँटनी ह्या बोलण्याने थंड पडला. जी गोष्ट सीझर मृत्यूपत्राने करू शकला नाही, ती अँटनी कशी करणार? रोमन लोकसभेने सीझेरानचा वारसा साफसाफ धुडकावून लावला.

हा निर्णय लागण्यापूर्वीच क्लिओपॅट्राने रोम सोडले होते. तिचे राजेशाही गलबत भूमध्यसमुद्राचे पाणी कापीत इजिप्तच्या दिशेने चालू लागले होते. सीझरने उपेक्षा केल्यानंतर रोमन जनता, लोकसभा काय करणार? ह्याची तिने केव्हाच कल्पना केली होती. रोम सोडण्याची संधी ती पाहात होती.

हळूहळू इटलीचा हिरवागार किनारा दृष्टीआड झाला. थोड्याच दिवसात पिंगट रंगाचा इजिप्तचा वालुकामय किनारा दिसू लागला. हा किनारा ओसाड होता, तप्त वालुकामय होता, पण त्याच्या दर्शनाने ती आनंदित झाली. तिच्या मातृभूमीचा किनारा होता तो! त्याच्या दर्शनाने रोममधील बऱ्यावाईट दिवसांचा, घटनांचा तिला विसर पडला.

अलेक्झांड्रिया बंदरात पाय ठेवताच तिचे जे थंडे स्वागत झाले, त्यामुळे तिचा चांगलाच विरस झाला. तिच्या माघारी कारभार पाहाणारा तिचा मंत्री दोन दिवसांनी तिच्या भेटीला आला व कुत्सितपणाने म्हणाला, ''राणीसरकार, दोन वर्षे आपण रोममध्ये केलेल्या वास्तव्यामुळे व तिथे ठेवलेल्या संबंधांमुळे इजिप्तचं राजकीय वजन चांगलंच वाढलं आहे. आपण रोमशी केलेला एखादा करार बरोबर आणला असणारच! रोमचा स्नेहसंबंध ही काही सामान्य बाब नाही!''

दुसरे एक मंत्रीमहाशय गुळमुळ करीत म्हणाले, ''सीझेरानबद्दल रोमन लोकसभेनं आपणास काही आश्वासन दिलं? इकडे तर वार्ता आहे, की लोकसभा सीझरच्या पुत्राला मानण्यास मुळीच तयार नाही!''

मंत्र्यांच्या ह्या फालतू बोलण्याने खरे म्हणजे इजिप्तची ही तरुण राणी खवळून उठायची, पण तिने संयम राखला. आपले मन आवरले व म्हटले, ''परराष्ट्राशी संबंध जोडताना कोणतं राजकारण लढवावं लागतं, कोणत्या धोक्यांना तोंड द्यावं लागतं, ह्याची कल्पना परराष्ट्र वकील म्हणून काम करणाऱ्यांनाच येणार! घरबशा बुद्रुकांना ती येणं कठीणच आहे!'' राणीचे हे तुसडे उद्गार ऐकून तिचे मंत्रीमंडळ चांगलेच हादरले. तत्काळ त्यांनी आपली दिशा बदलली. ''बरं झालं, राणी सरकारनी लवकरच परत येऊन राज्यकारभाराची सूत्रं आपल्या हाती घेतली. आमची जबाबदारी कमी झाली. इजिप्तचं पोरकेपणही संपलं!''

क्लिओपॅट्राच्या आगमनामुळे इजिप्त स्थिरावला. पण इकडे रोममध्ये यादवी युद्धाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली. तेथील इजिप्शियन व्यापाऱ्यांकडून राणीला रोममधील अस्थिर वातावरणाबद्दल वेळोवेळी बातम्या कळत होत्या. अँटनीची पत्नी मोठी धूर्त स्त्री होती. तिने हाती लागलेल्या सीझरच्या मुद्रेचा उपयोग करून अनेक खोटेनाटे कागदपत्र तयार केले. त्यांच्या जोरावर ती अनेक नेमणुका करून घेत होती. खुद्द अँटनीच्या हाती सर्वाधिकार यावा, ह्या दृष्टीने तिच्या सर्व हालचाली चालू होत्या. अँटनीला सर्वाधिकार मिळाल्यास कदाचित् सीझेरानचे दैवही उदयास येईल, ह्या भावनेने क्लिओपॅट्राही तिच्या सर्व कारस्थानांना पाठिंबा देऊन होती.

सीझरच्या मृत्यूपत्राने ऑक्टिव्हियन खरा वारस ठरला असल्याने त्याच्याही हालचालींना जोर आला होता. अँटनी व ऑक्टिव्हियन ह्यांच्यातील स्पर्धा दिवसेंदिवस विकोपाला जाण्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली. अँटनीने आपल्या हाती सर्व सत्ता घेण्याचा प्रयत्न सातत्याने चालू ठेवला होता; पण लोकसभेने ऑक्टिव्हियनलाच पाठिंबा दिल्याने त्याचे पारडे जड होणे स्वाभाविक होते. अँटनी हा आपला एक प्रबळ प्रतिस्पर्धी आहे, ह्याची जाणीव ऑक्टिव्हियनला असल्याने त्याने त्याचा विरोध बोथट करण्यासाठी निराळीच शक्कल काढली.

रोमन साम्राज्याचा कारभार 'त्रिमूर्तीमार्फत' चालावा व ह्या योजनेला लोकसभेने मान्यता द्यावी, असा आग्रह त्याने धरला. अँटनी, ऑक्टिव्हियन व लॅपिडस ह्या तिघांनी मिळून रोमन साम्राज्याचा कारभार चालविण्याची योजना मंजूर करण्यात आली. पाच वर्षेपर्यंत 'त्रिमूर्ती' कारभार

चालविण्यास लोकसभेने मंजुरी दिली असल्याने यादवी युद्धाचे वारे थंडावले. इटलीच्या सरहद्दीबाहेर असलेल्या रोमन साम्राज्यावर अँटनी व लॅपिडस ह्यांची हुकुमत चालावी असे ठरले, तर खुद्द इटलीत ऑक्टिव्हियनला सत्ता देण्यात आली. आफ्रिका व आशियातील मुलखांचा कारभार अँटनीने आपल्याकडे घेतला.

त्रिमूर्तींच्या हाती अमर्याद सत्ता येताच तिच्या दुरुपयोगाला सुरुवात झाली. प्रत्येकाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा, विरोधकांचा, काटा काढण्यास सुरुवात केली. ह्या तडाख्यातून सिसरोही सुटू शकला नाही. ह्या कत्तलीची झळ कोणाला लागेल आणि कोणाला लागणार नाही, ह्याचा काहीच नेम राहिला नाही. सिसरोचा वध अगदीच अचानकपणे करण्यात आला. ब्रुटस आणि कॅशियस् मॅसिडोनियात पळून गेले, म्हणूनच वाचले. पण तेथे गेल्यानंतर मात्र ते मुळीच स्तब्ध बसले नाहीत. त्यांनी सैन्य जमा करून रोमशी सामना देण्याची तयारी चालू केली.

रोमचा सत्ताधारी ऑक्टिव्हियन ह्याने हे आव्हान तत्काळ मोडून काढण्याची तयारी केली. अँटनी व लॅपिडस ह्या उभयतानीही ह्या गोष्टीस संमती व सहकार्य देऊ केले. रोमचा कारभार पाहाण्याची जबाबदारी लॅपिडसवर सोपवून ऑक्टिव्हियन व अँटनी ह्यांनी मॅसिडोनियावर स्वारी केली. ब्रुटस व कॅशियस् ह्यांचा संपूर्ण नाश करण्याची जाहीर प्रतिज्ञा करूनच ते बाहेर पडले.

ब्रुटस व कॅशियस् ह्यांच्याकडे पैसा व आरमार ह्यांची तीव्र उणीव होती. कॅशियस्ने असा विचार केला, की आपल्या अपुऱ्या सामर्थ्यानिशी इजिप्तवर चाल केली, तरी चालण्याजोगे आहे. तेवढ्या भीतीनेच इजिप्तकडून आपल्याला आरमार व पैसा काढता येईल. पण क्लिओपॅट्रा सावध होती. रोममधील अस्थिरता विचारात घेऊन तिने आधीच आपले आरमार व सैन्य सज्ज करून ठेविले होते. शेवटी कॅशियस्ने स्वारीचा बेत रद्द करून मदतीची याचना केली. इजिप्तची राणी ही गोष्ट कदापि मान्य करण्याची शक्यता नव्हती. सीझरच्या खुन्यांना त्याच्याच पत्नीकडून मदत मिळण्याची शक्यता कशी असणार?

अँटनी व ऑक्टिव्हियन आपल्या फौजा घेऊन मॅसिडोनियात येऊन दाखल झाले. अँटनीने कॅशियस्च्या समोर आपला तळ ठोकला, तर ऑक्टिव्हियनने ब्रुटसला तोंड देण्याची जबाबदारी पत्करली. आरंभीच्या काही चकमकीत अँटनीला थोडे फार यश मिळाले, पण मोहीम पुरी करण्यास त्याला एक संपूर्ण वर्ष लागले. फिलिपीच्या अंतिम संग्रामात कॅशियस् मारला गेला, तर ब्रुटसने भावी उपमर्दाला भिऊन आत्महत्या केली. ह्या संग्रामाच्या आधी थोडेच दिवस ऑक्टिव्हियन आजारी पडल्याने संग्रामाची सारी जबाबदारी एकट्या अँटनीवरच पडली व त्याने ती मोठ्या धैर्याने व शौर्याने पार पाडली. आजारी ऑक्टिव्हियनला रोमकडे परत पाठवून देण्यात आले होते. त्याचा ह्या आजारातच अंत होईल अशी बऱ्याच लोकांची विशेषत: त्रिमूर्तीमधील उरलेल्या दोघांची, ठाम कल्पना होती; पण ती चुकीची ठरली.

सध्या अँटनीचे ग्रहमान जरा बरे होते. तो सुंदर होता. सामर्थ्यसंपन्न होता. फिलीपीच्या संग्रामात विजयी झाला होता. त्यामुळे त्याच्या लोकप्रियतेला विलक्षण भरती आली होती. पण अँटनी तसा जाणकार होता. लोकप्रियतेची भरती सातत्याने टिकवून धरणे अवघड आहे, हे त्याला माहीत होते. सतत संग्राम व विजय हे लोकप्रियता संपादण्याचे प्रमुख साधन आहे, हे तो जाणून होता. पूर्व देशावर चढाई करावी, अमाप कीर्ती व संपत्ती संपादन करावी व एक दिवस लोकप्रियता व सामर्थ्य ह्यांच्या बळावर रोमवर एकट्यानेच प्रभुत्त्व प्रस्थापित करावे, असा विचार त्याच्या मस्तकात घोळू लागला होता. आणि ह्या दृष्टीने पावले कोणती व कशी टाकावीत ह्याच विचारात तो सारखा दिसे.

●●●

## ९. अँटनी आणि क्लिओपॅट्रा

ऑक्टिव्हियन तसा दुबळाच असल्याने मॅसिडोनियाच्या स्वारीतून परतल्यापासून आजारीच होता. त्याचा अंतकाळ आता फारसा लांबणार नाही, अशी अँटनीची व इतरांचीही समजूत होती. आपण मोहिमेसाठी बाहेर पडल्यास रोमच्या राज्यकारभाराची संपूर्ण सूत्रे त्याच्या हाती सुपूर्द करण्यास मुळीच हरकत नाही, त्याला आपला मोठेपणाच दिसेल व हा दुबळा माणूस आपणास काही उपद्रवकारकही ठरणार नाही, असा दुहेरी हिशेब त्याने केला होता, पण तो चुकीचा होता. अँटनीचा हा डाव त्याच्याच अंगाशी आला. ऑक्टिव्हियन मेला तर नाहीच, पण उलट कार्यक्षम बनून अधिकच उद्योगास लागला. अँटनीला मोहिमेवर जाण्याचा मोह व्हावा, ह्या उद्देशानेच त्याने आजारीपणाचे सोंग घेतले असावे, असे मानण्याची पाळी आली. बाहेर गेलेल्या अँटनीविरुद्ध रोज एक नवी अफवा उठविण्याचा सपाटा त्याने चालू केला.

आपण पूर्व देशांच्या मोहिमेवर चाललो असता आपल्या पश्चात् असे काही घडेल, ह्याची अँटनीला मुळीच कल्पना आली नव्हती. पुढेपुढे जात एव्हाना त्याने ग्रीस गाठला होता. ग्रीसमध्ये त्याने चांगलीच लोकप्रियता संपादन केली होती. ग्रीक स्त्री-पुरुषांत तो अगदी मोकळेपणाने, स्वच्छंदाने वावरत होता. त्याच्या पोरसवदा रंगेल व रंगेलपणावर ग्रीक लोक बेहद खूश होते. थिसलीच्या किनाऱ्यावरील तारसुस् बंदरातून त्याने इजिप्तच्या राणीला-क्लिओपॅट्राला, भेटीस येण्याबद्दल आमंत्रण दिले.

क्लिओपॅट्राला आता इजिप्तमध्ये येऊन दोन वर्षे होऊन गेली होती. ह्यावेळी इजिप्शियन जनता अलेक्झांड्रियात सर्पिस देवतेचा उत्सव साजरा करण्यात रंगलेली होती. त्या काळी ह्या उत्सवाची कीर्ती दूरदूरच्या देशात पसरली असल्याने, अनेक देशांची माणसे ह्या उत्सवासाठी म्हणून अलेक्झांड्रियात गोळा झाली होती.

राणी ज्या रस्त्याने सर्पिस देवतेच्या मंदिराकडे जाई, तो रस्ता मोठा शृंगारलेला असे. दुतर्फा बंदोबस्तासाठी म्हणून सैनिक खडे असत. राणी एखाद्या देवतेप्रमाणे सजून व रथावर आरूढ होऊन मिरवणुकीने मंदिराकडे जाई. राणी मंदिरापाशी येताच धर्मगुरू ती देवता असल्याचे घोषित करून तिचे स्वागत करीत. धर्मगुरूची ही घोषणा लाखो लोक मंत्रमुग्ध होऊन ऐकत. आपली राणी खरोखरच एक देवता आहे, असे त्यांना मनापासून वाटे.

क्लिओपॅट्राचे इजिप्तवरील स्वामित्व आता संपूर्णपणे प्रस्थापित झाले होते. तिच्या पुत्राला-सिझेरानला, सारी प्रजा आता भावी राजा म्हणून मानीत होती. पण राणी एवढ्यावर संतुष्ट नव्हती. रोम व इजिप्तचे संयुक्त आधिपत्य आपल्या ह्या मुलाला मिळाले पाहिजे, हा तिचा विचार अद्यापि तिच्या अंत:करणात खोलवर घर करून राहिला होता.

सीझरच्या मृत्यूनंतर वस्तुत: तिच्या ह्या विचाराला काहीच आधार राहिला नव्हता. पण हा विचार तिला सोडवत नव्हता, हेही तितकेच खरे! सीझरनंतर आपण एकाकी पडलो आहोत, आपणास रोममध्ये कोणताच आधार राहिलेला नाही, ही जाणीव तिला बोचे. पण इलाज नव्हता. घडलेल्या घटना स्वप्नवत् ठरल्या होत्या, पण त्यांची विस्मृती होत नव्हती. सीझर तिच्या मानाने वयस्कर होता, अपस्माराच्या व्यथेने ग्रासला होता, तरी पण आपल्या हयातीत त्याने तिला दिलेली सोबत आज तिला विलोभनीय वाटत होती. ती काहीशा अस्वस्थ मनस्थितीत असतानाच मार्क अँटनीचा वकील तिच्या दरबारी येऊन दाखल झाला.

हा वकील मोठा चाणाक्ष माणूस होता, धूर्त होता. अँटनीची पत्नी फुल्विया हिने त्याला अँटनीच्या दिमतीस मुद्दाम दिले होते. अँटनीच्या हालचाली आपणास कळाव्यात, म्हणून तिने ह्या माणसाची योजना केली होती. सीझर काय अगर आपला पती अँटनी काय, हे एकाच माळेचे मणी आहेत, स्त्रिया हा त्यांचा आवडता छंद आहे, हे ओळखूनच ह्या माणसाची योजना तिने केली होती व तोही अँटनीच्या सर्व हालचाली बिनचूक तिला कळवीत असे.

''राणीसरकार, माझे धनी मार्क अँटनी आपली भेट घेण्यास उत्सुक आहेत. आपल्या भेटीने त्यांना मोठाच

आनंद होणार आहे.'' अँटनीचा वकील मोठ्या नम्रतेने म्हणत होता.

''का बरं? त्यांच्या ह्या नव्या मोहिमेत त्यांना खूपच नव्यानव्या रूपसुंदरी भेटल्या असतील ना?'' क्लिओपॅट्रा कडवटपणाने म्हणाली.

''भेटल्या! भेटल्या!! पण त्यात राणीसरकारांची बरोबरी करणारी एकही स्त्री नव्हती!'' वकील बोलून तर गेला, पण मग जरा चपापल्यागत झाला.

क्लिओपॅट्रा मानापमान मानणारी नव्हती. तिचे सारे लक्ष उद्दिष्टावर केंद्रित झाले होते. अँटनीला हाताशी धरून आपले उद्दिष्ट साध्य होऊ शकेल असा विचार करून ती म्हणाली, ''ठीक आहे, ठीक आहे! इजिप्तची राणी तुमच्या धन्याच्या भेटीस येत आहे!''

मार्क अँटनी शहराच्या भर चौकात बसला होता. प्रात:काळची सुंदर वेळ होती. त्या चौकातून जवळच असलेल्या बंदराचा देखावा स्पष्ट दिसत होता. भर चौकात बसून अँटनीने न्याय-निवाडा देण्याचे काम चालू केले होते. ह्या घटकेला तो एका बाईची नवऱ्याविरुद्ध फिर्याद ऐकत होता.

एकाएकी त्याच्या ह्या कामात व्यत्यय आला. बंदराच्या बाजूने झालेला मोठा गलका ऐकू येऊ लागला. ''गॅलियस्, काय गडबड आहे पाहा बरं!'' अँटनीने आपल्या सेवकाला आज्ञा केली.

थोड्याच वेळाने परत आलेला गॅलियस् म्हणाला, ''ह्या लोकांना खूळ लागलं आहे, धनीसाहेब! ॲफ्रोडाईट प्रेमदेवता अवतरली आहे, असा गलका त्यांनी चालविला आहे!''

''ॲफ्रोडाईट अवतरलीय? आणि ती इथे? मग खरा प्रकार काय आहे?''

'' ह्याचा अर्थ, सारा मूर्खांचा बाजार आहे!''

''काय भानगड आहे, आपण स्वत:च जाऊन पाहूया!'' असे म्हणून मार्क अँटनी उठला व बंदराच्या दिशेने चालू लागला. आपणापुढे एक कज्जा चालू होता, ह्याचे भानही त्याला राहिले नाही.

बंदरात येताच तेथे नांगरल्या गेलेल्या गलबतांचा एकूण रागरंग पाहून अँटनीला कळून चुकले, की इजिप्तची राणी क्लिओपॅट्रा येऊन दाखल झाली आहे. तो त्याच पावली परत फिरला व छावणीतील आपल्या भव्य तंबूत येताच त्याने घाईघाईने एक पत्र लिहून इजिप्तच्या राणीला देण्यासाठी आपल्या दूताकरवी रवाना केले. दूत राणीच्या हंसाकृती गलबतावर येऊन दाखल झाला. राणी सिंहासनासारख्या एका आसनावर विराजमान झाली होती. अनेक दासी पंख्याने तिला वारा घालीत होत्या. वाद्यवृंदाचे कर्णमधुर स्वर वातावरणात भरून राहिले होते. कसलातरी सुगंध सर्वत्र दरवळला होता.

राणीने आपल्याबरोबर आणलेली असंख्य लहान मोठी गलबते सागरावर सर्वत्र इतस्तत: पसरली होती. राणीचे एकूण वैभव पाहून अँटनीचा दूत एकदम दिपून अगदी सुन्न होऊन गेला. त्याने कसाबसा आपल्या मनाचा तोल सावरून खलिता राणीच्या हाती दिला. राणीने तो वाचला व त्याच दूताकरवी अँटनीला निरोप दिला, की अँटनीने प्रथम गलबतावर येऊन आपला पाहुणचार घ्यावा.

वस्तुत: क्लिओपॅट्रा रोमच्या संरक्षणाखाली होती. अशा स्थितीत तिने अँटनीच्या आमंत्रणाचा आदरपूर्वक स्वीकार करणे आवश्यक होते. पण उलट तिनेच त्याला भेटीस येण्याचे आमंत्रण देऊन एक प्रकारे राजकीय शिष्टाचाराचा भंगच केला होता. अँटनीला ह्या निरोपाने चांगलेच आश्चर्य वाटले. त्याचा स्वाभिमानही थोडाफार दुखावल्यागत झाला. त्याला रागही आला. पण अखेर त्याने आपण येत असल्याचा निरोप क्लिओपॅट्राकडे धाडला. गलबतावर इजिप्तचे सारे वैभव अँटनी व त्याचे सहकारी ह्यांच्या स्वागतासाठी सज्ज होते. एकंदर थाटमाट पाहून सर्वजण अगदी थक्क होऊन गेले.

क्लिओपॅट्राचे सौंदर्य व तिचा थाट पाहून अँटनी चांगलाच पाघळला, भावनाविवश होऊन गेला. पण क्लिओपॅट्राने आपले मार्दव व गांभीर्य यत्किंचितही ढळू दिले नाही. आपले सर्व संभाषणचातुर्य पणाला लावून, अँटनीने आपल्या मुलाची बाजू घ्यावी, रोमवरील ऑक्टिव्हियनची सत्ता मोडून काढून तेथे सीझेरानची प्रस्थापना करावी, असा तिने आग्रह धरला.

तिच्या हेरांकरवी तिला मिळणाऱ्या बातम्यांवरून तिची अशी खात्री झाली होती, की फिलिपीच्या संग्रामानंतर

रोमन सैनिकांत ऑक्टिव्हियनपेक्षा ॲंटनीबद्दल अधिक आदर होता. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तिला ॲंटनी हवा होता. त्याला वश करण्यासाठी ती कोणताही त्याग करायला सिद्ध होती. ॲंटनी आपल्या सौंदर्याने भाळला आहे, हे तिने केव्हाच जाणले होते. पण ॲंटनीला संपूर्णपणे आपल्या अंकित करून घेऊन त्याला आपल्या तालावर नाचविण्यासाठी तिने आपले गांभीर्य तिळमात्र ढळू दिले नव्हते. त्याची धडपड, त्याचा लघळपणा ह्यांची आपणास काहीच दखल नाही, असे तिने भासविण्याचे ठरविले होते.

ॲंटनीचा मासा गळाला लागण्यास फारसा वेळ लागला नाही. सीझरच्या मृत्यूनंतर तिची बहीण अर्सिनो परागंदा झाली होती. तिने इजिप्तचे राज्ञीपद संपादन करण्यासाठी क्लिओपॅट्राविरुद्ध सतत कारस्थाने चालू ठेविली होती. क्लिओपॅट्राने आपल्या ह्या बहिणीचे पारिपत्य करण्याची कामगिरी ॲंटनीवर सोपविली. ॲंटनीने हे काम मोठ्या तत्परतेने पार पाडले व अर्सिनोचा वध केला. क्लिओपॅट्राने जाणले, ॲंटनी आपला गुलाम बनला आहे.

तिने त्याला इजिप्तच्या भेटीचे आमंत्रण दिले व एके दिवशी तिचे आरमार इजिप्तच्या दिशेने परत फिरले. ॲंटनीला मोह पाडून इजिप्तची राणी निघून गेली. ॲंटनी आपल्या पाठोपाठ इजिप्तमध्ये येणार, ह्याबद्दल तिला खात्री होती आणि झालेही तसेच. ॲंटनी एक दिवस इजिप्तमध्ये येऊन दाखल झाला.

ॲंटनीच्या ह्या भेटीबद्दल अलेक्झांड्रियन नागरिक द्विधाचित्त होते. त्यांना स्मरण होते, की ज्युलियस् सीझर नावाचा रोमन सेनानी इजिप्त जिंकण्यासाठी आला, पण आपल्या राणीच्या मोहपाशांत अडकून बसला. तिलाच घेऊन गेला. आपण मरून गेला आणि आपला मुलगा इजिप्तचा भावी राजा म्हणून त्याने मागे ठेवला. आता हा दुसरा सेनानी आला आहे. इतिहासाची पुनरावृत्ती तर होणार नाही ना?

राणीने जाहीर केले, की ॲंटनी केवळ परतभेट म्हणून येत आहे. आपला व आपल्या पतीचा स्नेही म्हणून येत आहे. त्याची भेट केवळ खाजगी स्वरूपाची असून तिला राजकीय महत्त्व नाही.

अलेक्झांड्रियन नागरिकांनी मग त्याच्या स्वागताचा निर्णय केला. रस्तोरस्ती कमानी उभारल्या गेल्या. गालिचे अंथरले गेले. रोमन सत्तेचा एक प्रतिनिधी म्हणून त्याचा मोठा सन्मान करण्यात आला. ॲंटनीची बुद्धी राजकीय प्रश्नांत फारशी खोल शिरणारी असणार नाही, अशी राणीची कल्पना होती. तो केवळ आपल्या मोहाने येथपर्यंत आला आहे, हीच तिची भावना! पण तिची ही कल्पना थोडीफार चुकीचीच ठरली. ॲंटनी आला होता, तो राजकीय उद्दिष्टानेच! रोमवरील 'त्रिमूर्तीसत्ता' नष्ट करून तेथे आपले एकट्याचे सर्वाधिकारित्त्व प्रस्थापित करण्यासाठी इजिप्तची राणी आपणाशी काय सहकार्य करू शकते, ह्याचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने तो आला होता. पार्थियन लोकांवर आपण विजय मिळविल्यास पुढचा साराच कार्यभाग सोपा होईल व सीझरला जमले नाही ते आपण करून दाखवू शकू, ह्या उमेदीत तो होता. क्लिओपॅट्राने आपले पत्नीपद पत्करल्यास सीझेरानबद्दलच्या तिच्या अपेक्षा आपोआपच सफल होणार होत्या आणि निदान त्यासाठी तरी ती आपणास नकार देणार नाही, ह्याची त्याला खात्री होती. क्लिओपॅट्रा व रोम दोन्हीही जिंकण्यासाठी ॲंटनी इजिप्तमध्ये आला होता.

क्लिओपॅट्रा, सिझेरानला त्याचे संरक्षण लाभावे एवढ्या मर्यादित हेतूनेच त्याच्याकडे पाहात होती. त्याहून त्याने पुढे जाऊन ऑक्टिव्हियनचा बळी घेतला व सीझेरानचा न्याय्य वारसा प्रस्थापित केला, तर तिला हवे होतेच. एके दिवशी ती आपल्या विश्वासू सहचरीला म्हणत होती, ''खरं म्हणजे आशिया व आफ्रिका ह्यातील राष्ट्रांनी एकजूट करून ह्या रोमन लोकांना पार उखडून काढलं पाहिजे! त्यांना कुठे तरी नेऊन गाडलं पाहिजे!''

हे म्हणणे सोपे आहे, पण घडणे तितकेच अवघड आहे, हे तिला माहीत होते. आज आपल्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी आपण ॲंटनीवर विसंबण्यापलीकडे काही करू शकत नाही, ह्याची तिला पूर्ण जाणीव होती. ॲंटनी व क्लिओपॅट्रा उभयताही आपापल्या महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी एकमेकांना जवळ करू पाहात होती, एवढे खरे. एकमेकांच्या सहवासात ती रमू लागली आणि शेवटी परिणाम असा झाला, की सीझरप्रमाणेच ॲंटनीचा वारसही आपण जन्माला घालणार, ह्याची कल्पना एके दिवशी

क्लिओपॅट्राला आली.

सीझरप्रमाणेच अँटनीची पत्नीही रोममध्ये होती. सीझरची पत्नी राजकीय दृष्टच्या उदासीन असे, पण अँटनीची पत्नी मात्र तशी नव्हती. आपला पती एखाद्या परकीय स्त्रीच्या जाळ्यात सापडल्यास तिचा व त्याचाही सूड कसा घ्यावा, हे फुल्वियाला-अँटनीच्या पत्नीला, माहीत होते. तो घेण्याची तिची मानसिक तयारीही होती. अँटनी सरळ मार्गाने, सुसूत्रपणाने रोमला परत फिरला नाही, तर ऑक्टिव्हियनला हाताशी धरून अँटनीचा नि:पात करण्याची तिची तयारी होती. हाती असलेली सीझरची मुद्रा हे तिचे खरे भांडवल होते. खोटी फर्माने व कागदपत्रे रंगविणे तिच्या हातचा मळ होता. आपली पत्नी रोमच्या राजकारणात उलथापालथ करण्यास समर्थ आहे, ह्याची कल्पना अँटनीला नव्हती, असे मुळीच नव्हते. ती एके दिवशी आपला तरी बळी देईल, अगर ऑक्टिव्हियनच्या क्रोधाला स्वत: तरी बळी पडेल, अशी धास्ती त्याला नेहमीच वाटे.

ऑक्टिव्हियनही ह्याबाबत चांगला जागरूक होता. सीझरच्या मृत्यूपत्राने आपणास त्याचा वारसा आला असल्याने त्याविरुद्ध कोणी ब्र काढल्यास त्याचा तो तत्काळ निकाल लावी. सीझरच्या श्राद्धदिनी त्याने चारशे सीझरनिंदकांची कत्तल करून दहशत निर्माण केली. सीझरच्या नावाखाली आपल्याला विरोधी अशी कोणी काही हालचाल केल्यास फुल्वियाला - अँटनीच्या पत्नीला, जबाबदार धरण्यात येईल, अशी जाहीर घोषणा करण्यास त्याने कमी केले नाही. ह्यामुळे फुल्वियाला कारस्थान करणे तर शक्यच राहिले नाही, उलट जिवाच्या भयाने पळ काढून परागंदा मात्र व्हावे लागले.

राजकीय गुंतागुंत सतत वाढत होती. रोममध्ये पुन्हा यादवी युद्धाचे वारे वाहू लागले होते. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन पार्थियन लोकांनी रोमच्या ताब्यात असलेल्या सरहद्दीवरील मुलुखावर धाडी घालण्यास सुरुवात केली होती.

अँटनी व ऑक्टिव्हियन ह्या दोघांनाही पाण्यात पाहाणारा, सेक्सस् पॉंपी फुल्वियाला आश्रय देऊन आपले घोडे पुढे दामटण्याच्या विचारात होता. रोममध्ये पॉंपीचे-त्याच्या पित्याचे, कित्येक चाहते अद्यापि अस्तित्वात होते, त्यांचा त्याला पाठिंबा होता.

ह्या साऱ्या घालमेलीमुळे आपणावर काही तरी संकटमालिका येणार, ह्याची अँटनीला जाणीव होऊ लागली. पूर्वेकडील आपले सैन्य, पार्थिया व सिरिया ह्यांनी संयुक्तपणे हल्ला केला, तरीसुद्धा त्याला यशस्वीपणाने तोंड देऊ शकेल, असा आत्मविश्वास त्याला वाटत होता; पण मध्यंतरीच्या काळात त्यांच्या निष्ठेत तर काही चलबिचल झाली नाही ना, अशी शंका त्याला भेडसावू लागली. इजिप्तमधील आपली विलास-विश्रांती आता संपुष्टात आणलीच पाहिजे, ह्याची तीव्र जाणीव त्याला बेचैन करू लागली.

एके दिवशी अँटनीने आपल्या प्रयाणाचा निर्णय प्रकट केला. त्याची अशी कल्पना होती, की आपल्या निर्णयामुळे क्लिओपॅट्रा शोकाकुल होईल. तिची समजूत आपणास काढावी लागेल, पण तसे काहीच घडले नाही.

सीझर एके दिवशी असाच निघून गेला होता. आज अँटनी तसाच चालला होता. सीझर आपली स्मृती ठेवून गेला होता. अँटनीनेही तेच केले होते. सीझरने तिची महत्त्वाकांक्षा जागृत केली होती. अँटनी ती पुरी करील म्हणून ती वाट पाहात होती. त्या आशेवर वाटेल त्या त्यागाला ती सिद्ध होती.

अँटनी निघून जाताच तिने आपल्या दरबारी ज्योतिष्याला पाचारण केले व अँटनीच्या भवितव्याबद्दल त्याच्याकडे विचारणा केली. ज्योतिषाने काही आकडेमोड केली, आकृती काढल्या, आकाशाचे निरीक्षण केले व शेवटी तो म्हणाला, ''अँटनीचं भवितव्य उज्वल आहे. पण त्याला कुणीतरी प्रबळ विरोधक आहे. आणि अँटनीला मागे सारून तो पुढे जाणारच नाही, असं सांगता येणार नाही!''

तिचा निरोप घेताना अँटनी म्हणाला होता, ''कदाचित् तुझ्या आरमाची, सैन्याची मला गरज लागेल. ते सुसज्ज असूदे!'' अँटनी निघून गेल्यानंतर त्याची वार्ता नित्य कळावी म्हणून दूतांची एक मालिकाच क्लिओपॅट्राने तयार केली होती. प्रत्येक दिवशी अँटनीची सविस्तर व निश्चित वार्ता ह्या दूतांमार्फत तिला कळत असे. तिने अँटनीच्या दिमतीस एक ज्योतिषीही दिला होता. तत्कालीन भवितव्यतेबद्दल त्याने अँटनीला काही सांगावे, सुचवावे असा त्याला आदेश देण्यात आला होता.

एके दिवशी अँटनी पुनश्च ग्रीसमध्ये येऊन दाखल झाला.

●●●

## १०. पराभव

अँटनी अथेन्समध्ये येऊन दाखल झाला. तेथे येताच प्रथम त्याला आपल्या भडकलेल्या पत्नीला - फुल्वियाला तोंड द्यावे लागले. ती ग्रीसमध्ये अँटनीला भेटण्यासाठी मुद्दाम आली होती. ऑक्टिव्हियनने इटलीचा संपूर्ण कबजा घेतला असल्याने अँटनीला आता तेथे भवितव्य राहिले नव्हते. इजिप्तमध्ये मजा मारीत काळ काढून रोममध्ये आपला नाश ओढवून घेतल्याबद्दल फुल्वियाने त्याची चांगलीच खरडपट्टी काढली. अँटनीला तिने बजावले, ''ह्यापुढे जगण्यात स्वारस्य राहिले नाही!'' आणि खरोखरच ती पुढे थोड्याच दिवसात मरण पावली.

आपल्या पत्नीच्या नसत्या उलाढालीमुळे आपले व ऑक्टिव्हियनचे संबंध निष्कारण ताणले गेले, अशी अँटनीची कल्पना असल्याने त्याला पत्नीच्या मृत्यूमुळे मुळीच दु:ख झाले नाही. त्याने ब्रिंडिसी येथे जाऊन ऑक्टिव्हियनची भेट घेतली व त्याच्याशी तडजोड करून बिघडलेले संबंध सुधारून घेतले. पुन्हा तिघांनी मिळून रोमन साम्राज्याची फेर वाटणी करून घेतली. फिरून ऑक्टिव्हियनने इटली आपल्याकडेच घेतला. अँटनीने ग्रीस व आशिया मायनर आपणाकडे घेतले, तर आफ्रिकेचा उत्तर भाग लॅपिडसच्या वाटणीस आला. ऑक्टिव्हियनकडे पुन्हा रोमची सत्ता देण्यात अँटनीने जी चूक केली, तिचे दुष्परिणाम त्याला पुढे भोगावे लागले.

फिलिपीच्या संग्रामानंतर प्रथमच अँटनी व ऑक्टिव्हियन समोरा-समोर आले होते. अँटनीशी तुलना करता तो खरोखरच दुबळा व कुरूप होता. तो खुजा होता, त्याची कातडी डागळलेली होती. त्याचे केस सदाच पिंजारल्यागत असत. त्याच्या डोळ्यातील विलक्षण चमक सोडल्यास, कोणतेच चांगले लक्षण त्याच्यापाशी नव्हते.

पुन्हा एकत्र आल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्यासाठी एखादी चांगली मेजवानी घडवून आणवावी, अशी सर्वांचीच इच्छा होती. ह्या मेजवानीची आखणी एका गलबतावर करण्यात आली. गलबत सेक्स्टस् पाँपीचे होते. त्यानेच हा बेत आखला होता. सीझरच्या मृत्यूनंतर आता रोमवरील सत्ताधाऱ्यांशी आपले वैर राहिले नाही, असा नवा पवित्रा त्याने घेतला व त्यातील प्रामाणिकपणा सिद्ध करण्यासाठी ही मेजवानी होती.

अँटनी व ऑक्टिव्हियन मेजवानीवर भलतेच संतुष्ट झाले होते. ते खाद्यपदार्थांवर यथास्थित ताव मारण्यात गुंतले असता सेक्स्टस् पाँपीचा एक अनुयायी त्याच्या कानात कुजबुजला, ''ह्या उभयतांचा आपण आताच खून केल्यास रोमवरील तुझ्या सत्तेचा मार्ग आपोआप खुला होईल!''

तितक्याच हलक्या आवाजात पाँपी म्हणाला, ''हे काम तू परस्पर उरकलं असतंस तर बरं झालं असतं! ते आज माझे पाहुणे असल्याने आता ह्या गोष्टीस जाणूनबुजून संमती देणं बरं दिसणार नाही!''

ह्या घटनेनंतर ऑक्टिव्हियनने दुसरे एक पाऊल टाकले. आपली बहीण ऑक्टिविया अँटनीला देऊन त्याने त्याच्याशी नाते जोडले. अँटनीचा बेताल व बेजबाबदार जीवनक्रम माहीत असूनही तिने ह्या गोष्टीस संमती दिली. आपल्या भावाचा एक प्रतिस्पर्धी कमी व्हावा एवढीच ह्या विवाहाबद्दल तिची भावना होती. ह्या विवाहाची वार्ता ऐकून क्लिओपॅट्रा भयंकर क्रुद्ध झाली. तिने एक मुलगा व मुलगी अशा अँटनीच्या जुळ्या अपत्यांना जन्म दिला आणि ह्याच वेळी त्यांचा पिता तिकडे नव्याने विवाहबद्ध झाला.

सीझेरान आता मोठा झाला होता. राजपुत्र म्हणून शोभू लागला होता. इजिप्शियन जनता त्याला आपला भावी राजा म्हणून ओळखू लागली होती. त्याच्या आईने त्याच्या विकासाची संपूर्ण दक्षता घेतली होती. तो जरा हातावेगळा झाल्याने अँटनीच्या दोन मुलांची काळजी वाहाण्यास ती रिकामी झाली होती.

क्लिओपॅट्राला सोडून गेल्यानंतर जवळ जवळ वर्षभर अँटनी रोममध्येच वास्तव्य करून होता. ह्या कालावधीत एक गोष्ट त्याच्या प्रत्ययास येऊन चुकली, की रोममध्ये ऑक्टिव्हियनच्या वर्चस्वापुढे पदोपदी आपल्याला मान खाली घालावी लागणार! ह्यासाठी त्याने रोम सोडण्याचा निर्णय केला व तो पुन्हा अथेन्समध्ये येऊन दाखल झाला आणि ग्रीक नागरिकांच्या खुशालचेंडू जीवनात रंगून गेला.

आपण पूर्व-दिग्विजयासाठी येथे आलो आहोत, ह्याची

एके दिवशी त्याला आठवण झाली. त्या उसळीसरशी त्याने पार्थियावर चाल करून पार्थियाच्या राजपुत्राला सणसणीत पराभव चारला. अँटनीने आपले नाव व यश उज्वल केले.

अँटनीच्या भाग्याची चढती कमान चालू झाल्याप्रमाणे झाले. त्याची पत्नी ऑक्टिव्हिया मुद्दाम त्याला भेटण्यासाठी ग्रीसमध्ये येऊन दाखल झाली. आपल्या पतीने आपल्या भावाशी चांगले जिव्हाळ्याचे संबंध जोडावेत, असे तिने सुचविले. पण अँटनीने मोजक्याच शब्दात उत्तर दिले, ''हे जमणार नाही! तुझा भाऊ एक घातकी माणूस आहे!'' अँटनीने तिची परत रोमकडे रवानगी करून दिली.

तो पुन्हा पूर्व-दिग्विजयाचा विचार करू लागला. ही मोहीम हाती घ्यायची झाल्यास इजिप्तचा खजिना, सैन्य व आरमार ह्यांची आपणास गरज लागणार, ह्याची जाणीव त्याला झाली. एव्हाना क्लिओपॅट्राला सोडून जवळ जवळ चार वर्षे पूर्ण होत आली होती. त्याने आपला मुक्काम अँटिऑक् बंदरात नेऊन तेथून क्लिओपॅट्राला भेटीस येण्याबद्दल निरोप दिला.

क्लिओपॅट्राला वार्ता होती, की अँटनीने पत्नीला झिडकारून लावले असून तो नवी मोहीम हाती घेण्याच्या विचारात आहे. अँटनीचे आमंत्रण तिने स्वीकारले, पण जाताना ती काही तरी ठाम निश्चयाने निघाली होती.

अँटनी आणि क्लिओपॅट्रा ह्यांच्या दोन दिवस गाठीभेटी होत होत्या, पण त्यात अँटनीच्या विकारवशतेला तिने मुळीच दाद दिली नाही. तिसऱ्या दिवशी तिने अँटनीपुढे सरळसरळ तहाचा एक मसुदा टाकला. अँटनीने भावनाविवश होऊन त्यावर डोळे मिटून सही केली. त्याला क्लिओपॅट्रा हवी होती. तिला आता आपल्या राजकीय उद्दिष्टासाठी अँटनी हवा होता.

ह्या तहाच्या पहिल्या कलमाने तिने आपला खजिना, आरमार, सैन्य सर्व काही अँटनीला देऊ केले होते, पण पुढे मात्र एकूणएक गोष्ट तिने आपल्या फायद्याची करून घेतली होती. अँटनीने तिच्याशी इजिप्शियन पद्धतीने रीतसर विवाह करावा, पण इजिप्शियन राजपदावर मात्र हक्क सांगू नये; इजिप्तचा संरक्षक सेनापती म्हणून त्याने राहावे; सीझेरानला इजिप्तचा राजा म्हणून मान्यता द्यावी व त्याच्या रक्षणाची सर्व जबाबदारी पत्करावी; अरबस्तान वगैरे पूर्व देशांवर इजिप्तची मालकी मान्य करावी, अशा अनेक अटींना त्याला ह्या तहाने मान्यता द्यावी लागली व त्याने ती देऊनही टाकली.

ह्या तहनाम्यात तिचे खरे बुद्धिचातुर्य प्रकट झाले. तिने इजिप्तचे पूर्ववैभव तर प्रस्थापित केलेच, पण अँटनीच्या सामर्थ्याची जोड आपणासाठी मिळविण्यातही यश संपादन केले. त्याला आपल्या सुबत्तेची जोड देऊन त्याच्या यशाचा मार्गही खुला करून दिला. ऑक्टिव्हियन व लॅपिडस ह्यांना धूळ चारणे त्याला शक्य झाल्यास तिचे सीझरकालीन सुखस्वप्नही साकार होणार होते.

तहनामा होताच तिने आपला विवाहसमारंभ तेथेच थाटामाटात पार पाडला. येताना आवश्यक ती सर्व जुळणी करूनच ती आली होती. मेजवान्या झडल्या. सर्वत्र आनंद व उल्हास ओसंडून चालला होता. क्लिओपॅट्राबरोबर आलेले इजिप्शियन मुत्सद्दी मात्र उदास होते. ह्या घटनेतून काहीतरी विपरीत निर्माण होणार, अशी भीती त्यांना सारखी वाटत होती. पुढे एके दिवशी अँटनी आपल्या नव्या मोहिमेवर जाण्यास निघाला. त्याने युफ्रेटिस नदीपर्यंत मजल मारली. तेथपर्यंत क्लिओपॅट्रा त्याच्याबरोबर होती. तेथून ती इजिप्तकडे परत फिरली.

अँटनीची ही मोहीम प्रथमपासून गोत्यात येऊ लागली. मोहिमेची सुरुवातच अकाली झाल्याप्रमाणे झाली. पावसाचा जोर अद्यापि ओसरला नसल्याने त्याचे युद्धतंत्र यशस्वी होणे अवघड झाले. आपली प्रचंड व शस्त्रसज्ज सेना कोणालाही भारी आहे, अशी अँटनीची कल्पना होती. पण त्याची ही धुंदी लवकरच उतरली. आर्का शहराला तो वेढा घालून बसला असता अचानक मेडियाच्या राजाने हल्ला करून त्याच्या सैन्याचा व साधनसामग्रीचा धुव्वा उडविला.

पार्थियन लोकांनीही छुपे हल्ले चढविण्यास सुरुवात केली. हल्ला करून ते माघार घेतल्याचे नाटक करीत व रोमन सैन्याने पाठलाग चालू करताच उलटून पडून अचानक कडवा प्रतिहल्ला करीत आणि रोमन सैन्याची दाणादाण करून टाकीत. अँटनीला माघार घेऊन पश्चिमेत परतण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. कंटाळलेल्या रोमन सैन्यात बंडे उद्भवू लागली. ह्याचा फायदा पार्थियन लोकांना

मिळू लागला. रोमन सैनिकांची लूटमार त्यांनी चालू केली.

अँटनीच्या ह्या दुर्दशेच्या वार्ता इटली व इजिप्तमध्ये जाऊन पोचल्या. अँटनीला मदत करण्याच्या इराद्याने क्लिओपॅट्रा इजिप्तमधून निघाली व ग्रीसमध्ये येऊन दाखल झाली. क्लिओपॅट्राने अँटनीची एकूण अवस्था पाहिली व त्याला फेरचढाईपासून परावृत्त करून त्याला घेऊन ती इजिप्तला परत फिरली. अँटनी अलेक्झांड्रियात आला, तो थकून-भागूनच. पार्थियाच्या पराभवामुळे तो चांगलाच खचला होता. त्याच्या वाढत्या वयाने त्याच्या शरीरावर आपल्या निशाण्या दाखविण्यास सुरुवात केली होती. नव्या मोहिमेचा विचारही करणे त्याला शक्य नव्हते. ती हाती घेणे दूरच!

पण त्याच्या सुदैवाने एकसंधी चालून आली. मेडिया व पार्थिया ह्यांमधील परंपरागत स्नेहसंबंध दुरावून त्यांच्यात युद्ध निर्माण होण्याची शक्यता दिसू लागली. मेडियाच्या राजाने अँटनीस मदतीस येण्याची विनंती केली होती. क्लिओपॅट्राला अँटनीचे जाणे पसंत नव्हते, पण त्याने पराभवाचे उट्टे काढण्यासाठी उचल खाल्ली.

वसंत ऋतूत अँटनीने आपली नवी चढाई चालू केली. पार्थियन लोकांचा पराभव होताच क्लिओपॅट्राने त्याला पुढे जाऊ दिले नाही. पूर्वेकडे त्याला केव्हा धोका मिळेल ह्याचा नेम नाही, असे तिला वाटत होते. अँटनी परत येताच, रोमन पद्धतीप्रमाणे तिने त्याचा विजयोत्सव साजरा केला. अलेक्झांड्रियाच्या नागरिकांनी मोठ्या आस्थेने त्यात भाग घेतला.

अँटनीच्या ह्या साऱ्या वर्तनाने व त्याने क्लिओपॅट्राशी केलेल्या तहाने रोमन जनतेतील त्याचे स्थान जवळ जवळ नष्ट झाले होते. तो रोमला पारखा झाल्याप्रमाणेच होता. ऑक्टिव्हियनही त्याने त्याच्या बहिणीस दिलेल्या वागणुकीमुळे खवळून गेला होता. अँटनीला पुढे करून क्लिओपॅट्रा रोमवर चाल केल्याशिवाय राहाणार नाही, रोमच्या राजरस्त्यावरून विजयोत्सवाने मिरवण्याची तिची महत्त्वाकांक्षा आहे, ह्या द्वयीचा नाश केल्याशिवाय आपणास स्वास्थ्य लाभणार नाही, अशा विचारांनी ऑक्टिव्हियन त्रस्त झाला.

रोमन जनता अँटनीच्या विरुद्ध जात आहे, ऑक्टिव्हियन ह्या कामी हातभार लावीत आहे, ह्याची कल्पना क्लिओपॅट्राला होती. ऑक्टिव्हियनची बदनामी करण्यासाठी तिने अँटनीकरवी एक मोहीमच चालू केली. ऑक्टिव्हियनच्या चारित्र्यावर गलिच्छ आरोप करणारे अनेक खलिते अँटनीकडून रोमन नागरिकांना येऊ लागले. उभयतांची तणातणी वाढू लागली. उभयतांचा लढा अटळ होऊ लागला.

सूर्यास्ताचा समय होता. क्लिओपॅट्रा आपल्या प्रासादाच्या खिडकीत उभी राहून भूमध्य समुद्राच्या निळ्याशार पाण्याकडे पाहात होती. एकाएकी आपल्या विश्वासू सहचरीकडे वळून ती म्हणाली, ''रोम हा आपला खरा शत्रू आहे! रोम धुळीला मिळाल्याखेरीज इजिप्तला खरी शांतता लाभणार नाही. गेली दहा वर्षं मी हाच विचार करीत आहे, पण मला वाटतं, माझं ते स्वप्न आता साकार होऊ लागलं आहे. मार्क अँटनीच माझी ही कामगिरी पार पाडील!''

''पण बाईसाहेब...''

''मला आता जागृती आली आहे; आणि मी अँटनीला आता ह्या कामासाठी चेतवू शकेन!'' झपाट्याने गोळा होऊ लागलेल्या अंधाराकडे पाहात क्लिओपॅट्रा म्हणाली.

अँटनी व क्लिओपॅट्रा ह्यांनी आपले सर्व सामर्थ्य संघटित केले. पूर्वेकडील सर्व मांडलिक देशांतून सैनिक गोळा करण्यात आले. आरमार सज्ज झाले. असंख्य लहानमोठ्या गलबतांनी अलेक्झांड्रिया बंदर गजबजून गेले.

रोममध्ये अँटनीविरोधी, इजिप्तविरोधी वातावरण तापू लागले. अँटनीचे चाहतेही आता ऑक्टिव्हियनला साथ देऊ लागले. अँटनीविरुद्ध ऑक्टिव्हियन असा सामना रंगण्याचे चिन्ह दिसू लागले. रोमविरुद्ध इजिप्त असा हा लढा आहे व अँटनी देशद्रोही बनून इजिप्तची बाजू घेत आहे, असा सर्रास प्रचार चालू झाला. ऑक्टिव्हियनने मोठ्या कौशल्याने ह्या प्रचाराची धार वाढवून रोमन जनतेत आपले स्थान दृढमूल करून टाकले.

अँटनी इजिप्तची बाजू घेऊन रोमवर युद्ध लादीत असल्याने, तो देशद्रोह करीत आहे, असा स्पष्ट समज होण्याजोगी परिस्थिती निर्माण झाल्याने ऑक्टिव्हियनचे काम सोपे झाले. क्लिओपॅट्राला हे हवेच होते. अँटनीला ह्या युद्धात तडजोडीची भूमिका घेण्यास संधीच मिळू नये, हीच तिची इच्छा होती. रोमवर संपूर्ण विजय मिळवून रोमची राणी म्हणूनच तिला रोममध्ये प्रवेश करावयाचा होता.

प्रथम दुसऱ्याने आगळीक करावी, म्हणून प्रत्येकजण वाट पाहात होता आणि अशा ह्या ओढाताणीत हां हां म्हणता वर्ष निघून गेले.

अखेर अँटनीने ग्रीसवर चढाई केली. ऑक्टिव्हियननेही आपले सैन्य ग्रीसमध्ये आणून अँटनीच्या समोरच तळ टाकला. त्याचे आरमारही अँटनीच्या आरमाराभोवती घिरट्या घालू लागले. ऑक्टिव्हियनने आणखी एका गुप्त अस्त्राचा वापर चालू केला. अँटनीच्या रोमन सैन्यात बेदिली माजविण्यासाठी अफवांचा सुळसुळाट त्याने चालू केला. त्याचे हे तंत्र यशस्वी होऊ लागले.

अँटनी स्वत:ला हर्क्युलिसचा वंशज मानी. पण एक दिवस हर्क्युलिसच्या मंदिरावर विद्युत-आघात होऊन ते भंग पावले. ह्या घटनेने अँटनीचा धीर खचला. ऑक्टिव्हियनने ह्या घटनेचा फायदा घेऊन अँटनीचा नाश अटळ असल्याची घोषणा केली. ह्या अपशकुनाने अँटनीचा बुद्धिभ्रंश झाल्याप्रमाणे झाले. क्लिओपॅट्राचे व त्याचे वारंवार खटके उडू लागले. तो एके दिवशी तिला तोडून म्हणाला, ''तू इजिप्तला परत जा कशी! युद्धाचं काम, त्यात ज्यांना काही कळतं त्यांना करूदे. त्यात तुझी नसती लुडबूड नको!''

''ठीक आहे. पण परत जाताना मला माझं आरमारही परत नेणं भाग आहे!'' तीही ताडकन् उसळून म्हणाली. ह्या तिच्या त्राग्याने अँटनी एकदम हादरला, पांढरा पडला. त्याला माहीत होते, की क्लिओपॅट्राच्या मदतीशिवाय आपण काहीच करू शकत नाही.

एके दिवशी ऑक्टिव्हियनच्या छोट्या छोट्या गलबतांनी अचानक चढाई करून इजिप्तच्या अवजड जहाजांची बरीच नासधूस केली. ह्याचा वचपा काढण्यासाठी अँटनीने आरमारी युद्धाचा निर्णय केला. त्याला तोंड देण्यासाठी ऑक्टिव्हियनचा तांडेल आग्रिपा सज्ज होताच. त्याने पद्धतशीरपणे आपल्या गलबतांची सज्जता केली होती. खुद्द अँटनीच्या गलबताशीच त्याच्या छोटेखानी गलबताने झोंबी घेतली.

ही आरमारी लढाई तीन एक तास चालली असेल. एवढ्यात चालू झालेल्या वादळाने पेटलेली गलबते धडाडून पेटू लागली. इजिप्तची गलबते अजस्त्र असल्याने त्यांच्या जलद हालचाली करणे शक्यच नव्हते. पेटलेली छोटी गलबते त्यांच्यावर आदळून सर्वनाश करू लागली. ह्या आरमारी युद्धाचा निकाल अँटनीला प्रतिकूल लागणार, हे स्पष्ट दिसू लागले.

सायंकाळ झाली. इजिप्तच्या दिशेने जोरदार वारा वाहू लागला. एक प्रचंड गलबत आपली नारिंगी शिडे फडकावीत व इपाट्याने पाणी कापीत इजिप्तच्या दिशेने जाताना अँटनीला दिसले. युद्धाच्या धुमश्चक्रीत ह्या गलबताकडे फारसे कोणाचे लक्ष गेलेले दिसत नव्हते. पण अँटनीच्या तीक्ष्ण नजरेतून ही गोष्ट सुटू शकली नाही. क्लिओपॅट्रा त्याला सोडून इजिप्तच्या दिशेने निघाली होती.

''क्लिओपॅट्रा! क्लिओपॅट्रा!!'' अँटनीने मोठमोठ्याने हाका मारल्या. क्लिओपॅट्रा आपल्याला सोडून निघालेली पाहून त्याचा जीव कासावीस झाला.

आपल्याला अधांतरी सोडून क्लिओपॅट्रा चालली ह्या एकाच विचाराने त्याचा जीव फार कासावीस झाला. अभिमान, कर्तव्य, ह्या साऱ्या गोष्टींना तिलांजली देऊन त्याने आपल्या ध्वजनौकेचा त्याग केला. त्याने एक छोटे गलबत घेऊन ते द्रुतगतीने क्लिओपॅट्राच्या गलबताच्या दिशेने हाकारले. आपल्या आरमाराचे पुढे काय होणार, सैन्याचे काय होणार, ह्याचा विचार करण्यासही तो तयार नव्हता. क्लिओपॅट्राही त्या मनस्थितीत नव्हतीच!

क्लिओपॅट्राने तो आलेला पाहिला. त्याला आपल्या गलबतावर चढवून घेण्यास तिने मदत केली. आज तो पूर्वीचा रगेल, रंगेल अँटनी राहिला नव्हता. दोनही हातात मस्तक दाबून, खाली मान घालून तो बसला होता. त्याने मान वर केली नाही, की खाण्यापिण्याला हात लावला नाही. सुंदपणाने तो सतत तस्सा दोन दिवस बसून होता. थोड्या दिवसांनी गलबत टेनेरासच्या भूशिरास येऊन लागले.

त्या ठिकाणी आलेल्या बातम्या अगदी खेदजनक होत्या. ऑक्टिव्हियनने अँटनीचे बरेचसे आरमार हस्तगत केले होते. त्याचे सुमारे पाचएक हजार सैनिक ठार करण्यात आले होते.

क्लिओपॅट्राने अँटनीला सल्ला दिला, की त्याच्या सेनापतीने-कॅलिडासने, उरलेले सैन्य घेऊन माघार घ्यावी व मॅसिडोनियामधून आशिया मायनरमार्गे परत फिरावे. उरली सुरली साधनसामग्री बचावून जरूर पडल्यास खुद्द इजिप्तच्या रक्षणासाठी तिचा उपयोग करावा.

अँटनीला हा सल्ला मानणे भाग होते. इजिप्तशिवाय दुसरा आश्रय त्याला दिसत नव्हता.

●●●

## ११.शेवट

तीन चार दिवसांनी अँटनीला लिबियाच्या वालुकामय किनाऱ्यावरील एका ठिकाणी उतरविण्यात आले. येथून अलेक्झांड्रिया बंदर सुमारे दीडशे मैल अंतरावर होते.

क्लिओपॅट्रा समुद्रमार्गे पुढे निघाली. तिला इजिप्तमध्ये एक नाटक वठवायचे होते. आपण विजयी होऊन परत येत आहोत, असा आभास तिला निर्माण करायचा होता. अलेक्झांड्रियाच्या बंदोबस्तासाठी मागे ठेवलेल्या रोमन सैनिकांनी बंड करू नये, ह्यासाठी ह्या नाटकाची आवश्यकता होती.

निशाणे फडकवीत, रणवाद्यांचा गजर करीत, तिच्या गलबताने मोठ्या दिमाखाने अलेक्झांड्रिया बंदरात प्रवेश केला. पण विजयाचे हे नाटक अलेक्झांड्रियन नागरिकांवर परिणाम करू शकले नाही. त्यांनी राणीचे अगदीच थंडे स्वागत केले. एवढी उपेक्षा ह्यापूर्वी कधीच तिच्या वाट्यास आलेली नव्हती. तिला कळून चुकले, की आपल्या व अँटनीच्या झालेल्या वाताहातीची वार्ता आपण येण्यापूर्वीच इजिप्तमध्ये येऊन दाखल झाली आहे.

एकूण परिस्थितीचे मूल्यमापन करून नवी वाटचाल कशी करावी, ह्याचा विचार ती करू लागली. तिने अँटनीवर ठेवलेला भरवसा निष्फळ ठरला होता. अँटनीचा उपयोग होणे तर दूरच राहिले, पण तो एक अडचणच होऊन बसला होता. ऑक्टिव्हियन तिचा कट्टा वैरी होता. अँटनीकरवी त्याला ठेचून टाकण्याचा तिचा बेत होता. पण झाले विपरीतच! कोणत्या घटकेला ऑक्टिव्हियन इजिप्तवर चाल करून येईल, ह्याचा काहीच नेम राहिला नव्हता.

ह्या साऱ्या गोंधळात जास्तजास्त गुंतून पडण्यापेक्षा काही महत्त्वाच्या मुद्यांचा त्वरित् निर्णय करून मोकळे होण्याची गरज तिला भासू लागली. संयुक्त साम्राज्यावर सत्ता गाजविण्याचे तिचे स्वप्न धुक्याप्रमाणे विरून गेले होते. आपल्या मुलाला, सीझेरानला-इजिप्तमध्ये स्थिरप्रद कसे करावे, एवढीच चिंता तिला आता होती. एवढे मिळाले तरी पुष्कळ झाले, असेच तिला वाटू लागले.

तिला एकाच गोष्टीबद्दल थोडेफार समाधान वाटत होते. तिचे बरेचसे आरमार ऑक्टिव्हियनच्या तडाख्यांतून कसेबसे निसटून आले होते. तिचा खजिनाही अद्यापि सुरक्षित होता. इजिप्तच्या संरक्षणाची जबाबदारी आपणास पार पाडता येऊ शकेल, असा काहीसा विश्वास तिला वाटत होता. मात्र अँटनीने आता इजिप्तमध्ये येऊ नये, अशी तिची मनापासून इच्छा होती. अँटनी आला, की त्याच्या मागावर असलेला ऑक्टिव्हियनही काय वाटेल ते साहस करून इजिप्तवर चाल करून येणार, हे ठरल्याप्रमाणेच होते.

अँटनीला त्या रुक्ष वालुकामय प्रदेशात चैन पडणे शक्य नव्हते. तेथील संन्यस्त जीवनही त्याला रुचण्याजोगे नव्हते. त्याची पावले आपोआपच अलेक्झांड्रियाकडे वळली. क्लिओपॅट्रा, मद्य व मेजवानी ह्यांचा लाभ आपणास केव्हा एकदा होईल, असे त्यास होऊन गेले होते.

ऑक्टिव्हियन अँटनीच्या मागावर होताच. अँटनी अलेक्झांड्रियांत येऊन दाखल झाला आणि पाठोपाठ ऑक्टिव्हियनच्या फौजाही अलेक्झांड्रियाच्या दिशेने चाल करून आल्या.

क्लिओपॅट्राला भवितव्य कळून चुकले. तिने राज्यत्याग करण्याचा निर्णय केला. आपल्या मुलाला-सीझेरानला गादीवर बसवून व त्याच्या नावानं द्वाही फिरवून, आपण ऑक्टिव्हियनला शरण जावे व त्याच्याकडून सीझेरानला अभय मिळवावे, असा बेत तिने आखला.

पण ऑक्टिव्हियन तसा साधासुधा माणूस थोडाच होता! क्लिओपॅट्राची प्रत्येक मागणी त्याने धुडकावून लावली. पण हे करीत असताना तो शब्दरचना मात्र मोठी लोभसवाणी करीत असे. तो सुचवी, ''राणी सरकारनी अँटनीला दूर सारणं श्रेयस्कर.'' त्याचा मथितार्थ असा असे, की क्लिओपॅट्राने मुकाट्याने अँटनीला त्याच्या स्वाधीन करावे. क्लिओपॅट्रा ह्या घातकी सूचनेला मान्यता देणे शक्य नव्हते. ह्यामुळे अँटनीचा नाश अटळ होताच, पण शिवाय ऑक्टिव्हियनने इजिप्तचा नाश करण्याचाच निर्णय केल्यास प्रतिकार करू शकेल, असा सेनानीही हातचा जाणार होता. अँटनीला ही वार्ता कळताच तो खवळला. हा निरोप आणणाऱ्या ऑक्टिव्हियनच्या दूताला

त्याने मारझोड केली व म्हटले, ''जा! तुझ्या महारोगी धन्याला जाऊन सांग, की अँटनी तुझी वाट पाहात आहे!''

ऑक्टिव्हियनने हे आव्हान स्वीकारले. हां हां म्हणता त्याच्या फौजानी अलेक्झांड्रिया शहराला वेढा घालण्यास सुरुवात केली.

क्लिओपॅट्रा तशी वास्तववादी स्त्री होती. तिने इजिप्शियन रिवाजाप्रमाणे आपली सर्व चीजवस्तू हलवून आपल्या कबरस्तानात नेऊन ठेवण्यास सुरुवात केली. इजिप्तमधील राजेशाही कबरस्ताने म्हणजे राजवाडेवजाच मोठ्या इमारती असत. आपल्या मृत्यूची निश्चितता दिसताच इजिप्शियन राजघराण्यातील माणसे ह्या कबरस्तानांचा आश्रय घेत. क्लिओपॅट्राने आपल्या मनाशी काही ठाम निर्णय करून आपल्यासाठी तयार केलेल्या राजेशाही कबरस्तानाचा आश्रय केला.

ऑक्टिव्हियनच्या फौजांनी वेढा घातल्याचे पाहून अँटनीला चेव आला. आपल्या हाताशी असलेल्या तुटपुंज्या सैनिक सामर्थ्यानिशी धडक मारण्याचा निर्णय त्याने केला. अधूनमधून एखादी अचानक चकमक तो घडवून आणी व मोठ्या उत्साहाने क्लिओपॅट्राकडे धाव घेई. क्लिओपॅट्रा राजवाड्यात येऊन त्याला भेटे. अधूनमधून तिला आशा वाटे, की इतक्यात आपल्याला कबरस्तानाचा आश्रय करण्याचे कारण पडणार नाही. अँटनीच्या मामुली विजयानेही तिच्या आशा-आकांक्षा नव्याने पल्लवित होत.

अँटनीने एकदा ऑक्टिव्हियनला खिजविण्यासाठी द्वंद्वयुद्धाचे आव्हान देणारा निरोप धाडला. ऑक्टिव्हियनचा प्रतिनिरोप आला, ''अँटनीला आत्महत्याच करायची असेल, तर पुष्कळ अन्य मार्ग उपलब्ध आहेत!''

एके दिवशी प्रात:काळी अँटनीला असे आढळून आले, की आपले बहुतेक सर्व रोमन सैनिक ऑक्टिव्हियनच्या आश्रयास निघून गेले आहेत. त्यांनी इजिप्तसाठी रोमन सैन्याशी सामना न देण्याचा निर्णय मनानेच केला होता, एवढेच काय, पण बंदरातील खुद्द इजिप्शियन आरमारही रोमन आरमाराला जाऊन मिळाले होते. हा सारा प्रकार पाहून मात्र अँटनीच्या पोटात खड्डा पडल्याप्रमाणे झाले. तो निराश झाला. ह्या दगाबाजीत, फंदफितुरीत, क्लिओपॅट्राचा हात असावा, आपला स्वत:चा नाश टाळण्यासाठी तिने आपला बळी देण्यास काढला असावा, ह्या शंकेने तो पिसाळल्यागत झाला. तो म्हणू लागला, ''आजपर्यंत मी हिच्यासाठी शस्त्र हाती घेऊन राबलो, पण आज तिनेच मला दगा दिला आहे!''

त्याचे हे उद्गार क्लिओपॅट्राच्या कानी गेले. ती आपल्या विश्वासू सहचरीला म्हणाली, ''मी ह्याला काय दगा दिला?'' ती बिचारी दाई काय सांगणार? इतक्यात दुसरी एक दाई धावत, पळत, धापा टाकीत आत आली व म्हणाली, ''राणीसरकार, संतप्त अँटनी नंगी समशेर घेऊन तुम्हाला धुंडाळीत दालनादालनातून थैमान घालीत आहे!''

''चारमियन, चल, जलदी कर. आता आपणास ह्या प्रासादाचा निरोप घेऊन कबरस्तानाच्या आश्रयास गेलंच पाहिजे!'' नंतर ती दुसऱ्या एका सेवकाला म्हणाली, ''जा, जलदी कर. अँटनीला गाठ आणि त्याला म्हणावं, क्लिओपॅट्रा मेली!''

कबरस्तानात येताच तिने व तिच्या दायांनी दरवाजा घट्ट बंद करून त्याच्या मागे अडगळीचा प्रचंड ढीग रचला. बाहेरूनच काय, पण आतूनही त्यांना स्वत:लाच दरवाजा उघडणे अशक्यप्राय होईल, एवढा बंदोबस्त त्यांनी करून टाकला.

क्लिओपॅट्राच्या निधनाची वार्ता त्या सेवकाने अँटनीच्या कानी घालताच तो व्याकूळ होऊन म्हणाला, ''तू मला अखेरच्या क्षणी सोडून निघून गेलीस तर! मीही तुझ्या भेटीस येत आहे. तू स्त्री असूनही माझ्या आधी मृत्यूला कवटाळलंस आणि मी एवढा योद्धा असूनही भ्याडाप्रमाणे मागे राहिलो आहे!'' नंतर तो एरॉस ह्या आपल्या विश्वासू सेवकाला म्हणाला, ''आवश्यकता वाटल्यास, माझा वध करायचं अभिवचन तू एकदा मला दिलं आहेस, एरॉस! आज ती वेळ आली आहे. तू आज आपलं वचन पूर्ण केलं पाहिजेस, एरॉस!''

अँटनीचे भाषण पूर्ण होण्यापूर्वीच एरॉसने आपली रोमन तलवार स्वत:च्या छातीत खोलवर खुपसून टाकली व तो अँटनीच्या पायांपाशी धाडकन् कोसळला, गतप्राण झाला. त्याला उद्देशून अँटनी म्हणाला, ''ठीक आहे, एरॉस! तू धन्याला मारू शकला नाहीस, पण मरणाचा मार्ग तरी त्याला तू दाखवून दिलास!'' अँटनीने खंजीरवजा आपली

छोटी रोमन तरवार दोनही हातानी वर उचलली व आपल्या पोटामध्ये खूपच खोलवर जोराने खुपसली. व्याकुळ होऊन तो तेथेच एका कोचावर कोसळला व कोसळता कोसळता पुटपुटला, ''मरण पत्करण्यासाठी किती खोलवर शस्त्राघात करावा लागतो!''

प्रासादात नोकर- चाकरांची धावपळ चालू होती. आपल्या राणीचा पती घायाळ होऊन पडला आहे, रक्ताच्या थारोळ्यात लोळतो आहे, हे पाहून ते थबकल्याप्रमाणे करीत, पण लगेच चालू लागत. अँटनी विव्हळत होता. स्वत:च्या रक्तात लडबडत होता.

एवढ्यात क्लिओपॅट्राचा खाजगी कारभारी डायमोरास तेथे आला. अँटनीला त्या अवस्थेत पाहून तो म्हणाला, ''मार्क अँटनी, काय भयानक कृत्य हे! राणीसाहेबांनी आपण सुरक्षित आहात का हे पाहाण्यासाठी मला पाठवलं आहे!'' अँटनीने भिरभिरत्या नजरेने डायमोरासकडे पाहिले व अडखळत्या जिभेने तो म्हणााला, ''राणी मेली आहे ना?''

''नाही! नाही! राणी जिवंत आहे. कबरस्तानाच्या आश्रयास गेली आहे.''

''मग मला तिच्याकडे घेऊन चला!'' अँटनी कसेबसे म्हणाला.

अँटनीला लगबग करून कसेबसे कबरस्तानाकडे नेण्यात आले. दरवाजा पक्का बंद करण्यात आला असल्याने अँटनीला दोराच्या साहाय्याने वरच्या मजल्याच्या खिडकीतून महत्प्रयासाने खेचून आत घ्यावे लागले.

अँटनीची तो शोचनीय अवस्था पाहून क्लिओपॅट्राला भडभडून आले. तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. हुंदक्यांनी तिची देहलता गदगदून निघाली. अँटनीला किंचित्काल शुद्ध आली. आपल्या सुकलेल्या ओठांवरून जीभ फिरवीत त्याने पाण्याची मागणी केली. पाण्याचा घोट पोटात जाताच किंचित तरारल्याप्रमाणे होऊन तो म्हणाला, ''क्लिओपॅट्रा, तू शोक करू नकोस. मी रोमन योद्धा होतो आणि माझ्या हातानेच मी मरण पतकरलं आहे!'' त्याचे अंग किंचित् थरारल्याप्रमाणे होऊन मग सर्व काही शांत झाले.

ऑक्टिव्हियनच्या फौजा एव्हाना अलेक्झांड्रियात शिरल्या होत्या.

नेहमीच्या रिवाजाप्रमाणे जीवितवित्ताच्या रक्षणासाठी नागरिकांनी संपूर्ण शरणागती पत्करली होती. एवढे असूनही जरब बसविण्यासाठी ऑक्टिव्हियनने वेचक नागरिकांची जाणूनबुजून कत्तल केली.

मग त्याने आपला मोर्चा कबरस्तानाकडे वळविला. दरवाजा उघडण्याची खटपट करण्याचे नाटक करताकरता त्याच्या सैनिकांनी वरील मजल्याच्या खिडकीवाटे कबरस्तानात हळूच प्रवेश मिळविला होता.

दरवाजा बाहेरच्या दणकादणकीने कोलमडून पडणार व आपणास ऑक्टिव्हियन कैदी बनावे लागणार, हे ओळखून क्लिओपॅट्रा आत्महत्या करण्याच्या तयारीस लागली होती; एवढ्यात अचानकपणे ती ऑक्टिव्हियनच्या सैनिकांकडून गिरफदार केली गेली. तिला आत्महत्या करण्यास अवसरच मिळाला नाही.

ऑक्टिव्हियनने तिला त्याच ठिकाणी नजरकैदेत ठेवले व तिला बजावले, ''राणीसाहेब, तुम्हाला आत्महत्या करता येणार नाही. तुम्ही तसा नुसता प्रयत्न जरी केलात, तरी मी तुमच्या डोळ्यांदेखत सीझर व अँटनी ह्यांच्या तुम्ही जन्माला घातलेल्या पोरांच्या कत्तली केल्याशिवाय राहाणार नाही. त्यांचे प्राण वाचावेत अशी अपेक्षा असेल, तर तुम्ही आपल्या जिवाला जपलं पाहिजे. आत्महत्येचा प्रयत्न यशस्वी होणार नाही. पोरं मात्र फुकट मरतील! तुमच्या पतीचा, अँटनीचा, अंत्यविधी तुम्ही आपल्या इच्छेप्रमाणे करू शकता!'' दुसऱ्या दिवशीच क्लिओपॅट्राने आपल्या कबरस्तानाच्या शेजारीच अँटनीचा अंत्यविधी उरकला.

ऑक्टिव्हियनच्या दूतांनी तिच्या हाती कोणतेही शस्त्र लागणार नाही ह्याची संपूर्ण दक्षता घेतली होती. इजिप्तच्या ह्या सौंदर्यशाली व महत्त्वाकांक्षी राणीला रोममध्ये नेऊन आपल्या विजयोत्सवात तिची फरपट काढण्याचा ऑक्टिव्हियनचा पुरा निश्चय होता.

दुसऱ्या दिवशी क्लिओपॅट्राने आपल्या दु:खाचा त्याग केलेला दिसू लागला. तिचे औदासीन्य नष्ट झाल्याचे दिसू लागले. तिचा पूर्वीचा सम्राज्ञीचा दिमाख तिने फिरून आणल्याचे दिसू लागले. तिच्या दोन दाया राणीचा

साजशृंगार चढविण्यात गर्क झाल्याचे दिसू लागले. ऑक्टिव्हियनचे दूत हा राणीचा सारा साजशृंगार पाहून चकित झाले. त्यांना वाटले, ही राणी आता आपल्या धन्याचाही बळी घेणार!

आणि मग मेजवानीसाठी मेवामिठाई, फळफळावळ ह्यांच्या टोपल्या येऊन दाखल होऊ लागल्या.

आतील दिवाणखान्यात जाऊन राणी आपल्या सहचरीला हळूच म्हणाली, ''मला हवी होती ती वस्तू आली आहे ना?''

चार्मियन हळूच म्हणाली, ''होय, राणीसरकार!''

आणि मग हां हां म्हणता क्लिओपॅट्राच्या मृत्यूची वार्ता सर्व शहरात पसरली.

ऑक्टिव्हियन धावून आला व पहारेकऱ्यांवर खवळून ओरडला, ''मूर्खांनो, हे घडलं कसं?''

नोकरांची बोबडी वळली. त्यांना काही सांगणे शक्यच नव्हते. ऑक्टिव्हियन मृत राणीपाशी आला. एकाएकी त्याचे लक्ष राणीच्या लांब सडक, नितळ, नाजूक हातांकडे गेले. तेथे सूक्ष्म दंतव्रण दिसत होते. ''सर्पदंश!'' तो ओरडला. राणीच्या दोनही दाया मृतवत् होऊन अस्ताव्यस्त पसरल्या होत्या.

एवढ्यात एक चिमुकला सर्प गुळगुळीत फरबंदीवरून वळवळ करीत जाताना दिसला. ऑक्टिव्हियनने आपल्या तलवारीने त्याची खांडोळी केली.

एकूण एका चिमुकल्या सर्पाने इजिप्तच्या महत्त्वाकांक्षी राणीला तिच्या भावी विटंबनेतून मुक्त केले होते!

●●●